सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १४७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जुन्नरमध्ये मराठा आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यू

जुन्नर : मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथून निघालेला मोर्चा सध्या मुंबईच्या दिशेने सरकत आहे. या आंदोलनाचं नेतृत्व मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील करत असून, काल (२७ ऑगस्ट) ते सराटीतून निघाले आणि आज सकाळी ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्यावर पोहोचले. तेथून दर्शन घेऊन ते पुन्हा मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मात्र, या प्रवासादरम्यान एक धक्कादायक घटना घडली आहे. जुन्नरजवळ एका मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. मृत व्यक्तीचं नाव सतीश देशमुख असं असून, आंदोलकांच्या मनात यामुळे शोककळा पसरली आहे. मनोज जरांगे मुंबईत उपोषणाला बसण्यापूर्वीच ही घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी हजारो मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. परंतु, आंदोलनाच्या वातावरणात अचानक झालेल्या या मृत्यूमुळे हळहळ आणि संताप व्यक्त होत असून प्रशासनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या पोलिस आणि प्रशासनाकडून अधिकृत माहिती घेतली जात असून, या दुर्दैवी घटनेमुळे आंदोलनाचा कल अजूनच गंभीर झाला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या मोर्चात आज जुन्नरजवळील आंदोलक सतीश देशमुख यांचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याने आंदोलनात शोककळा पसरली आहे. या घटनेवर मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. जरांगे पाटील म्हणाले, मला आता माहिती मिळाली आहे की आमचे देशमुख नावाचे बांधव प्रवासादरम्यान दम छाटल्याने कोसळले आणि त्यांना हार्ट अटॅक आला. ही घटना अत्यंत दुःखद आहे. मी अजूनही अधिक माहिती घेत आहे, परंतु या बळीला जबाबदार फडणवीस साहेब आहेत. ते पुढे म्हणाले की, जर सरकारने आता तरी मराठा समाजाला आरक्षण दिलं असतं, तर आमच्या बांधवांचे जीव गेले नसते. हे आमचे आणखी दोन बळी आहेत. लातूरमध्ये परवाच अशीच घटना घडली आणि आज पुन्हा आमच्या समाजातील एका बांधवाचा जीव गेला. हे थांबायला हवं. मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याला वेग येत असतानाच सलग मृत्यूंच्या घटनांमुळे आंदोलनकर्त्यांमध्ये संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे. यावर आता राज्य सरकार कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठा आरक्षणासाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी फक्त ८ तासांची परवानगी देण्यात आली आहे. पोलिस प्रशासनाशी झालेल्या चर्चेनंतर जरांगे यांनी ही अट मान्य केली असून हमीपत्रही दिलं आहे. मात्र, शिवनेरी किल्ल्यावर पोहोचल्यानंतर त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांच्या वक्तव्यामुळे वेगळीच भूमिका घेण्याचे संकेत मिळाले. त्यामुळे आता ते आणि मराठा बांधव प्रशासनाने दिलेल्या वेळमर्यादेचं पालन करणार की ठरवलेल्या चौकटीपलीकडे जाऊन भूमिका घेणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. याचबरोबर जरांगे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्पष्ट मागणी केली आहे की, आंदोलनावर अटी-शर्ती लादू नका, या बंधनांचा तातडीने पुनर्विचार करा.

मराठा समाजाच्या लेकरांच्या वेदनांना न्याय मिळालाच पाहिजे - मनोज जरांगे

मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर पुन्हा एकदा जोरदार हल्ला चढवला आहे. मराठा समाजाच्या लेकरांच्या वेदना फार मोठ्या आहेत. या वेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समजून घेतल्या पाहिजेत. या समाजाला न्याय मिळाला पाहिजे आणि मुख्यमंत्र्यांनी त्याला साथ दिली पाहिजे, असे जरांगे यांनी स्पष्ट केलं. रायगड आणि शिवनेरीसारख्या ऐतिहासिक स्थळांमधून प्रेरणा घेत असल्याचं सांगून जरांगे म्हणाले की, फडणवीस कुणालाही थांबवू शकत नाहीत.

# ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांचं निधन

मुंबई, २८ ऑगस्ट : मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांचे आज, गुरुवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. मुंबईतील आपल्या राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. तीन दिवसांपूर्वीच बाळ कर्वे यांनी त्यांचा ९५ वा वाढदिवस साजरा केला होता. बाळ कर्वे यांच्या निधनामुळे आता मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे.



बाळ कर्वे यांच्या कन्या स्वाती कर्वे यांनी एका पोस्टद्वारे बाळ कर्वे यांच्या निधनाची माहिती दिली. ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांनी गुरूवारी सकाळी १०.१५ वा. अखेरचा श्वास घेतला, असे त्या म्हणाल्या. बाळ कर्वे यांनी १९७९ साली दूरदर्शनवरून प्रसारित झालेल्या चिमणराव या मालिकेत गुंड्याभाऊंची भूमिका साकारली होती. या भूमिकेने त्यांना खरी ओळख मिळवून दिली. त्यांना चित्रपटसृष्टीतही गुंड्याभाऊ याच नावाने ओळखले जात होते. या मालिकेत दिलीप प्रभावळकर आणि बाळ कर्वे यांची जोडी प्रेक्षकांना आवडली.

बाळ कर्वे यांनी टीव्ही मालिका आणि रंगभूमीवरील दर्जेदार कलाकृतींमध्ये काम केलं. 'सूर्याची पिल्ले', 'रथचक्र', 'तांदुळ निवडता निवडता', 'मनोमनी', 'कुसुम मनोहर लेले' अशा नाटकांमध्ये बाळ कर्वे यांनी साकारलेल्या भूमिका गाजल्या. 'प्रपंच', 'राधा ही बावरी', 'वहिनीसाहेब', 'उंच माझा झोका' या मालिकांमध्ये बाळ कर्वेंनी काम केलं होतं. 'जैत रे जैत' हा बाळ कर्वेंनी अभिनय केलेला पहिला चित्रपट. या सिनेमासोबतच 'सुंदरा सातारकर', 'चांदोबा चांदोबा भागलास का', 'चटक चांदणी', 'बन्याबापू' अशा सिनेमांमध्ये त्यांनी केलेल्या भूमिका विशेष गाजल्या.

सई परांजपे यांच्या 'कथा' या एकमेव सिनेमात त्यांनी अभिनय केले होते. हिंदीत त्यांनी आणखी काही काम केलं नाही. मराठी मनोरंजन विश्वातील 'प्रीतीचं झुळझुळ पाणी' हे गाजलेलं गाणं बाळ कर्वे यांच्यावर चित्रित झालं आहे. उत्कृष्ट अभिनय, मराठी भाषेवर प्रभुत्व, नम्र स्वभाव, अभिनयाची समज आणि सहकलाकारांसोबतची मैत्री अशा गुणांमुळे बाळ कर्वे ओळखले जात असत. बाळ कर्वे यांच्या निधनानंतर मराठी मनोरंजन विश्वातील कलाकारांनी आणि चाहत्यांनी त्यांना श्रद्धांजली


# सैन्याने घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला, दोन पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी ठार

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरमधील बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेझ सेक्टरमध्ये गुरुवारी भारतीय लष्कर आणि स्थानिक पोलिसांची दहशतवाद्यांशी चकमक झाली. जवानांनी दोन दहशतवाद्यांना ठार मारले. सैन्याने घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला आणि दोन पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांना ठार केले.

गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीआधारे भारतीय लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. दहशतवाद्यांना शोधण्यासाठी जवानांनी मोहीम हाती घेतली. जवानांना बघताच दहशतवाद्यांनी गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल जवानांनी दहशतवाद्यांच्या दिशेने गोळीबार केला. या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले.

याआधी २ ऑगस्ट रोजी जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील अखल देवसर भागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत लष्कर - ए - तोयबा या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनेचे तीन दहशतवादी ठार झाले.

पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी २२ एप्रिल २०२५ रोजी हल्ला केला होता. या घटनेनंतर



आतापर्यंत जम्मू काश्मीरमध्ये सात चकमकींमध्ये २३ दहशतवादी ठार झाले. आज ठार झालेल्या दोन दहशतवाद्यांची ओळख पटलेली नाही. इतर २१ दहशतवाद्यांपैकी बारा पाकिस्तानी नागरिक होते तर नऊ स्थानिक होते. या व्यतिरिक्त ऑपरेशन सिंदूरद्वारे भारताने १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले.

# विरार इमारत दुर्घटनेत या १७ जणांचा मृत्यू, मृतांमध्ये एक वर्षाच्या चिमुरडीचाही समावेश

विरार : विरार पूर्व येथील चामुंडानगरमधील रमाबाई अपार्टमेंट कोसळली. या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले. सर्व मृतांची ओळख पटविण्यात आली आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत. वसई - विरार महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार इमारत दुर्घटनेत ज्यांचा मृत्यू झाला त्यात एक वर्षाच्या चिमुरडीचाही समावेश आहे. मृतांमध्ये उत्कर्षा जोवील या एक वर्षाच्या चिमुरडीचा तसेच ११ वर्षांच्या अर्णव निवळकर याचाही समावेश आहे.

जखमी झालेल्यांपैकी प्रदीप कदम आणि जयश्री कदम या दोघांना उपचारांनंतर प्रकृती सुधारल्यामुळे डॉक्टरांनी घरी




जाण्याची परवानगी दिली आहे. इतर सात जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांच्या नातलगांनी वैद्यकीय अधिक्षक डॉ. कैलास राठोड, ग्रामीण रुग्णालय, विरार यांच्याशी ९५२७९६१२२१ या मोबाईलवर क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मृतांची नावं : आरोही जोवील (२४), उत्कर्षा जोवील (१), लक्ष्मण सिंग (२६), दिनेश सकपाळ (४३), सुप्रिया निवळकर (३८), अर्णव निवळकर (११), पार्वती सकपाळ (६०), दिपेश सोनी (४१), सचिन नेवाळकर (४०), हरिश बिष्ट (३४), सोनाली तेजाम (४१), दिपक बोहरा (२५), कशीश सहेनी (३५), शुभांगी सहेनी (४०), गोविंद रावत (२८), ओंकार जोवील (२६), रोहिणी चव्हाण (३५).

वसई - विरार महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार इमारतीच्या ढिगाऱ्याखाली एकूण २६ जण दबले होते. यापैकी १७ जणांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले. जखमींपैकी दोघांना उपचार करुन घरी पाठवले आहे आणि इतर सात जणांवर उपचार सुरू आहेत. सर्व मृतांची ओळख पटली आहे. घटनास्थळी एनडीआरएफ करत असलेले मदतकार्य आता थांबवण्यात आले आहे. जेसीबीच्या मदतीने ढिगारा उपसण्याचे काम सुरू आहे. पडलेल्या इमारतीच्या मालकाला अटक करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी नियमानुसार इमारत दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

जखमींची यादी

उपचारांनंतर घरी सोडण्यात आलेले - प्रदीप कदम (४०), जयश्री कदम (३३), तुळींज हॉस्पिटलमध्ये असलेले जखमी - प्रभाकर शिंदे (५७), प्रेरणा शिंदे (२०), प्रकृती हॉस्पिटल, बोळींज, विरार पश्चिम येथे असलेले जखमी - प्रमिला शिंदे (५०), संजॉय सिंग (२४), मंथन शिंदे (१९), विशाखा जोवील (२४), संजीवनी हॉस्पिटल, विरार पश्चिम येथे असलेले जखमी - मिताली परमार (२८).

# भाजपा जिल्हाध्यक्ष मा. आमदार गजानन घुगे यांचा वाढदिवस जिल्हाभरात मोठ्या उत्साहात साजरा





हिंगोली : दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर तिथीप्रमाणे कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे मा.आमदार तथा हिंगोली भाजपा जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

आज सकाळी हिंगणी येथील हरिहर नाथाचा अभिषेक गजानन घुगे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर हिंगोली येथील कै. विठ्ठलराव घुगे विद्यालयात गणेश चतुर्थी निमित्त गणपतीची स्थापना करण्यात आली. शाळेतील चिमुकल्यांनी मोठ्या उत्साहाने वाढदिवसा निमित्य स्वहस्ते बनवलेले ग्रीटिंग कार्ड यावेळेस दादांना भेट देऊन गजानन घुगे यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर घुगे यांच्या ज्ञानेश्वरी या निवासस्थानी कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती त्यांच्या निवासस्थानी त्यांचा यथोचित सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विविध राजकीय पक्षातील पदाधिकारी, समाजातील सन्माननीय व्यक्ती , विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच व्यापारी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. हिंगोली येथील भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयात देखील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध मुलांचे विद्यालय हिंगोली येथील शाळेत मा.आ.गजाननरावजी घुगे यांचा वाढदिवस निमित्य यावेळी शाळेतर्फे मुलांनी गीतमय शुभेच्छा दिल्या तसेच दादांचा शाल व श्रीफळ देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. दादा तर्फे मुलांना प्रतिवर्षिप्रमाणे भोजन देण्यात आले व तसेच खानापूर चित्ता या ठिकाणी भारतीय जनता पार्टी कार्यकर्ते व गावकऱ्याच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या व जिल्हाभरातून सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला...

## मराठवाड्यात पावसाचे थैमान, सतर्कतेचा इशारा

छत्रपती संभाजीनगर, २८ ऑगस्ट : छत्रपती संभाजी नगर शहरासह नांदेड परभणी हिंगोली लातूर धाराशिव बीड या जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळला असून अनेक ठिकाणची वाहतूक व्यवस्था ठप्प झाली आहे विशेष म्हणजे मराठवाड्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला असून गावागावांमध्ये पाणी शिरले आहे दरम्यान प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे. बुधवारी रात्रीपासून मुसळधार पावसाला मराठवाड्यात प्रारंभ झाला विशेष म्हणजे नांदेड लातूर या जिल्ह्याला मोठा फटका बसला आहे. नांदेड हैदराबाद रेल्वे पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे रेल्वे मार्ग बंद झाला आहे हैदराबाद कडे जाणारी व्यवस्था आणि वाहतूक बंद झाली आहे लातूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्थादेखील ठप्प झाली आहे अनेक ठिकाणची एसटी वाहतूक बंद करण्यात आली.

# लोकशाही पध्दतीने जेवढी आंदोलन होतील त्याला आम्ही सामोरे जाऊ - मुख्यमंत्री

## मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं आहे!

मुंबई, २८ ऑगस्ट : लोकशाहीत प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे. लोकशाहीत सगळ्यांना आपली मतं मांडण्याचा अधिकार आहे, लोकशाही पध्दतीने जेवढी आंदोलन होतील त्याला आम्ही सामोरे जाऊ, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेच मी आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटलेला आहे. आता मराठा समाजाला ओबीसीत आरक्षण द्या म्हणतात, ओबीसींमध्ये अगोदरच ३५० जाती आहेत. मात्र, मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलेलं आहे, असेही ते म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या पाठोपाठ आता ओबीसी समाजाचे नेते देखील आपल्या मागण्यांसाठी आक्रमक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी माध्यमांसमोर प्रतिक्रिया दिली. ते पुढे म्हणाले की, दोन्ही समाजाला विनंती आहे, दोन्ही समाजासाठी शासन काम करेल. ओबीसी समाजाने लक्षात ठेवावं आम्ही सर्व प्रश्न सोडवू, मराठा समाजाचे प्रश्न आम्हीच सोडवले, इतर कुणीही प्रश्न सोडवले नाहीत. मराठा समाजाला आपण आरक्षण दिलं आहे, कोर्टात टिकले आहे. कुठलेही आंदोलन होवो, लोकशाहीच्या चौकटीबाहेर जाऊ नये, उच्च न्यायालयाने काही नियम निकष तयार केले आहेत, त्या चौकटीत आंदोलनकर्ते आणि त्यांच्या नेत्यांनी रहावे, असे आवाहनही फडणवीस यांनी केले.

मराठा समाजाची देखील ही जबाबदारी आहे की, त्यांनी मराठा समाजाच्या हिताचा अभ्यास करून त्या ठिकाणी मागणी केली पाहिजे. मात्र एक गोष्ट खरी आहे, की एसीईबीसी आरक्षणामध्ये राजकीय आरक्षण मिळणार नाही, राजकीय आरक्षण हा जर हेतू असेल तर मात्र गोष्ट वेगळी आहे. जर राजकीय आरक्षण हा हेतू नसेल आणि सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची जर लढाई असेल, नोकरी मिळाली पाहिजे, प्रवेश मिळाला पाहिजे तर मात्र या मागणीचा विचार किमान काही विचारवंतांनी तरी केला पाहिजे, असंही यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यापूर्वी काय झालं हे तुम्ही सर्वांनी बघितलं आहे, आजही आंदोलनासाठी रिसोर्सेस उभे करणारे कोण आहेत? हे पाहायला मिळत आहे, पण ठीक आहे. माझं म्हणणं काय आहे की, आमच्यासाठी हे आंदोलन राजकीय नाही, आम्ही याला सामाजिक चष्म्यातून पाहू, काही राजकीय पक्ष हे त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांचं नुकसान होईल, फायदा होणार नाही, असा इशाराही यावेळी फडणवीस यांनी विरोधकांना दिला आहे.

# आंतरराष्ट्रीय व्यापार स्वेच्छेने व्हावा, दडपणाखाली नव्हे - डॉ. मोहन भागवत


## तीन दिवसीय व्याख्यानमालेचा दुसरा दिवस - 'संघाची १०० वर्षांची यात्रा - नवे क्षितिज'

छत्रपती संभाजीनगर - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी सांगितले की, समाज आणि जीवनातील समतोलच खरे धर्म आहे, जो कोणत्याही अतिरेकापासून आपल्याला वाचवतो. भारताची परंपरा यालाच मध्यम मार्ग म्हणते आणि आजच्या जगासाठी हेच अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी सांगितले की, जगासाठी आदर्श बनण्यासाठी समाजपरिवर्तनाची सुरुवात घरापासून करावी लागेल. यासाठी संघाने 'पंच परिवर्तन' सुचवले आहेत - कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, स्व-बोध (स्वदेशी) आणि नागरिक कर्तव्यांचे पालन. आत्मनिर्भर भारतासाठी स्वदेशीला प्राधान्य द्या आणि भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार केवळ स्वेच्छेनेच व्हावा, कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली नाही.

डॉ. मोहन भागवत हे विज्ञान भवन येथे संघ शताब्दी वर्षानिमित्त आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेच्या ('संघाची १०० वर्षांची यात्रा - नवे क्षितिज') दुसऱ्या दिवशी बोलत होते. या वेळी सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे, उत्तर क्षेत्रप्रमुख पवन जिंदल आणि दिल्ली प्रांतप्रमुख डॉ.अनिल अग्रवाल मंचावर उपस्थित होते.

मोहन भागवत म्हणाले, संघाचे कार्य हे शुद्ध सात्त्विक प्रेम आणि समाजनिष्ठेवर आधारित आहे. संघाचा स्वयंसेवक कधीच वैयक्तिक लाभाची अपेक्षा करत नाही. इथे प्रोत्साहन (इन्सेन्टिव) नाही, उलट त्याहून अधिक अप्रत्यक्ष अडचणी आहेत. स्वयंसेवक समाजकार्य करताना आनंद अनुभवतात. त्यांनी स्पष्ट केले की, जीवनाची सार्थकता आणि मुक्तीची अनुभूती ह्या सेवेमधूनच मिळते. सज्जनांशी मैत्री, दुर्जनांची उपेक्षा, चांगले करणाऱ्याबद्दल आनंद व्यक्त करणे आणि दुर्जनांप्रतीही करुणा बाळगणे - हेच संघाचे जीवनमूल्य आहे.

हिंदुत्वाबद्दल ते म्हणाले, हिंदुत्व म्हणजे सत्य, प्रेम आणि



आपुलकी. आपल्या ऋषी-मुनींनी आपल्याला शिकवले आहे की जीवन हे केवळ स्वतःसाठी नसते. म्हणूनच भारताने जगासाठी मार्गदर्शक होण्याची भूमिका निभावली पाहिजे. येथूनच 'वसुधैव कुटुंबकम्' आणि 'विश्वकल्याण' यांची संकल्पना जन्माला येते.

सरसंघचालकांनी चिंता व्यक्त केली की, जग हे अतिरेकीपणा, संघर्ष आणि अशांततेच्या दिशेने चालले आहे. मागील साडेतीनशे वर्षांत उपभोगवाद आणि भौतिकतावादामुळे मानवतेची पातळी घसरली आहे. महात्मा गांधींनी सांगितलेल्या 'सात सामाजिक पापां'चा त्यांनी उल्लेख केला -

१. कामाशिवाय संपत्ती,
२. विवेकाशिवाय आनंद,
३. चारित्र्याशिवाय ज्ञान,
४. नैतिकतेशिवाय व्यापार,
५. मानवतेशिवाय विज्ञान,
६. बलिदानाशिवाय धर्म,
७.तत्त्वांशिवाय राजकारण -हे पाप समाजात असमतोल निर्माण करतात.

सरसंघचालक म्हणाले की, आज जगात समन्वयाचा अभाव आहे. त्यामुळे जगाने आपला दृष्टिकोन बदलायला हवा. जगाने धर्माचा मार्ग स्वीकारावा लागेल. इथे धर्म म्हणजे पूजा-पाठ किंवा केवळ कर्मकांड नव्हे. सर्व धर्मांपेक्षा श्रेष्ठ असा धर्म म्हणजे समतोल. आपणही जगावे, समाजही जगावा आणि निसर्गालाही जपावे.

धर्म म्हणजे मर्यादा आणि समतोलासह जगणे. हेच दृष्टिकोनानेच जगात शांती प्रस्थापित होऊ शकते.

धर्म म्हणजे तो मार्ग जो आपल्याला संतुलित जीवनाकडे घेऊन जातो, विविधतेला स्वीकारतो आणि सर्वांच्या अस्तित्वाचा आदर करतो. हेच खरे विश्वधर्म आहे आणि हिंदू समाजाने संघटित होऊन तो जगासमोर मांडायला हवा.

वैश्विक पातळीवर ते म्हणाले की, शांती, पर्यावरण आणि आर्थिक विषमता यावर चर्चा होत आहे, उपाय सुचवले जात आहेत, पण समाधान अजूनही दूर आहे.

त्यासाठी त्याग, बलिदान आणि प्रामाणिक विचार आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सरसंघचालक म्हणाले की, आपल्यावर नुकसान झाले तरी भारताने संयम राखला आहे. ज्यांनी आपल्याला त्रास दिला, त्यांनाही संकटात मदत केली आहे. अहंकारातून शत्रुत्व निर्माण होते, पण भारत अहंकारापलीकडे आहे. संघ जे बोलतो, ते समाज ऐकतो - हे संघाच्या सेवा व समाजनिष्ठेमुळे मिळालेले आहे.

संघाचे उद्दिष्ट आहे की, संघकार्य सर्व ठिकाणी, सर्व स्तरांवर पोहोचावे. समाजात चांगले कार्य करणारी सज्जनशक्ती एकत्र यावी. यासाठी संघाने सज्जन शक्तीशी संपर्क ठेवण्याचा संकल्प केला आहे. संघ समाजाच्या स्वभावात सकारात्मक परिवर्तन घडवू इच्छितो. ओपिनियन मेकर्सशी सतत संवाद ठेवून एक सकारात्मक विचारधारा रुजवायची आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वडवळ येथे मिनी गणित,सायन्स लॅबचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
ग्रामीण भागातील विद्यार्थी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याकडे वळावे या उद्देशाने चाकूर तालूक्यातील वडवळ येथे कलापंढरी संस्थेच्या पुढाकारातून क्राय संस्थेच्या मदतीने वडवळ (नागनाथ)येथील जिल्हा परीषद माध्यमीक शाळेत मिनी स्टेम (विज्ञान, तंत्रज्ञान अभियंता आणि गणित) विषयाचे प्रयोग करण्यासाठी अद्यावत लॅबचे उद्घाटन दिनांक २६ ऑगष्ट रोजी सकाळी १० वाजता माजी प्राचार्य माधव गादेकर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

या वेळी कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी. पी. सुर्यवंशी,मुख्याध्यापक गोपाळ एनकफळे,प्रा, रामकृष्ण सम्मुखराव,शालेय समिती अध्यक्ष संगमेश्वर कसबे,उपाध्यक्ष सरफराज कुरेशी, मुख्याध्यापिका धनश्री शर्मिला,मिना देवकते,मायाताई सोरटे, कोमेश कसबे,आदींची प्रमुख उपस्थीती होती.

या वेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विशाखा चव्हाण यांनी शाळेमध्ये स्टेम ची कशी उभारणी झाली , तसेच या शाळेतून अनेक विद्यार्थी उत्कृष्ट खेडाळू या विद्यालयाने घडविले असून या विद्यालयातून अनेक वेळी केंद्र व तालूक्यात अनेक विद्यार्थी दहावीत प्रथम आल्याचे सांगीतले.सर्व मान्यवर शाळेच्या प्रगती अहवाला मुळे समाधानी झाले. या वेळी माजी प्राचार्य गादेकर म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानात सखोल अनुभव आधारीत शिक्षण देण्यासाठी हे स्टेम लॅब लर्निंग सेंटर तयार करण्यात आले आहे ,याचा प्रतेक विद्यार्थांनी लाभ घेतला पाहीजे. इथून भविष्यात राष्ट्रासाठी वैज्ञानिक निर्माण झाले पाहिजे. यासाठी शिक्षक वृंद व शिक्षण समितीने विशेष प्रयत्न करावेत.

या वेळी कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी म्हणाले की,ग्रामीण भागातील विद्यार्थी असतात त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने प्रयोग करण्याची संधी मिळाली पाहिजे. या उद्देशाने चाईल्ड राइट्स अँड यू .मुंबई



### संक्षिप्त वृत्त...

## जमियत ए उलेमा हिंद कमिटी अध्यक्षपदी मौलाना असलम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
जमियत ए उलेमा हिंदच्या रेणापूर शहर अध्यक्षपदी मौलाना असलम हाशमअली सय्यद यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. रेणापूर येथील सराय मस्जिद (मरकज) येथे जमियत ए उलेमा हिंद लातूर जिल्हा जनरल सेक्रेटरी मुफ्ती ओवैससाब कासमी यांच्या अध्यक्षतेखाली व मराठवाडा उपाध्यक्ष कारी शमशुल हक्कसाब, रेणापूर तालुका उपाध्यक्ष मौलाना अजिमोद्दीनसाब (पानगाव) यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच बैठक संपन्न झाली. यात रेणापूर शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली. शहर कार्यकारिणीमध्ये शहराध्यक्ष मौलाना अस्लम सय्यद, उपाध्यक्ष हाफेज अतिक इलाहीबक्षसाब सय्यद, सचिवपदी मौलाना अश्रफ गप्फारसाब शेख, सहसचिवपदी रफीक अब्दुलसाब शेख, मारूफ गैबुसाब आतार शाहरुख डावरगांवकर, खजिनदार अलताफ निजोमोद्दीन बागवान, मोहसीन रशीद शेख यांची निवड करण्यात आली. यावेळी मतीनअली सय्यद, सलीम बागवान, शफीभाई शेख, युनुस बागवान, बाबा आतार आदी उपस्थित होते.

## आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत कृषि महाविद्यालयाचा संघ विजेता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, लातूर मुलांचा संघ दि. २५ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठस्तरीय खो-खो स्पर्धेत विजेता ठरला. कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी खो-खो

संघातील खेळाडू शिंदे रुतुराज, यु पवन, राखुंडे कार्तिक, चोपडे सचिन, वाघ नागेश्वर, अनेबोईनवाड पवन, पवार सुजल, अनंतवार रामेश्वर, हजारे प्रद्युम्न, पवार अजित, येरगट्टे शुभम व एडके विजय यांचे व त्यांच्या संघ मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी डॉ. व्यंकट जगताप, जिमखाना उपाध्यक्षा डॉ. ज्योती देशमुख, डॉ. राजेश शेळके, डॉ. पद्माकर वाडीकर, डॉ. दयानंद मोरे, डॉ. अनिलकुमार कांबळे, डॉ. नितीन तांबोळी, प्रा. भगवान कांबळे, डॉ. अजित पुरी, प्रा. ममता पतंगे आणि संघ व्यवस्थापक डॉ. प्रभाकर आडसूळ उपस्थित होते. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरु प्रा. (डॉ.) इंद्र मणि, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. भगवान आसेवार व कुलसचिव संतोष वेणीकर यांनी खेळाडूंच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

## सीएनजीचा सुरळीत पुरवठा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
लातूर : शहरासह जिल्ह्यात सीएनजीचा पुरवठा मुबलक प्रमाणात करावा, अशी मागणी भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष वल्लभ वावरे यांनी महानगर गॅस लिमिटेड तथा युनियन एन्व्हायरो प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापकांकडे केली आहे. महानगर गॅसने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व सीएनजी पंपसाठी लागणारा इंधन पुरवठा सुरळीत, मुबलक प्रमाणात करावा. नागरिक, वाहनधारकांची गैरसोय होऊ नये. सध्या सणासुदीचे दिवस सुरू आहेत. या काळात प्रवास वाढतो. सीएनजी पंपावर इंधन संपले असे फलक पाहण्यास मिळतात. त्यामुळे वाहनधारकांची गैरसोय होते. सीएनजी पंपावर इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी वावरे यांनी केली आहे.

## निलंगा तालुक्यातील कलांडीत दोन घरे पडली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
लातूर जिल्ह्यात रात्री झालेल्या पावसामुळे निलंगा तालुक्यातील कलांडी गावात दोन घरे पडली असल्याचे वृत्त आहे. रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे निलंगा तालुक्यात मौजे कलांडी येथील उत्तम बाजीराव सुर्यवंशी, भगवान रावसाहेब सुर्यवंशी यांच्या घराची भिंत पडून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याच भिंतीला लागून रस्त्यावर उभा केलेल्या व्यंकट पंढरीनाथ सुर्यवंशी, सचिन नागनाथ सूर्यवंशी यांच्या दोन मोटारसायकली ढिगा-याखाली अडकून नुकसान झाले आहे. अतिवृष्टीने पडलेल्या घरांचा तात्काळ पंचनामा करून शासकीय मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## लातुरात गावठी पिस्तूलसह १७ जीवंत काडतुसे जप्त



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
गस्तीवर असलेल्या विवेकानंद चौक ठाण्याच्या पोलीस पथकाने शहरातील नवीन रेणापूर नाका ते डी मार्ट रोडवर बेकायदेशीररित्या गावठी पिस्तूल आणि १७ जीवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीस मंगळवारी रात्री सव्वा एक वाजण्याच्या सुमारास अटक केली. त्याच्याकडून दुचाकीसह १ लाख ९३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
आगामी सण, उत्सव काळात शांतता अबाधित राखण्यासाठी दहशत निर्माण करणारे, रेकॉर्डवरील गुन्हेगार, अवैधरित्या शस्त्र बाळगणारे गुन्हेगार यांची माहिती काढून कार्यवाही करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हाभरात कार्यवाही सुरू आहे. विवेकानंद चौक पोलीस ठाण्यातील पथक मंगळवारी रात्री गस्तीवर होते. दरम्यान, नवीन रेणापूर नाका ते डी मार्ट रोडवर एका इसमाकडे गावठी पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. पथकाने रात्री सव्वा एक वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणी सापळा रचून दुचाकीसह थांबलेल्या संशयिताला ताब्यात घेतले. त्याने अलोक विश्वनाथ चौधरी (वय ३६, रा. आंबा हनुमानजवळ, अंबाजोगाई रोड, लातूर) असे नाव सांगितले. त्याच्या ताब्यात असलेल्या स्कुटीच्या (एमएच २४ एएन ३२४०) डिक्कीची पाहणी केली असता, डिक्कीमध्ये बेकायदेशीर गावठी पिस्तूल आणि १७ जीवंत काडतुसे आढळून आली. त्याच्याकडून दुचाकीसह पिस्तूल आणि काडतुसे असा १ लाख ९३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमान जप्त करण्यात आला. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात त्याच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## आयुष्मान कार्डसाठी जिल्ह्यात विशेष मोहीम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व नागरिकांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांचे १ हजार ३५६ आजारांवर मोफत उपचार मिळणार आहेत. यासाठी जिल्ह्यातील ५८ रुग्णांलयांची निवड करण्यात आली आहे. आयुष्मान वय वंदना योजनेअंतर्गत ७० वर्षे आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ५ लाख रुपयांचे मोफत उपचार मिळणार आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड आणि आयुष्मान वय वंदना कार्ड अत्यावश्यक आहे. यासाठी दि. १६ ऑगस्ट ते दि. ७ सप्टेंबर या कालावधीत विशेष मोहीम राबवली जात आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत ७ लाख ७७ हजार आयुष्मान कार्ड तयार झाले आहेत. उर्वरित नागरिकांनी त्वरित आपले कार्ड तयार करून घ्यावेत. हे कार्ड बनविण्यासाठी अद्ययावत शिधापत्रिका, आधार कार्ड आणि आधार क्रमांकाला जोडलेला मोबाईल क्रमांक, ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करण्यासाठी आधार कार्ड आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. नागरिक स्वतः गुगल प्ले स्टोअरवरून आयुष्मान अॅप डाऊनलोड करून बेनिफिशियरी

## मांजरा प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरु; सहा वक्र दरवाजे उघडले



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
प्रतिनिधी- मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणीपातळीत वाढ झाली आहे. धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी बुधवारी रात्री ११ वाजता गेट क्रमांक ३, ४, २ व ५ (हे ४ गेट) ०.२५ मीटरने उघडण्यात आले आहेत. सध्या एकूण सहा दरवाजे उघडले आहेत.
सद्यस्थितीत मांजरा धरणाच्या सांडव्याची ६ वक्रद्वारे (क्र.१,२,३,४, ५ व ६) ०.२५ मीटर ने उघडली असून मांजरा नदीपात्रात ५२४१.४२ क्युसेक्स (१४८.४४क्युमेक्स) इतका विसर्ग सूरू आहे.
धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे, कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येणार आहे. नदी काठावरील पुरामुळे बाधित होणा-या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शहरात साकारला पिंपळ झाडाचा गणपती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
अंबाजोगाई रस्त्यावरील एसटी वर्कशॉपशेजारी असलेल्या पिंपळाच्या झाडाला विविध साहित्याचा वापर करून श्री गणरायाचे स्वरूप साकारून त्याचे पूजन करण्यात आले.
कलाशिक्षक बाळासाहेब बावणे यांच्या मार्गदर्शनाखाली आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन सदस्यांनी विनासजावट, विनारोषणाईच्या अनोख्या गणरायाचे कौतुक होत आहे. वृक्षारोपण, संगोपन, परिसर स्वच्छता, कचरा, पाणी आडवा, पाणी जिरवा, प्लॅस्टिक बाटल्यांचा पुनर्वापर, प्रदूषण, वाहतूक सुरक्षा आदींसह महिन्यातून एक दिवस नो व्हेईकल डे पाळा, रस्त्यावर कुठेही थुंकू नका, परिसरातील झाडांना पाणी द्या अशा विविध प्रबोधनात्मक पोस्टरद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. पिंपळ झाडाच्या गणपतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना झाड मोफत देण्यात येत असल्याची माहिती गणेशोत्सवाचे अध्यक्ष नागसेन कांबळे यांनी दिली.

## 'केशवराज'मध्ये ढोल ताशांच्या गजरात श्री गणेशाचे आगमन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
येथील श्री केशवराज विद्यालयात बुधवारी ढोल ताशांच्या गजरात विधिवत पूजा करून मंगलमय वातावरणात विघ्नहर्त्या श्री गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

दांडिया, लेझीम, ढोल ताशांच्या गजरात श्री गणेशाचे विद्यालयात झाले. पर्यावरणपूरक श्री गणेशाच्या मूर्तीची विधिवत पूजा करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक उमाकांत मद्रेवार आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपूरकर, उपाध्यक्षा शैलजा हसबे, पालक अभिजीत हुडे, जगदीश पंडित, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, विद्यार्थी गणेश मंडळातील सदस्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यशस्वीतेसाठी अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, गणेशोत्सव प्रमुख वैशाली फुलसे, सहप्रमुख दीपाली मुचाटे, विद्यार्थी गणेश मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## 'राजमाता जिजामाता'त 'विघ्नहर्त्या'ची आरती




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात बुधवारी 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'चा गजर करत संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून विघ्नहर्त्या गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

प्रारंभी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये व प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते बाप्पांची आरती करण्यात आली. यावेळी उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, पर्यवेक्षिका सुनीता जवळे, मदन धुमाळ, आर. पी. मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लातूर जिल्हा बँकेच्या मुख्यालयात 'श्रीं'ची स्थापना



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
किसान बँक स्टाफ गणेश मंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लातूर जिल्हा बँकेच्या टिळकनगर येथील मुख्यालयात 'गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया'च्या जयघोषात उत्साहाच्या वातावरणात 'श्रीं'ची स्थापना करण्यात आली.

यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन अॅड. प्रमोद जाधव आणि रेखा जाधव यांच्या हस्ते सपत्निक विधिवत लाडक्या गणरायाची पूजा करून आरती करण्यात आली. यानंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव, किसान बँक स्टाफ गणेश मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोल सूर्यवंशी, मंडळाचे उपाध्यक्ष ओ. बी जळकोटे, सचिव सचिन उटगे, सहसचिव प्रशांत करंजीकर, कोषाध्यक्ष सुनील पाटील, बँकेचे व्यवस्थापक जे. के. येरटे, व्यवस्थापक बी. एस. मलवाडे, हरिदास, कोळपे, खानापुरे, लक्ष्मण देशमुख, कमलाकर जाधव, वैभव काकडे, जागृती जाधव, हरिराम कुलकर्णी यांच्यासह अन्य पदाधिकारी, कर्मचारी आणि गणेश भक्त उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
जिल्ह्यात २८ ऑगस्ट रोजी सकाळी [illegible] संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये जळकोट तालुक्यात सर्वाधिक ७७.७ मिलीमीटर, तर उदगीर तालुक्यात सर्वात कमी ५० मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- ६०, औसा- ५७.३, अहमदपूर- ६२.९, निलंगा- ५०, उदगीर- ८६.९, चाकूर- ५१.७, रेणापूर- ६४.९, देवणी- ५९.२, शिरूर अनंतपाळ- ७२.७ आणि जळकोट- ७७.९ मिलीमीटर. पावसाची नोंद झाली आहे. तसेच २९ महसूल मंडळात ६५ मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

## लातूर जिल्ह्यातून हजारो मराठा समाजबांधव मुंबईकडे रवाना



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२८ ऑगस्ट -**
'छत्रपती शिवरायांचा जयजयकार', 'एक मराठा, लाख मराठा', 'मनोज दादा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं' अशा घोषणा देत छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून लातूर जिल्ह्यातील गावागावांतून हजारो मराठे मनोज जरांगे यांच्यासमवेत मुंबईला जाण्यासाठी बुधवारी अंतरवाली सराटीकडे मार्गस्थ झाले. अनेकांनी तर अगदी मध्यरात्रीपासून अंतरवाली सराटीचा रस्ता धरला होता. आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबई सोडायची नाही, आता हाच आपला निर्धार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लातूर शहरात बुधवारी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात अनेक मराठा बांधव आले त्यांनी छत्रपती शिवरायांना अभिवादन केले. छत्रपती शिवराय तसेच आरक्षण समर्थनाच्या त्यांनी जोरदार घोषणा दिल्या. यावेळी त्यांना पाठवण्यासाठी समाजबांधव आले होते. या नियोजित आंदोलनाची जोरदार पूर्वतयारी करण्यात आली होती. टेम्पो, ट्रक, जीप, खासगी बसेस बुक करण्यात आल्या होत्या. प्रत्येक वाहनावर लावण्यात आलेले स्टिकर्स, बॅनर्स लक्ष वेधत होते. बुधवारी मार्गस्थ झालेल्या बांधवांनी त्यांना किमान १५ दिवस पुरेल एवढा शिधा, स्वयंपाकासाठी लागणारे साहित्य सोबत घेतले आहे. एका मोठ्या वाहनात हे साहित्य असून, आचारीही सोबत आहेत. दरम्यान, बुधवारी अनेक स्थानिक समाजबांधवांनी मार्गावर चहा-नाष्ट्याची सोय केल्याचे समाजबांधवांनी सांगितले. बुधवारी रात्री अनेकजण शिवनेरीकडे मार्गस्थ झाले.

तेथून ते मनोज जरांगे पाटील यांच्यासमवेत जाणार आहेत. अनेक मराठा बांधवांची मनोज जरांगे पाटील यांच्यासमवेत अगदी त्यांच्या सोबत असलेल्या पहिल्या ताफ्यात जाण्याची इच्छा होती. अंतरवाली सराटीचे अंतर व जरांगे यांची मुंबईस जाण्याची वेळ पाहता आपली इच्छा पूर्ण होणार नाही, हे ओळखून मध्यरात्रीच अनेक वाहने अंतरवालीला मार्गस्थ झाली.

## टॉप १% श्रीमंत लोक या ग्रूमिंग रितीरिवाजांचे पालन करतात

मुंबई - तुम्ही कधी विचार केला आहे का की काही लोक खोलीत प्रवेश करताच सर्वांचे लक्ष का आकर्षित करतात? त्यांच्याकडे सर्वात महागडे कपडे किंवा सर्वात आलिशान कार असणे आवश्यक नाही. तरीही त्यांची उपस्थिती इतकी मजबूत आहे की लोक आपोआप त्यांना नेते मानतात. डेन्व्हर हा भारतातील या तत्वज्ञानाचे नेतृत्व करणाऱ्या ब्रँडपैकी एक आहे - एक ग्रूमिंग ब्रँड जो महत्वाकांक्षी, परिष्कृत आणि शाहरुख खान सारख्या प्रतिष्ठित सेलिब्रिटींशी संबंधित आहे. तर, चला ५ ग्रूमिंग रितीरिवाजांवर एक नजर टाकूया ज्यामुळे टॉप १% लोकांना शक्तिशाली आणि आत्मविश्वासू दिसतात - आणि माझ्यावर विश्वास ठेवा, शेवटचा मुद्दा असा आहे ज्याचा तुम्ही कधीही विचार केला नसेल.

## टाटा पॉवरने राबविला हरित उपक्रम

छत्रपती संभाजीनगर : भारताची सर्वात मोठी एकत्रित वीज कंपनी टाटा पॉवर ने शाश्वत विकास आणि समाजाभिमुख उपक्रमांबद्दलची आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित करत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा विविध प्रकल्प, ऑपरेशन्स आणि मेंटेनन्स केंद्रांसह आसपासच्या समाजघटकांमध्ये आयोजित केल्या.महाराष्ट्रात गणेशोत्सवाची तयारी जोरात सुरू असताना, टाटा पॉवरने नैसर्गिक, रसायनमुक्त आणि बियाणे रोपण असलेल्या मूर्तींचा प्रचार करून उत्सव हरित करण्याचा मार्ग दाखवला आहे. या कार्यशाळांदरम्यान ख्यातनाम कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली २५० हून अधिक शाश्वत गणेशमूर्ती हाताने साकारल्या गेल्या. या मूर्ती विसर्जनानंतर पाण्यात सहज विरघळतात आणि त्यामधील बियाण्यांपासून रोपे उगवतात. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण न होता जिवंत हरित वारसा मागे राहतो.

## अभिनेत्रींनी सोडण्याची इच्छा असलेल्या सवयींबाबत सांगितले!

नको असलेल्या सवयींबाबत आपल्या सर्वांना संघर्ष करावा लागतो आणि आपल्या आवडत्या एण्ड टीव्ही अभिनेत्री देखील याला अपवाद नाहीत. लाइट्स, कॅमेरे व उत्तम अभिनयापलीकडे त्यांच्या देखील काही सवयी आहेत, ज्यापासून सोडवून घेण्याची त्यांची इच्छा आहे. यापैकी काही सवयी तणावामुळे लागल्या आहेत, तर काही सवयी त्यांच्या दैनंदिन नित्यक्रमाचा भाग बनल्या आहेत. पण प्रत्येक अभिनेत्रीने त्या सवयी सोडण्याचा निश्चय केला आहे. सतत फोनवर स्क्रॉलिंग करण्यापासून नखे चावणे किंवा मध्यरात्री स्नॅक्सचा आस्वाद घेण्यापर्यंत त्यांनी दिलेल्या कबूलीमधून अशा सवयी जाणून घेता आल्या.

## विवोने 'इमॅजिन अवॉर्ड्स'च्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा

नवी दिल्ली : गेल्या वर्षीच्या प्रचंड यशानंतर, नाविन्यपूर्ण जागतिक स्मार्टफोन ब्रँड विवोने 'विवो इमॅजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्स'च्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. या स्पर्धेचे उद्दिष्ट सर्जनशीलता साजरी करणे आणि छायाचित्रकार आणि फोटोग्राफी उत्साहींना स्मार्टफोन लेन्सद्वारे त्यांचे अद्वितीय दृष्टिकोन सामायिक करण्यासाठी आमंत्रित करणे आहे. या आवृत्तीसह, विवो हे व्यासपीठ भारतातील फोटोग्राफी समुदायासाठी वाढण्यासाठी, शिकण्यासाठी आणि त्यांच्या कल्पना सामायिक करण्यासाठी एक व्यासपीठ बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते जेणेकरून स्मार्टफोन फोटोग्राफी कथाकथन आणि आत्म-अभिव्यक्तीसाठी एक शक्तिशाली साधन बनू शकेल. जागतिक स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने विवो इमॅजिन स्मार्टफोन फोटोग्राफी पुरस्कारांच्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा केली, जी कल्पनाशक्तीच्या आनंदाचा उत्सव आहे आणि देशभरातील छायाचित्रकार आणि छायाचित्रण प्रेमींना स्मार्टफोन कॅमेऱ्यांद्वारे जग पाहण्याचा त्यांचा अनोखा दृष्टिकोन सामायिक करण्यासाठी आमंत्रित केले आहे. यावेळी, विवो हे व्यासपीठ भारतातील फोटोग्राफी समुदायासाठी एक उत्प्रेरक म्हणून स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवते, जिथे स्मार्टफोन फोटोग्राफी कथाकथन आणि आत्म-अभिव्यक्तीसाठी एक शक्तिशाली साधन बनते.

## कोणीतरी बनणार लव्ह गुरू, तर कोणीतरी खलनायक

एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'मध्ये रोमांस, ड्रामा आणि खलनायक यांनी भरलेल्या एपिसोड्ससह प्रेक्षक हसून-हसून लोटपोट होणार आहेत. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''धोबीला ऋतिकच्या (आर्यन प्रजापती) पँटच्या खिशामध्ये पत्र सापडते आणि तो ते पत्र राजेशला (गीतांजली मिश्रा) देतो. राजेशला वाटते की अखेर तिचा मुलगा मोठा झाला आहे, म्हणून ती आनंदित होत धोबीला ते पत्र वाचायला सांगते. पण, हे सर्व पाहत असलेला हप्पू (योगेश त्रिपाठी) त्याबाबत गैरसमज करून घेतो. त्याला संशय येतो की, राजेशच्या मनात धोबीबाबत प्रेम आहे.

## कलाकारांनी त्यांच्या पाळीव प्राण्यांबाबत सांगितले

कुत्रे पाळीव प्राण्यांपेक्षा अधिक आहेत, ते तणाव दूर करणारे आणि अतूट प्रेमाचे सोबती आहेत. यंदा इंटरनॅशनल डॉग डे निमित्त एण्ड टीव्हीवरील आपले लाडके कलाकार त्यांच्या पाळीव प्राण्यांसोबतचे खास नाते आणि ते आसपास असताना जीवन कशाप्रकारे आनंददायी होते याबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत पारस अरोरा (जीतू, 'घरवाली पेडवाली'), गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि सोमा राठोड (अम्मा, 'भाबीजी घर पर है'). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील पारस अरोरा ऊर्फ जीतू म्हणाले, माझ्या जिवलग मित्राकडे दोन कुत्रे आहेत, डस्टी व ओरियो आणि मला ते खूप आवडतात. ते माझ्यासाठी कुटुंबासारखे आहेत आणि वेळ मिळाला की मी त्यांच्यासोबत वेळ व्यतित करतो. त्यांच्यासोबत धावतो, त्यांना फिरायला घेऊन जातो, त्यांच्याजवळ प्रेमाने बसतो. हे क्षण मला खूप आनंद देतात. त्यांनी माझ्यावर बिनशर्त केलेले प्रेम व ऊर्जा अत्यंत हृदयस्पर्शी आहे.''

## गणपती बाप्पाचे आगमन

भारतात सर्वात जल्लोषात व आनंदात साजरा केला जाणारा सण गणेशोत्सव जवळ आला आहे आणि उत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. रस्त्यांवर विद्युत रोषणाई करण्यापासून घरांमध्ये भक्तीगीते गुंजण्यापर्यंत सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. एण्ड टीव्ही कलाकार देखील उत्साहात हा सण साजरा करण्याची तयारी करत आहेत, आपल्या व्यस्त वेळापत्रकामधून वेळ काढत भक्ती, आनंद व सर्जनशीलतेसह बाप्पाचे स्वागत करण्यास सज्ज आहेत. हे कलाकार आहेत नीहारिका रॉय (सावी, 'घरवाली पेडवाली'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये सावीची भूमिका साकारताना पाहायला मिळणाऱ्या नीहारिका रॉय म्हणाल्या, आम्ही घरी गणपती बाप्पााला आणत नसलो तरी मला माझ्या मित्रमैत्रिणींच्या घरी साजरीकरणामध्ये सामील होणे आवडते. गणेश चतुर्थी सण आकर्षक सजावट, संगीत व भक्तीमय वातावरणासह माझे लक्ष वेधून घेतो.

## नव्या गोंधळाची सुरुवात

प्रेरणादायक कथानक आणि भावनात्मक दृष्ट्या समृद्ध व्यक्तिरेखा यांच्यामुळे सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेने प्रेक्षकांचे मन काबिज केले आहे. पुष्पा (करुणा पांडे) आपले वकील बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपड करत आहे, पण येथेही तिच्यासमोर नवी आव्हाने येत आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नातेसंबंधांचीही परीक्षा होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये आपण पाहिले की, जुगल (अंशुल त्रिवेदी) आणि पुष्पा कादंबरी (वृंदा त्रिवेदी)च्या गरोदरपणाच्या अहवालाची प्रतीक्षा करत आहेत.

## बनारसी बोली शिकून भूमिकेत आणला खरेपणा

झी टीव्हीची आगामी मालिका 'गंगा माई की बेटियां' ही एका हृदयस्पर्शी कथेला उलगडते. पतीने मुलगा न झाल्यामुळे सोडून दिलेल्या आईची ही कहाणी आहे जी आपल्या मुलींना सामर्थ्य, शालीनता आणि आत्मसन्मानाने वाढवते. या मालिकेत गंगा माईची भूमिका अनुभवी अभिनेत्री शुभांगी लाटकर साकारत आहेत, तर त्यांची मोठी मुलगी 'सहाना'च्या भूमिकेत सृष्टी जैन दिसणार आहे.

# प्राचीन नागघाटावर ऋषी पंचमी उत्सव साजरा



तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ :- पैठणनगरीच्या प्राचीन नागघाटावर ऋषीपंचमी निमित्य हजारो महिला भाविकांनी गोदावरीच्या वाहत्या पाण्यात स्नान करून येथील सप्त ऋषी शिलेचे पूजन करून ऋषी पंचमी उत्सव मोठया आनंदाने साजरा केला.

दक्षिण काशीतील श्रीक्षेत्र पैठण नगरीतील नागघाट तिर्थावलीवर ऋषी,मुनी तपस्वी यांनी त्रेता युगापासुन जप,तप आणि तपश्चर्या केल्यामुळे दि.२८ गुरुवारी ऋषी पंचमी पर्वावर पहाटेपासून महिलांनी गोदावरी स्नान करून ऋषी पंचमी पूरोहितांच्या मंत्रघोषात साजरी केली. हा उत्सव पैठणच्या नागघाटावर शेकडो वर्षांपासून रुढी परंपरा पासून नियमित चालत आलेला आहे. अशी माहिती पैठण येथील पुरोहित कुंभमेळ्याचे प्रमुख कमलाकर बुवा शिवपुरी यांनी दिली.

ऋषी मुनी तपस्वी यांनी महिलांचे जीवन सुखमय व्हावे म्हणून त्यांना आर्शिवाद दिलेले असल्यामुळे महिला हा उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा करतात.

# अंतरवाली सराटी - पैठण मार्गे मराठा वादळ मुंबईकडे



तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ :- मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज पाटील जरांगे हे आरक्षणासाठी मुंबईच्या आजाद मैदानावर उपोषणाला बसणार असून ते आपल्या अंतरवाली सराटी येथून बुधवारी पैठण - शेवगाव मार्गे मुंबई कडे हजारो वाहनांच्या ताफ्यात लाखो मराठा समाज बांधवांसह रावना झाले आहेत. तत्पूर्वी त्यांचा पैठण शहागड फाट्यावर पैठण सकल मराठा समाजाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी पैठणहून सुध्दा हजारो मराठा सेवक जरांगे यांच्यासोबत सहभागी झाले आहेत.आरक्षण मिळाल्याशिवाय आता माघार नाही असे यावेळी जरांगे म्हणाले.

अंतरवाली सराटी ते पैठण शेवगाव नगर चाकण मार्गे मनोज जरांगे पाटील हे लाखो मराठा बांधवांसह मुंबईकडे रवाना झाले आहेत, पैठण येथे शहागड फाट्यावर त्यांच्या स्वागतासाठी मोठमोठे फलक व बॅनर लावण्यात आले होते, तर जेसीबी द्वारे त्यांच्यावर भव्य पुष्पवृष्टी करण्यात आली सकाळी ११ वाजता मनोज जरांगे हे पैठणला येणार होते मात्र जागोजागी समाज बांधवांकडून त्यांचे गावागावात मोठे स्वागत होत असल्यामुळे सायंकाळी ७ वाजता ते पैठणच्या शहागड फाट्यावर पोहचले.

यावेळी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने मुंबईकडे कूच करणार्या कार्यकर्त्यांच्या नाश्त्याची व पिण्याच्या पाण्याची योग्य प्रकारे सोयी केल्याने मुंबईकडे जाणाऱ्या मोर्चेकर्यांचा प्रवास सुकर होत होता, पुढे हा मोर्चा शेवगाव, नगर, आळेफाटा, चाकण मार्गे मुंबईकडे मार्गस्थ झाला यावेळी जिल्हा पोलीस प्रशासनाने मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त संपूर्ण पैठण शहरासह शहागड फाट्यावर तैनात केला होता, मराठा मोर्चेकरी हे देखील मोर्चेकर्यांशी सौहार्दपणे वागत होते, तर सर्वसामान्यांना याचा त्रास होणार नाही याची दक्षता या ठिकाणी पुर्णपणे घेतली गेली.दरम्यान वडवाळी जवळ रस्त्यावर आंदोलकांचे चारचाकी वाहन पलटी झाल्याने त्यातील सात ते आठ आंदोलकांना मुका मार लागला. जखमींना उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले.

# सामुदायिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर - विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम- छ. संभाजी नगर गणेश महासंघ आणि वरद गणेश मंदिर यांचा स्तुत्य उपक्रम. अथर्वशीर्षाचे आध्यात्मिक महत्त्व खूप मोठे आहे. अथर्वशीर्ष पठनामुळे नकारात्मकतात दूर होते, आत्मज्ञान प्राप्त होते. अथर्वशीर्ष पठणामुळे बुद्धीला स्थिरता येते संपत्ती आणि समृद्धी लाभते. जो व्यक्ती दररोज याचे पठण करतो त्याला भरपूर पैसा साधन संपत्ती आणि ऐश्वर्य प्राप्त होते हा भाग लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाने मागील वर्षीपासून हा उपक्रम हातात घेतला असून याही वर्षी छत्रपती संभाजीनगर गणेश महासंघ वरद गणेश मंदिर यांना सोबत घेऊन पुनश्च एकदा गुरुवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात वाजता वरद गणेश समोर सामुदायिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम संपन्न झाला.

या वेळी व्यासपीठावर गणेश महासंघाचे अध्यक्ष अनिकेत निलावार वरद गणेश मंदिराचे अध्यक्ष सुनील खोचे अरविंद तेलवाडकर, भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे,विश्व हिंदू परिषद शहराध्यक्ष सुशीलजी भारुका, विश्व हिंदू परिषद मंदिर आयामाचे प्रांत संपर्क प्रमुख राजीव जहागीरदार उपस्थित होते

राजीव जहागिरदार यांनी प्रास्ताविक केले गणेश महासंघातर्फे अनिकेत निलावार यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ अनुराधा पुराणिक यांनी केले.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.२८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून आंतर शालेय व आंतर महाविद्यालय स्पर्धेचे उद्घाटन एमजीएम स्पोर्ट्स क्लब अँड स्टेडियम येथे भारतीय क्रीडा प्राधिकरण छत्रपती संभाजीनगरच्या सहाय्यक संचालिका डॉ. मोनिका घुगे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी, परीक्षा नियंत्रक डॉ. एच. एच. शिंदे, उपकुलसचिव डॉ. परमिंदर कौर, प्रा.आर. आर.देशमुख, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ. दिनेश वंजारे,प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. मोनिका घुगे म्हणाल्या, हॉकीचे जादूगर असणारे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आपण दरवर्षी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करत असतो. यानिमित्त आज एमजीएम विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या सर्व खेळाडूंचे मी सर्वप्रथम अभिनंदन करते. आणि ज्यांना या स्पर्धेमध्ये यश मिळाले नाही त्यांना हे लक्षात ठेवले पाहिजे की, जीवनात यश - अपयश हे कायम नसते.

प्रत्येकांनी एक खेळ खेळणे आवश्यक आहे. स्वस्थ शरीर असेल तर मन स्थिर असेल आणि मन स्थिर असेल तर आध्यात्मिक प्रगती होईल. आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी खेळ आवश्यक आहे. आपण भारत विश्वगुरु म्हणतो, त्याचीही सुरूवात खेळापासून होते, असे डॉ. मोनिका घुगे यांनी सांगितले.

जलतरण स्पर्धेचा उद्घाटन सोहळा संपन्न झाल्यानंतर मान्यवरांनी रायफल शूटिंग आणि बुद्धिबळ स्पर्धेच्या ठिकाणी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी केले.

या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी डॉ. शशिकांत सिंग, डॉ.श्रीनिवास मोतीयेळे, जॉय थॉमस, डॉ. सदाशिव जव्हेरी, डॉ.रहीम खान, विलास राजपूत,हर्षदा नीठवे, सुनील चव्हाण, निलेश खरे, निरंजन फडके, आनंद राजहंस, लक्ष्मण सूर्यवंशी, अर्जुन तोडके, भाऊसाहेब फुले आदींनी परिश्रम घेतले.

# बिडकीन डि.एम.आय.सी क्षेत्रात कामगार कायद्यासह विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करा

## छावा मराठवाडा अध्यक्ष मनोज मुरदारे कामगार उपायुक्तांना दिले निवेदन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ ऑगस्ट - पैठण तालुक्यातील बिडकीन डि.एम.आय.सी क्षेत्रात झपाट्याने वाढ होत असुन विविध मोठमोठ्या कंपन्यांची उभारणी अंतीम टप्प्यात आहे. बिडकीन येथे सुरू असलेल्या बिडकीन डीएमआयसीत सध्या अपघाताचे प्रमाण वाढले असून सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या ठिकाणी नवनवीन कंपन्यांची उभारणी सुरू असून परप्रांतीय कामगारांचा भरणा मोठ्या प्रमाणात आहे.यामध्ये अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेकांची जीवित हानी झाली आहे.तसेच काही कामगार जखमी होऊन त्यांना कायमचे अपंगत्व आले आहे.

यामध्ये परप्रांतीय कामगार असल्याने कंपनीत झालेल्या अपघाताचे प्रकरण पोलीस ठाण्यात नोंद न करता जागेवरच दडपण्यात येते.त्यामुळे या औद्योगिक क्षेत्रात कामगार कायद्याची व सुरक्षेची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्यात यावा.कामगारांच्या सुरक्षेसाठी कामगार सुरक्षा अधिकारी व कामगार उपायुक्त कार्यालयाकडून विविध प्रशिक्षण शिबिरे घेण्यात यावी.पैठण ते छत्रपती संभाजीनगर या मुख्य रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून त्यामुळे बिडकीन गावातून होणाऱ्या वाहतुकीत बदल करण्यात आला असून ती वाहतूक डीएमआयसी औद्योगिक क्षेत्रातून पैठण कडे वळविण्यात आली आहे.त्यामुळे या क्षेत्रात वाहन अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून आज पर्यंत १५ ते २० वाहनधारकांचा निष्पाप बळी गेला आहे.

त्यामुळे वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बिडकीन डीएमआयसी औद्योगिक कार्यक्षेत्रात पोलिस अधीक्षक ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशावरून स्वतंत्र बिडकीन औद्योगिक पोलिस ठाणे प्रस्तावित करण्यात येऊन तात्काळ मान्यता देण्यात यावी तसेच बिडकीन डीएमआयसी कार्यक्षेत्रात संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा.वरील मागण्याची दखल घेऊन बिडकीन डीएमआयसी मध्ये वरील मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सूचना देण्यात येऊन कार्यवाही करण्यात यावी तसेच

पैठण तालुक्यातील बिडकीन डि.एम. आय.सी क्षेत्रात विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात यावी.नसता छावा महाराष्ट्र सेनेच्या वतीने प्रशासना विरोधात तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा छावा महाराष्ट्र सेनेचे मराठवाडा प्रमुख मनोज पाटील मुरदारे, राष्ट्रीय छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख किरण काळे पाटील,फाहज चाऊस यांनी दिला आहे.


**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,

E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in

विभाग : बांधकाम विभाग, जा.क्र.नपा/१४७५/२०२५-२६ दिनांक : २८/०८/२०२५

**फेर ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सन २०२५-२६**

मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली (दुरध्वनी क्र. ०२४५६-२२१७२७) ई-मेल coud.hingoli@maharashtra.gov.in अनुभवी किंवा नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन दलित्तेतर योजने अंतर्गत जलेश्वर तलावात पाणी सोडणे करीता नाला वांधकाम करणे. एकुण ०१ कामांकरीता निविदा कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे ई-टेंडरींग पध्दतीने दिनांक ८/९/२०२५ वेळ संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत एकुण ०१ कामाच्या निविदा मागवित आहे. निविदा विषयी तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.in व दिनांक २९/८/२०२५ रोजी संपुर्ण माहिती व अटी व शर्तीसह दुपारी ५.०० वाजता पासुन पहावयास मिळेल.

नगर अभियंता, हिंगोली नगरपरिषद, हिंगोली — मुख्याधिकारी हिंगोली नगरपरिषद, हिंगोली

**गा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २२८/२०२५.

अर्जदारः १) करिश्मा शरीफ तडवी ययः २८ वर्षे, धंदा घरकाम रा. शेवाळे (वाडी) ता. पाधोरा जि. जळगाव २) राबीया बशीर तडवी ययः ५७ वर्षे, धंदाः घरकाम ३) सलमान बशीर तडवी ययः ३३ वर्षे, धंदाः मजुरी दोन्ही रा. निंबायती ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. बशीर नासीर तडवी हे दिनांकः- ०८/०९/२०२० ला मौजे पहुर पेठ ता. जामनेर जि. जळगाव येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक २४/०९/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- २८/०८/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २०८/२०२५.

अर्जदारः- १) आंनदा तुकाराम सोनवणे यय-६२ वर्षे धदा-मजुरी रा.ठाणा ता.सोयगाव जिऔरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

/ विरुध्द //

गैरअर्जदारः-निरक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. गोपाबाई तुकाराम सोनवणे ही दिनांकः २१/०९/२०१२ ला मौजे ठाणा ता.सोयगाव जि.औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक २०/०९/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : २८/०८/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: १९१/२०२५.

अर्जदारः १) कासाबाई बंडु सोनवणे वयः ७५ वर्षे, धंदाः- शेती. २) कडुबा बंडु सोनवणे वयः-५८ वर्षे, धंदाः- शेती. ३) साहेबराव बंडु सोनवणे वय ५६ वर्षे धंदा शेती, ४) रतन बंडु सोनवणे वय ५२ वर्षे धंदा-शेती, वरील सर्व रा. गलवाडा (अ) ता. सोयगांव जि औरंगाबाद (छ. संभाजीनगर)

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे बंडु किसन सोनवणे हे दि. ०१/०६/२०१७ ला मौजे गलवाडा (अ) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक :-१६/९/२०२५)

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः २८/८/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- १४७/२०२५.

अर्जदारः नशिशनबाई उर्फ नशीशाबाई मजित तडवी, ययः ६९ वर्षे, धंदा मजुरी २) अजीज मजीत उर्फ मज्नीद तडवी, ययः ३३ वर्षे, धंदा मजुरी. ३) शकील मजीत उर्फ मज्नीद तडवी, ययः २५ वर्षे, धंदाः मजुरी.वरील सर्व अर्जदार रा. बहुलखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)४) रजिया साडु तडवी, वय ४१ वर्षे, धंदाः मजुरी, रा. सांगवी ता. जामनेर जि. जळगांव५) नजमा आकोश तडवी, वयः ३९ वर्षे, धंदाः मजुरी, रा. वाकोद ता. जामनेर जि. जळगांव ६) शबाना अलीम तडवी, वयः ३८ वर्षे, धंदाः मजुरी, रा. चिंचखेडा ता. जामनेर जि. जळगांव. ७) शकीला जाबीर तडवी, वयः ४० वर्षे, धंदाः मजुरी, रा. शिंदाड ता. पाचोरा जि. जळगांव४) सुलताना राजु तडवी, वयः ३१ वर्षे, धंदाः मजुरी, रा. फर्दापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. मजीत उर्फ मज्नीद नथु तडवी, हे दिनांकः २७/०६/२०१८ ला मौजे बहुलखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनाक १२/९/२०२५)

तरी, ज्या कोणाचा अर्जदाराच्या असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः२८/८/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

## अग्रलेख...

# विदेशींना देऊया स्वदेशीचा दणका!

सध्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प 'टॅरिफ' या मुद्यावर भारताला धमकावत आहेत. अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या भारतीय उत्पादनांवरील आयात शुल्क वाढवायचे व त्यांच्या किमती वाढल्या की खप कमी होईल, असे ट्रम्प यांचे गणित आहे. पण, भारतानेही या धमकीला भीक न घालता आपल्या पद्धतीने प्रत्युत्तर द्यायचे ठरविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. जयशंकर टॅरिफविषयक धमक्यांना ठाम उत्तर देत आहेत. देशवासीयांमध्ये जागृती करण्याचे काम पंतप्रधान दररोज करीत आहेतच. भारतीय नागरिकांनी स्वदेशीचा वापर वाढविल्यास आपोआपच विदेशी, त्यातही विशेषकरून अमेरिकी उत्पादनांचा वापर कमी होईल आणि अमेरिकेला उत्तरही मिळेल, अशी पंतप्रधानांची अपेक्षा. ती योग्य आहे. भारतीय नागरिकांमध्ये या विषयावर बऱ्यापैकी जागृती होत असल्याचेही समाज माध्यमांवर जाणवत आहे. अमेरिकी उत्पादनांना दणका दिला तर ट्रम्प यांची हेकडी सरळ व्हायला वेळ लागणार नाही. कारण अमेरिकी उत्पादनांसाठी खंडप्राय भारत देश ही फार मोठी बाजारपेठ आहे ही वस्तुस्थिती आहे.

भारतात स्वदेशी किंवा स्वदेशीचा वापर हा मुद्दा मुळीच नवीन नाही आहे. तो शंभर वर्षांपूर्वी इंग्रजांची राजवट असतानाही महत्त्वाचा मुद्दा ठरला होता. भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ परकीय सत्तेविरुद्धचा राजकीय संघर्ष नव्हता. तो एक व्यापक सामाजिक-आर्थिक क्रांतीचा लढा होता. या लढ्यातील दोन संकल्पना सर्वाधिक महत्त्वाच्या ठरल्या होत्या- स्वराज्य आणि स्वदेशी. स्वराज्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य, तर स्वदेशी म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य. महात्मा गांधींनीही स्पष्टपणे सांगितले होते, राजकीय स्वातंत्र्य केवळ तेव्हाच खरे मानले जाईल, जेव्हा ते आर्थिक स्वातंत्र्यावर आधारलेले असेल. ब्रिटिशांनी भारतीय कापड उद्योग मोडून काढण्यासाठी जाणीवपूर्वक उपाय केले. भारतातून स्वस्तात कच्चा कापूस इंग्लंडला नेला जाई. तेथे कापड तयार करून ते भारतात महागात विकले जाई. त्यामुळे भारतीय विणकर व कारागीर बेरोजगार झाले. भारतीयांवर भारी कर लादले गेले. इंग्रजांच्या संरक्षणाखाली परकीय वस्तू स्वस्तात बाजारात येऊ लागल्या. परिणामी देशी वस्तू महाग व परकीय वस्तू स्वस्त वाटू लागल्या. इंग्रजांनी पाश्चात्त्य वस्तू म्हणजे दर्जेदार आणि देशी म्हणजे निकृष्ट, अशी मानसिकता भारतीयांमध्ये रुजविली. ही मानसिक गुलामगिरी स्वदेशी आंदोलनासाठी मोठा अडथळा ठरली.

१९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. त्यामुळे भारतीय समाजात प्रचंड असंतोष पसरला. या फाळणीविरोधी आंदोलनात स्वदेशी ही संकल्पना अग्रभागी आली. लाल-बाल-पाल या त्रिकुटाने, म्हणजेच लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल व लाला लजपतराय यांनी जनतेला स्वदेशीचा नारा दिला. त्याचे घोषवाक्य झाले- 'स्वदेशी वस्तू वापरा, परकीय वस्तूंचा बहिष्कार करा.' त्याकाळी लोकांनी परदेशी कपड्यांची होळी केली. शाळा-कॉलेजांमध्ये स्वदेशी शिक्षणसंस्था स्थापन केल्या गेल्या. साबण, माचिस, कपडे, कागद, पेन यांसारख्या वस्तूंचे देशी उद्योग उभे राहिले. या आंदोलनाचा परिणाम असा झाला की राष्ट्रीय चेतना जागृत झाली, स्वदेशी उद्योगांची वाढ झाली आणि आर्थिक बहिष्कार हा राजकीय आंदोलनात शस्त्र म्हणून वापरला गेला. परदेशी कपड्यांची होळी करण्यासाठी महिला घराघरांतून बाहेर पडल्या. युवकांनी स्वदेशी उद्योग उभारण्याचे काम हातात घेतले. स्वदेशी वस्तूंचा प्रचार करण्यासाठी नाटके, गाणी, कीर्तने, व्याख्याने आयोजित केली जाऊ लागली. या साऱ्यांचा फार चांगला परिणाम भारताच्या अर्थकारणावर झाला. १९९१ मध्ये भारतावर आर्थिक संकट आले. परकीय चलनसाठा संपला होता. पी. व्ही. नरसिंहराव सरकारमधील अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या तत्त्वांवर आधारित धोरणे स्वीकारली. प्रचंड आकाराच्या भारतीय बाजारपेठेची ताकद जगासमोर खुली झाली. परिणामी कोका कोला, पेप्सी, प्रॉक्टर अँण्ड गॅम्बल, नेस्ले, युनिलिव्हर अशा मोठ्या कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत बस्तान बसवले. स्वदेशी उद्योगांवर दबाव आला. स्थानिक साबण, शीतपेये, टूथपेस्ट, वस्त्रोद्योग यांना स्पर्धा झेपेना. अनेक जुने देशी ब्रॅण्ड बंद पडले. परकीय कंपन्यांनी आधुनिक मार्केटिंग व दर्जेदार उत्पादनांमुळे ग्राहकांचा विश्वास जिंकला. स्वदेशी उत्पादक मागे पडले. या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रेरित स्वदेशी जागरण मंच पुढे आले. त्यांनी परकीय कंपन्यांविरुद्ध चळवळी उभारल्या. त्यामुळे स्वदेशीचा मुद्दा पुन्हा जनतेसमोर आला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात क्रांतिकारी अशी ओळख मिळवणारे राजीव दीक्षित यांनी स्वदेशी चळवळ बळकट केली. त्यांनी या चळवळीला आक्रमक भूमिका दिली. 'स्वदेशी म्हणजेच आझादी' अशी भूमिका मांडून आझादी बचाव आंदोलन देशभर पोचवले. भारतीय ग्राहक चळवळीचे प्रणेते बिंदुमाधव जोशी यांनी ग्राहक हक्कांसोबतच स्वदेशीची भूमिका तेवढ्याच जोरकसपणे मांडली. गांधीजींनी स्वातंत्र्यापूर्वी 'मीठ' हे एक प्रतीक स्वीकारून जनजागृती केली होती. तशीच भूमिका जोशी यांनी मांडली. 'कोलगेट' या विदेशी टूथपेस्टवर बहिष्कार टाका, असे मीठ आंदोलनासारखे स्वरूप त्यांनी जनमानसासमोर ठेवले. विदेशी म्हणजे काय, विदेशी नेमके कोण, हे सांगून त्यांनी भारतातील बाजारपेठेच्या मोठ्या भागावर अधिराज्य गाजविणाऱ्या पन्नासावर विदेशी कंपन्यांची आणि त्यांच्या हजारांहून जास्त उत्पादनांची नावेच जाहीर केली. ते म्हणत की, 'एक वेळ रावणाशी लढणे सोपे आहे कारण ते खुले युद्ध आहे. पण हे सुवर्ण हरिणाचे मोहक रूप घेऊन आलेल्या मारीच राक्षसाशी मायावी युद्ध करावे लागते. जाहिरातींचा प्रचंड मारा करून, नावीन्य व आधुनिकतेच्या नावाखाली हजारो वस्तू आपल्या भारतीयांच्या घरात घुसवून विदेशी कंपन्या रोज एक-एक बाजार ताब्यात घेत आहेत आणि भारताच्या समृद्धीचे गड-किल्ले उद्ध्वस्त करीत आहेत.'

आता, ट्रम्प तात्यांच्या लहरीपणाच्या पृष्ठभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत' आणि 'व्होकल फॉर लोकल' हे दोन प्रभावी नारे दिले आहेत. त्यांचा अर्थ स्वदेशीच. आपल्या देशात अनेक वस्तूंची बाजारपेठ अमेरिकेसह इतर देशांनी बळकवली आहे. कोलगेट, क्लोजअप, सर्फ, रिन, लक्स, विम, लाईफबॉय, रेड लेबल, कॅडबरी, नेस्कॅफे, बोर्नव्हिटा, हॉर्लिक्स, व्हिक्स, आयोडेक्स, टाईड, एरियल, मॅगी ही सारी नावे, एवढेच नव्हे तर काही गोंडस भारतीय नावे असलेले खाद्यपदार्थ देखील विदेशी मूळ असलेल्या कंपन्यांनी तयार केलेले आहेत, हे आपण लक्षात ठेवायलाच हवे. आपल्या पोटात घुसून कचरा करणारे कोकाकोला, डोमिनोज, केएफसी, पिझ्झा हट असे सारेच विदेशी आक्रमक आहेत. अनेक वस्तू घरबसल्या बोटांची हालचाल करून घरपोच मागवून देणाऱ्या ऑनलाईन पेमेंट कंपन्या किंवा ॲमेझॉनसारख्या एजंट कंपन्या देखील विदेशी हात बळकट करणाऱ्याच आहेत, हेही भारतीयांनी लक्षात ठेवायला हवे. अगदी रस्त्यांवर मिळणाऱ्या अनेक वस्तू बहुसंख्येने चिनी आहेत, हेही आपल्याला माहीत असायला हवे. महागड्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या बाजारातसुद्धा विदेशी कंपन्यांचे प्राबल्य आहे. हे सारे आक्रमण एकाएकी दूर होणार नाही. त्यासाठी टप्प्याटप्प्याने जावे लागेल. सणासुदी व त्यानंतरच्या लग्नसराई काळ हा भारतात अर्थकारणाला बळकटी देणारा काळ असतो. या काळात भारतीयांनी आग्रहपूर्वक स्वदेशीचा उद्गार आणि अंगीकार केला पाहिजे. येत्या तीन-चार महिन्यांत विदेशी आणि स्वदेशी या फरकाकडे सर्व भारतीयांनी लक्षच ठेवायला हवे. कापड, रेडिमेड यांत भारत मोठा निर्यातदार आहे. त्यामुळे आपण विदेशी कपड्यांकडे ढुंकूनही पाहण्याची गरज नाही. पणत्या, दीपमाळा, तोरण, हार, मखर, फटाके अशा कित्येक चिल्लर वस्तूंवर चिनी आक्रमण झाले आहे. ते आपण थोपवू शकतो. अपरिहार्य असल्याखेरीज आपली खरेदी अमेरिकन, चिनी किंवा अन्य देशांतील कंपन्यांना बळकटी देणारी नसावी, याची काळजी घेणे ही सुद्धा देशभक्तीच आहे. आपली स्वतःची बाजारपेठ आणि क्रयशक्ती एवढी मोठी आहे की, भारताला कुणाच्या दारात उभे राहण्याची गरज नाही. आम्ही माल तयार करू शकतो आणि त्याची बाजारपेठही चालवू शकतो, हे दाखवून देण्याचा हा प्रसंग आहे. पुन्हा एकदा स्वदेशीचा दणका देण्याची ही वेळ आहे.

## प्रासंगिक

**डॉ. नंदिनी कडुस्कर**

# ऋषिपंचमी : ऋषींना अभिवादन

'ऋषी' शब्द ऐकताच आपल्या डोळ्यापुढे कुठल्या तरी झाडाखाली बऱ्याच काळापासून तपोमग्न, आत्मतेजाने उजळत असलेली, विश्वकल्याणाची कामना विश्वदेवाकडे करीत असलेली मूर्ती तरळते. एवढे 'तपः स्वाध्याय निरतः' राहून तेजोपासना करतात, हेच भारतीयत्व आहे. 'भा' म्हणजे प्रकाश, भासमान करणे, बुद्धीचे तेज.

'आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।'

संपूर्ण ब्रह्मांडाला जे तेज व्यापून असते, त्याला विष्णू, आदित्य, सूर्य-रवी, अंशुमान असे भगवद्गीतेत म्हटलेय. आत्मज्योतीचे तेज पिंडाला म्हणजे मनुष्यदेहाला जाणीव रूपाने व्यापून असते; अशा पिंड-ब्रह्मांडाला प्रकाशित करणाऱ्या तेजाला ('अहमात्मा गुडाकेश सर्व भूताशयः स्थितः' भ. गीता, 'सूर्य आत्मा जगतःस्तस्तुषश्च' - पुरुषसूक्त) ब्रह्मांडाचा स्वामी-आत्मा-सत्-सत्य म्हणतात. त्याचा साक्षात्कार होण्यासाठी नामसाधना म्हणजे तप लागते. वेद ज्ञान होणे; ते ज्यांना झाले त्यांना 'ऋषी' म्हणतात. वेदज्ञानाच्या योगे प्राप्त झालेली सफल प्रायोगिकताच ऋषींच्या ज्ञानाची व्याप्ती व विशेषता प्रकट करते. विशेषतांमुळे ऋषी, ब्रह्मर्षी, महर्षी, देवर्षी, राजर्षी, खंडर्षी, परमर्षी असे सप्तर्षी झाले.

सर्वप्रथम संपूर्ण वेद ब्रह्मदेवांना ऐकू आले. अनंत कोटी ब्रह्मांडाचे ज्ञान वेदात आहे. वेद मंत्र वेगवेगळ्या काळात कधी अनेक ऋषींना कधी एखाद्याला ऐकू आले. श्रवणाच्या माध्यमातून ऐकल्याने वेदमंत्रांना 'श्रुती' ऐकू आलेले मंत्र अर्थासह स्मरण करून लिहून ठेवले; त्या ग्रंथांना 'स्मृती' म्हणतात. मंत्र ज्यांना ऐकू आले त्या ऋषींचे नाव 'माध्यम.' म्हणून वेदातील त्या सूक्तापुढे आलेय. वेदांचे कोणीही रचयिता नाही, ते 'अपौरुषेय' आहेत. त्यामुळे नावासाठी ऋषींमध्ये अहमहमिकाही कधी नव्हती. ऋषी सूर्योपासक असल्याने त्रिकाळ संध्योपासना ते करीत. भृगु, अगस्त्य, गौतम, कपिलमहामुनी, वाल्मीकि, क्रतु, अंगीरस आदी अनेक ऋषी होऊन गेलेत. महर्षी भृगुंनी अग्नीचा शोध लावला. भृगुवंशीय म्हणजेच भार्गव. याच वंशात विष्णूंचा अवतार भार्गवराम, मातृपितृभक्त परशुराम झाले. महर्षी च्यवन याच कुळातले. आयुर्वेदात शरीरविज्ञान शाखेत यांनी अद्भुत शोध लावले. महर्षी गौतमांनी शिवशंकराला त्याच्या जटेतून गंगेची एक धारा (गोदावरी) ब्रह्मगिरीवर कुशावर्तात सोडण्यास आपल्या तपाने विवश केले. भारतीय षड्दर्शनातील न्यायशास्त्र गौतमांनी व सांख्यशास्त्र कपिलांनी सांगितले.



कपिलांनी ज्ञानचक्षूंनी हिमालयावरील गंगेचा शोध घेतला. गंगेला भागीरथी नाव मिळाले. भारत सुजलाम् झाला. महर्षी वाल्मीकिंनी रामायण महाकाव्यातून श्रीराम हा साक्षात धर्माचा अवतार, युगप्रवर्तक, मर्यादा पुरुषोत्तम, आदर्श राजाचे (पुरा परंपरा वक्ति पुराणं तत् प्रशस्यते) आर्य संस्कृतीचे, परंपरांचे दर्शन करविले. त्यांचेच शिष्य महर्षी भरद्वाज हे शास्त्रज्ञ असल्याने विमानांची निर्मिती केली. सर्व प्रकारच्या वनस्पतींचे रोपण संवर्धन, विशेष प्रक्रियेने संशोधन करून सर्वकाली फळणारी झाडं आपल्या आसमंतातील चैत्ररथ वनात वाढविली. रावणाला मारून राम अयोध्येत परत जाताना बरोबर असलेल्या वानरांची भूक भागविण्यासाठी मार्गात अशीच बारमाही फळणारी झाडं राहोत, असा वर रामांना भरद्वाजांनी दिला.

पूर्वी वेदाप्रमाणे पुराणही एकच होते. पुढे त्यांच्या विषयानुसार मंत्रार्थानुसार ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्व, साम हे ४ वेद व १८ पुराणे असे विभाग केले. ऋग्वेदातून शरीर, आरोग्यविषयक ज्ञानाच्या ऋचा वेगळ्या करून 'आयुर्वेद' हा उपवेद झाला. पिण्ड ब्रह्मांडाच्या स्थूलसूक्ष्म रूपाचे ज्ञान असल्याने त्यांच्या ज्ञानाचा आवाका मोठा असल्याने त्यांना महर्षी वेदव्यास म्हणतात. जगद्गुरू श्रीकृष्णाचे दर्शन घडविणारे, विश्वाचे सांस्कृतिक, पौराणिक, खागोलिक, भौगोलिक सर्व ज्ञान देणारे असे भागवत, महाभारत हे दोन महान ग्रंथ त्यांनी जगाला दिले. व्यासांनी जे सांगितले तेच पुढील सर्वच ज्ञानियांनी टीका रूपाने सांगितले. म्हणूनच 'व्यासोच्छिष्ठं जगत्रयं' म्हणतात. परब्रह्माला स्वदेहाच्या ठिकाणी अनुभवणाऱ्या आणि वेदमंत्र जाणणाऱ्या ऋषींना ब्रह्मर्षी म्हणतात. व्यासांनी आश्रमात बसून कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या निमित्ताने जगाला सांगितलेले भगवद्गीतेचे ज्ञान ऐकले आणि दूरदृष्टीने युद्ध पाहिले. हीच दूरदृष्टी त्यांनी त्यांचा शिष्य संजयला दिली; जिच्या योगे त्याने आंधळ्या धृतराष्ट्राला कुरुक्षेत्रावरील युद्धाचे प्रत्यक्ष समालोचन ऐकविले.

महर्षी अगस्ती यांचेही ज्ञान अगाध होते. त्यांच्या पत्नी लोपामुद्रेच्या नावे काही सूक्त वेदात आहेत. अगस्तींनी राम-रावण युद्धात रणांगणावर प्रकट होऊन 'आदित्यहृदय' स्तोत्र रामांना दिलं; ज्याने पुढील मार्ग प्रकाशित होईल म्हणाले आणि एक अभिमंत्रित असा अमोघ बाण रावणाच्या नाभीत मारण्यास दिला. त्याच बाणाने रावण मेला. तसेच कार्तिकेयाला ज्ञान अगस्तींनी दिले. वसिष्ठ, वामदेव, कश्यप, गौतम, विश्वामित्र, कुशिक, अत्री, भरद्वाज, जमदग्नी, मेधातिथी, मुद्गल असे अनेक दीर्घायुषी ब्रह्मर्षी झाले. दशरथाला पुत्रकामेष्टी यज्ञ करा, पुत्रांची प्राप्ती होईल, असा सल्ला त्रिकालज्ञानी वसिष्ठांनीच दिला. तो फळला. वसिष्ठांचा मोठा मुलगा सुयज्ञाने श्रीरामांना धनुर्वेद निपुण केले. दुराचारी रावणाला मारण्यासाठी रामाला विश्वामित्रांजवळच्या सर्व विद्या, त्यांचे मार्गदर्शन जे त्यांच्याच सहवासाने प्राप्त होणार म्हणून दूरदर्शी वसिष्ठांनी दशरथाला समजविले. तेव्हा विश्वामित्रांबरोबर राम-लक्ष्मणाला यज्ञ रक्षणास पाठविण्यास दशरथ तयार झाले. पुढे रावण वधानंतर राम अयोध्येत आल्यावर आदराने म्हणतात -

**'गुरु वसिष्ठ कुल पूज्य हमारे । जिनके बल दनुज वन मारे ॥**

वसिष्ठांनी शरयू नदी शराने अयोध्येकडे वाहवत आणली. विदर्भात वरदा/वसिष्ठा त्यांनीच आणल्याचे पुराणात आहे. श्रीरामांना आत्मज्ञान वसिष्ठांनी दिले. 'योगवासिष्ठ' ग्रंथ लिहिला. ब्रह्मांडावर शासन करताना देवाचे पार्षद म्हणून जे जे ऋषी कार्य करतात, त्यांना देवर्षी म्हणतात. कण्व, कश्यप हे देवर्षी होते. कश्यपांना प्रजापती म्हणतात. पृथ्वीवरील सर्व सजीव ही त्यांचीच निर्मिती असल्याने पृथ्वीला काश्यपी हे नाव त्यांच्यामुळेच पडले. कण्वांनी शकुंतलेला (मानसकन्या) सासरी पाठवताना सांसारिक स्त्रीने घरात कसे वागावे? यासाठी केलेला उपदेश भारतीय कुटुंब व्यवस्था सांभाळण्यासाठी सर्व काळी उपकारक ठरला. त्याचे प्रतिबिंब कविकुलगुरू कालिदासांच्या वाङ्मयात पडले. देवर्षींना 'नारद ही माझी विभूती आहे' श्रीकृष्ण गीतेत सांगतात. नारदांचा अधिकार, महती सांगणारी प्रमाणं सर्वच पुराणकथांमधून व कीर्तनकारांच्या मुखातून नामकथा गंगा 'पोखीत तीरीचे पादप' या न्यायाने पावन करीत या पृथ्वीतलावर वाहतच आहे. कलियुगात मात्र वेद मंत्र कुणालाही ऐकू येत नाहीत. कारण कलेर्दोषनिधे! परंतु वेदज्ञ व आत्मसाक्षात्कारी संत या भूतलावर जे झाले त्या सर्वांना ऋषीच म्हणावे लागेल. संत गजानन महाराजांनी अनेक वेळा वेद मंत्र म्हणून दाखवून चुकीचे मंत्रोच्चारण करणाऱ्यांच्या चुकांची दुरुस्ती केली. लेखक दासगणूंनी त्यांना ऋषीच म्हटले-

'भाद्रपद मासी । ऋषी पंचमी या दिवशी ।
आधुनिक काळचा हा ऋषी । समाधिस्थ जाहला ॥ (६४ गजानन विजय.)

हे ज्ञानसूर्य ऋषी अमरत्वाकडे नेणाऱ्या वाटा नेहमीच उजळत राहिले. त्यांचे स्मरण करून कृतज्ञतेने नमन करण्याचा हा दिवस.

९४२१७०१५६२

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# रस्ते खड्डेमुक्त की भ्रष्टाचारमुक्त?

देशाच्या प्रत्येक कोपऱ्यातील शहरांना, गावांना राष्ट्रीय महामार्गांनी जोडून दिल्याचे श्रेय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जाते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज भारतातील महामार्ग चकचकीत झाले आहेत, राज्यातून राज्य सहजगत्या जोडले जात आहे. महामार्गांवरून प्रवास करताना 'खड्डेमुक्त भारत' हे खरेपणाने जाणवते, म्हणूनच जनमानसात गडकरींना प्रेमाने रोडकरी म्हणून ओळखले जाते. मात्र, या उज्ज्वल चित्राच्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रातील शहरांचे अंतर्गत रस्ते पाहिले की ते पूर्णतः विरुद्ध दृश्य डोळ्यांसमोर येते. शहरातील रस्ते खड्ड्यांनी विद्रूप झालेले, पावसाळा आला की चिखल, उन्हाळा आला की धुळीचे ढग आणि या सगळ्याचा त्रास सामान्य नागरिकांना सोसावा लागतो. खरेतर शहरांच्या अंतर्गत रस्त्यांसाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो. विकासकामांच्या नावाखाली पथकर, कर, करप्रकार करून नागरिकांकडून पैसा गोळा केला जातो. पण याच पैशाचा उपयोग करून जे काम केले जाते त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो. एकच रस्ता, एकच नाली वारंवार केली जाते. दोन वर्ष टिकणे तर दूर, सहा महिन्यातच रस्ते उखडायला लागतात. सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते असूनही काही महिन्यांत त्यावरची गिट्टी उघडी पडते. डांबरी रस्ते तर पावसाच्या पहिल्याच सरींनी चिखलमय होतात. हा सगळा प्रकार नागरिकांच्या डोळ्यांसमोर घडतो आणि तरीदेखील जबाबदारांकडे याविषयी संवेदनशीलता दिसत नाही. सध्या राज्यभरातील कंत्राटदार संघटना आंदोलनाच्या तयारीत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की शासनाकडे जवळपास ९० हजार कोटींची बिले थकित आहेत. केवळ गडचिरोली जिल्ह्यातील कंत्राटदारांचे तब्बल पंधराशे कोटी रुपये शासनाकडे अडकून पडले आहेत. शासनाने वेळेत बिले दिली पाहिजेत, याबाबत शंका नाही. कंत्राटदारांना काम पूर्ण केल्यावर त्यांचा मोबदला योग्यवेळी मिळाला पाहिजे हे शासनाचे कर्तव्यच आहे. पण केवळ थकित बिले हा एकमेव मुद्दा मानून आंदोलन उभारणारे कंत्राटदार आपल्या जबाबदाऱ्या विसरले आहेत का, हा प्रश्न उपस्थित होतो. कारण शासनाचे पैसे थकित असले तरी जनतेचे पैसे वाया गेले आहेत याची जबाबदारी कोणाची? खरे पाहता समस्या केवळ शासनाची नाही, समस्या ही संगनमताची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील अनेक अधिकारी व ठेकेदार हातात हात घालून शासनाला लुटत आहेत. कामाच्या निविदा काढल्या जातात, टेंडर दिले जाते, कोट्यवधींचा निधी मंजूर होतो, पण जमिनीवर दिसणारे काम हे निकृष्ट दर्जाचेच असते. अधिकारी डोळेझाक करतात, कंत्राटदार दर्जा सांभाळत नाहीत आणि लोकप्रतिनिधी स्वतःच्या राजकीय सोयीसाठी या सगळ्याकडे कानाडोळा करतात. त्यामुळे भ्रष्टाचाराची साखळी अशी घट्ट विणली गेली आहे की शेवटी नुकसान नागरिकांचेच होते.

आज एखाद्या शहरातील रस्त्यांवरून फिरा आणि पाहा-रस्ते आहेत की खड्ड्यांचा पट्टा, हे ओळखणे कठीण होते. वाहनचालकांचा जीव धोक्यात येतो, पादचारी जखमी होतात, अपघात होतात. धुळीमुळे आजार वाढतात, खड्ड्यांमुळे आर्थिक नुकसान होते. हे सर्व लोकांच्या पैशाने तयार केलेल्या रस्त्यांवरच घडते. जर एखादे काम दर्जेदार झाले असते तर नागरिकांना हा त्रास भोगावा लागला नसता. मग प्रश्न उरतो, नागरिकांनी आपले हक्क मागण्यासाठी आंदोलन करायचे का? आज ठेकेदार आंदोलनाची भाषा करतात कारण त्यांना आपले पैसे हवे आहेत. परंतु याच ठेकेदारांनी केलेली निकृष्ट दर्जाची कामे हा आंदोलनाचा वेगळाच मुद्दा आहे. जर ठेकेदारांनी काम प्रामाणिकपणे केले असते, दर्जा पाळला असता, तर नागरिकही त्यांच्या पाठीशी उभे राहिले असते. पण वास्तव वेगळे आहे. कामे उघड्या डोळ्यांनी पाहिली की भ्रष्टाचार स्पष्ट जाणवतो. अशा वेळी ठेकेदारांनाही विचारले पाहिजे की तुम्हाला केवळ पैसे कमवायचे आहेत का? की समाजाप्रति, राज्याप्रति तुमची काही जबाबदारी आहे? शासनाने बिले द्यावीत हे सत्य आहे. पण कंत्राटदारांनी कामाचा दर्जा टिकवला पाहिजे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी जबाबदारीने काम पाहिले पाहिजे. अन्यथा, भ्रष्टाचाराचे हे सगळे चक्र नागरिकांच्या जीवावर उलटणार आहे. आज जनता सहन करते आहे कारण तिला दुसरा मार्ग नाही. पण भविष्यात जर सामान्य नागरिकांनीच आंदोलन उभारले तर त्याचा रोष केवळ ठेकेदारांवरच नव्हे तर शासन, अधिकारी आणि लोकप्रतिनिधींवरही ओढवणार आहे. लोकांच्या सहनशीलतेचा अंत झाला की रस्त्यांवर उतरणाऱ्या जनतेसमोर कोणतेही आंदोलन टिकणार नाही. विकासाच्या नावाखाली होणारा हा भ्रष्टाचार थांबवला गेला नाही तर उद्याच्या पिढ्या शासनालाही माफ करणार नाहीत आणि ठेकेदारांनाही वाचवणार नाहीत.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राजकारणाचे शुद्धीकरण करणारे विधेयक

पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्राचे तसेच राज्यांचे मंत्री ३० दिवस तुरुंगात राहत असतील तर त्यांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेले १३० वे घटनादुरुस्ती विधेयक सरकारने संसदेत सादर केल्यामुळे विरोधी पक्षांच्या गोटात खळबळ उडाली आहे. सरकार हे विधेयक लोकसभेत सादर करत असताना विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. मात्र सरकारने हे विधेयक सादर केले. विरोधकांच्या भूमिकेमुळे हे विधेयक संयुक्त सांसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याची घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केली. ३१ सदस्यीय संयुक्त सांसदीय समितीत लोकसभेचे २१ तर राज्यसभेचे १० सदस्य राहणार आहेत. या समितीतील सदस्यांच्या नावांची घोषणा अद्याप झाली नाही. मात्र या समितीत सहभागी होण्यास आप, तृणमूल काँग्रेस आणि समाजवादी पक्ष यांनी नकार दिला आहे. त्यामुळे आता काँग्रेसही या समितीवर बहिष्कार घालेल, असे वाटत आहे. या विधेयकाचा फटका ज्या पक्षांच्या नेत्यांना बसण्याची शक्यता आहे, त्यांनीच या समितीत सहभागी होण्यास नकार दिला, असे दिसते.

आपल्या देशात आतापर्यंत अनेक माजी पंतप्रधानांवर गुन्हे दाखल करण्यात आले, त्यांना तुरुंगातही जावे लागले, पण एकाही पंतप्रधानावर अशी वेळ आली नाही. मात्र अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांवर आणि मंत्र्यांवर ते पदावर असताना गुन्हे दाखल झाले, त्यांना तुरुंगात जावे लागले, ही वस्तुस्थिती आहे. राजकारणाच्या शुद्धीकरणाच्या गोष्टी आपल्या देशात केल्या जातात, पण त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर त्याला मात्र विरोध केला जातो. आपल्या राजकारणाचा आणि समाजजीवनाचा हा दुटप्पीपणा म्हटला पाहिजे. एखाद्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला आणि त्याला तुरुंगात असताना ३० दिवसपर्यंत जामीन मिळाला नाही तर ३१ व्या दिवशी त्याला पदावरून आपोआप हटवण्याची तरतूद या विधेयकात आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात नंतर त्यांची निर्दोष सुटका झाली तर तो पदावर परत येऊ शकतो. मात्र एकदा कोणाचेही पद गेले तर त्याने पदावर परत येणे आपल्याकडे वाटते तितके सोपे नाही. विशेष म्हणजे राजकीय आंदोलनातील गुन्ह्यासाठी अशी तरतूद नाही.

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म (एडीआर) च्या एका अहवालानुसार देशातील ३० पैकी १२ मुख्यमंत्र्यांच्या विरोधात फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. तर यातील १० म्हणजे ३० टक्के मुख्यमंत्र्यावर हत्येचा प्रयत्न, अपहरण आणि भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. यातील काही नेत्यांवर बलात्काराचे आरोप आहेत की नाही, ते मात्र समजले नाही. आपल्या देशात भ्रष्टाचाराच्या आरोपावरून अनेक माजी मुख्यमंत्र्यांना आतापर्यंत अटक झाली. यात बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव, तामिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री जयललिता, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह आणखी काही जणांचा समावेश आहे. विशेष म्हणजे लालूप्रसाद यादव, जयललिता आणि हेमंत सोरेन यांच्यावर मुख्यमंत्री असताना फौजदारी गुन्हा दाखल झाला होता, मात्र अटक व्हायच्या आधी या सर्वांनी जनाची नाही तर मनाची म्हणून का लाज होईना, आपल्या पदाचा राजीनामा दिला. पण केजरीवाल यांनी तर आपल्याला जनाची सोडा, पण मनाचीही लाज नसल्याचे दाखवून दिले. अरविंद केजरीवाल देशातील एकमेव असे नेते म्हणायला पाहिजे, ज्यांना मुख्यमंत्री पदावर असताना अटक झाली आणि मुख्यमंत्री म्हणून तुरुंगाचा पाहुणचारही घ्यावा लागला.

अटक व्हायच्या आधी केजरीवाल यांनी पदाचा राजीनामा दिला असता तर मोदी सरकारवर हे विधेयक आणण्याची वेळ आली नसती. त्यामुळे या विधेयकामागचे खऱ्या अर्थाने शिल्पकार हे केजरीवाल यांना म्हणावे लागेल. या विधेयकाचे सहशिल्पकार म्हणून द्रमुकचे मंत्री सेंथील बालाजी यांचा समावेश आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपात अटक झाल्यानंतर बालाजी आठ महिने तुरुंगात होते, पण त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला नाही. नंतर न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना नाईलाजाने राजीनामा द्यावा लागला. एक पदासीन मुख्यमंत्री आणि मंत्री तुरुंगात राहतो, त्यामुळे या व्यक्तीची नाही तर तो त्या पदावर आहे, त्या घटनात्मक पदाची बदनामी होते. देशातील सर्वांत जास्त फौजदारी गुन्हे काँग्रेस नेते आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यावर आहेत. त्यांच्यावर ८९ गुन्हे दाखल आहेत. त्या खालोखाल दुसऱ्या स्थानावर ४७ गुन्ह्यांसह तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुक नेते एम. के. स्टॅलिन आहेत. तिसऱ्या स्थानावर तेलगू देसमचे नेते आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आहेत. त्यांच्यावर १९ गुन्हे दाखल आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि काँग्रेसनेते सिद्धरामय्या १३ गुन्ह्यांसह चौथ्या स्थानावर आहेत. ५ गुन्ह्यांसह झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन पाचव्या स्थानावर आहेत. म्हणजे सर्वांत जास्त गुन्हे दाखल असलेल्या देशातील पहिल्या पाच मुख्यमंत्र्यांत दोन काँग्रेसचे आहेत. द्रमुक, तेलगू देसम आणि झामुमोचा प्रत्येकी एक मुख्यमंत्री आहेत. आणि काँग्रेसच या विधेयकाला विरोध करत आहे. रेवंत रेड्डी, स्टॅलिन, चंद्राबाबू नायडू आणि सिद्धारामय्या या चार मुख्यमंत्र्यांना अद्याप तुरुंगात जावे लागले नाही. या मालिकेतील हेमंत सोरेन यांनाच फक्त तुरुंगाची वारी करावी लागली.

भ्रष्टाचाराच्या आरोपात तुरुंगात राहावे लागल्यामध्ये प्रामुख्याने आप, तृणमूल काँग्रेसच्या मंत्र्यांचा समावेश आहे. तृणूमलच्या पाच मंत्र्यांना तर आपच्या चार मंत्र्यांना तुरुंगात जावे लागले. द्रमुक आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका मंत्र्याचा यात समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे सुब्रतो मुखर्जी, पार्थ चटर्जी, ज्योतिप्रिय मलिक, फिरहाद हकीम आणि मदन मित्रा या पाच मंत्र्यांचा यात समावेश आहे. आपचे मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, जितेंद्र तोमर यांनाही मंत्रिपदावर असताना अटक झाली. देशातील विरोधी पक्षांत थोडी जरी नैतिकता शिल्लक असेल तर त्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यायला पाहिजे. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेत रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा देणारे लालबहादूर शास्त्री कुठे आणि केजरीवाल आणि सेंथील बालाजी कुठे. ज्या रेल्वेचा अपघात झाला ती रेल्वेगाडी काही शास्त्रीजी चालवत नव्हते, पण रेल्वेमंत्री म्हणून प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी नैतिक जबाबदारी आपली आहे, हे मान्य करत त्यांनी रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिला. आणि आजच्या काळातील राजकारणी भ्रष्टाचाराच्या आरोपात अटक झाल्यानंतर तुरुंगात जाण्याची वेळ आली तरी निर्लज्जासारखे पदावर राहतात. म्हातारी मेल्याचे दुःख नाही तर काळ सोकावतो, त्याचे वाईट वाटते. त्यामुळे मोदी सरकारने जे विधेयक आणले, त्याला देशातील जनतेने पाठिंबा दिला पाहिजे. संसदेत पारित होणाऱ्या अन्य विधेयकांसारखे हे विधेयक नाही. तर या विधेयकामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होणार आहे, देशात आतापर्यंत राजकारणी कोण आणि गुन्हेगार कोण हे ओळखता येत नव्हते. राजकारणी आणि गुन्हेगार यांच्यातील आतापर्यंत अंधुक असलेली सीमारेषा या विधेयकामुळे अधिक स्पष्ट होणार आहे.

९८८१७१७८१७

### गणरायांचे मंगलमय आगमन



गणरायांचे आगमन होताच सर्वत्र उत्साह संचारला. गणरायाला निरोप देताना आपण म्हणतो पुढच्या वर्षी लवकर या. यावर्षी खरंच लवकरच आलेत. मूर्तिकार किती महिन्यांपासून मेहनत घेतात. त्यांची ही मेहनतीची कमाई असते. त्यांच्या बरोबरीने किती जणांना रोजगार मिळतो. मंडप, डेकोरेशन, फुले, फळे, भाजी, किराणा, आजकाल स्वयंपाकी, कॉन्ट्रॅक्ट घेणारे, मिठाईवाले, मोदक करून विकणारे यासह इतर सर्वांची कमाई होते. बाप्पा सगळ्यांवर प्रसन्न असतो. फक्त त्याची मनोभावे पूजा करायला हवी. त्याला प्रिय आहे गूळखोबरे, लाल फूल, शांततेसाठी दूर्वा, शमीपत्र व केवडा, हळद, कुंकू, शेंदूर, अक्षता आणि बसायला आसन. एवढे केले तरी बाप्पा प्रसन्न होतो.

पण आता लोकांनी खूप अवडंबर केले आहे. फोटोसाठी काय काय करतात. बरं पण त्यामुळे फुलवाल्यांची चांगली कमाई वाढली आहे. फुलांच्या शेतीला पणं महत्त्व आले आहे. फक्त भक्तिभाव कायम ठेवून सगंळ करा. बाप्पांची कायम कृपा राहील.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

●● ●●

### शालार्थ घोटाळा : डिजिटल फसवणूक, देणगी नव्हे!

अलिकडे शालार्थ घोटाळ्याची चर्चा जोरात आहे. पण दुर्दैवाने या घोटाळ्याचा संबंध शाळांमधील डोनेशन प्रथेशी जोडला जात आहे. ही तुलना चुकीची आहे. शालार्थ घोटाळा म्हणजे सरकारी सॉफ्टवेअरमध्ये खोटे आयडी तयार करून बनावट कर्मचारी दाखवणे आणि त्यांच्या नावाने वेतन व निधी लाटणे हा स्पष्ट डिजिटल गैरव्यवहार आहे. तर डोनेशन प्रथा ही शाळांमध्ये नोकरीसाठी पैसे देण्याची जुनी सामाजिक-आर्थिक समस्या आहे. दोन्ही प्रश्न वेगळे आहेत. डोनेशनचा मुद्दा ओढून शालार्थ घोटाळा झाकण्याचा प्रयत्न होतो आहे.

## वाचक पत्रे

त्यामुळे खरे गुन्हेगार वाचतात आणि निरपराध शिक्षक व पालकांवर दोष टाकला जातो. नागरिकांनी लक्ष ठेवावे ते खऱ्या गुन्हेगारांवर, बनावट आयडी तयार करून शासकीय निधी लुटणाऱ्यांवर. अन्यथा हा डिजिटल घोटाळा पुन्हा पुन्हा घडत राहील.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

●● ●●

### आता लोकप्रतिनिधीसुद्धा वाचणार नाहीत

'आरोपी मंत्री, मुख्यमंत्र्यांना हटविणारे विधेयक जेपीसीकडे' अशा आशयाचे वृत्त तरुण भारतात वाचले. भ्रष्टाचाराच्या तसेच गंभीर गुन्हेगारी स्वरूपाच्या आरोपाखाली सलग ३० दिवस तुरुंगात राहिल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि राज्याच्या मंत्र्यांना पदावरून हटविण्याची आणि देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी तरतूद या विधेयकात आहे. हे विधेयक सादर झाल्यानंतर संसदेत प्रचंड गदारोळ झाला आणि विरोधकांचे अतिशय लज्जास्पद वर्तन अनुभवायला मिळाले. मी कुठल्याही राजकीय पक्षाची सदस्य नाही किंवा पुरस्कर्तादेखील नाही, पण एक सामान्य नागरिक म्हणून मला असे वाटते की, या विधेयकाला विरोध कशासाठी? भ्रष्टाचारी किंवा गैरवर्तन करणारा कर्मचारी असो, मंत्री असो किंवा लोकप्रतिनिधी, तुरुंगात गेल्यावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावीत असतो. या परिस्थितीला आता कायद्याच्या चौकटीत बांधण्याचा हा प्रयत्न आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशी तरतूद आहे की, जर कर्मचारी २४ तास किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीत तुरुंगात राहिल्यास तत्काळ प्रभावाने त्या कर्मचाऱ्याला निलंबित केले जाते आणि नंतर विभागीय चौकशी करून आरोप सिद्ध झाल्यास नियमानुसार शिक्षा केली असे असताना लोकप्रतिनिधींना यातून सूट का? लोकप्रतिनिधी जरी असला तरी भ्रष्टाचारी आहे ना मग त्या व्यक्तीला पदावरून का हटविण्यात येऊ नये? या विधेयकाच्या निमित्ताने एक संदेश मात्र जनमानसात गेला आहे तो म्हणजे, नियम, कायदे फक्त सामान्य नागरिकांसाठी नाही तर लोकप्रतिनिधीसुद्धा आता गैरवर्तनातून वाचणार नाहीत. प्रत्येक लोकप्रतिनिधी जाहीररीत्या त्याला जबाबदार राहणार आहे.

विरोधक कदाचित विचार करीत असतील की या कायद्याचा पूर्वग्रहदूषित उद्देशासाठी दुरुपयोग केला जाऊ शकतो. हा त्यांचा विचार अगदीच बालिश आहे. अहो, मूल जन्माला यायच्या आधीच तुम्ही कस ठरवता की ते वाईट चालिरीतीचं राहील. त्याला जन्म घेऊ द्या, वाढू द्या आणि त्याच्या वर्तनावरून ठरवा की ते बाळ चांगले आहे की वाईट. तसेच काहीसे या विधेयकाचे आहे. प्रत्येक वेळी कायद्याचा गैरवापरच होईल हे का म्हणून गृहीत धरता?

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



## निसर्गभान

# श्रावण रंग



एक, दोन, तीन अर्णव मोजत होता. आजोबांनी अर्णवला काय मोजतो आहेस, हे विचारलं. तेव्हा जाईच्या पानावरून हळूहळू खाली घसरणाऱ्या पाण्याच्या थेंबाकडे विस्मयाने बोट दाखवत तो म्हणाला की, तो पानावरून खाली पडणारे चमचमते खडे मोजतो आहे. नुकतीच सर्रकन आलेली पावसाची सर झाडं-फुलं-पशू-पक्षी सगळ्यांना सचैल स्नान घालून गेली होती. पानापानांतून खाली पडणाऱ्या पावसाच्या थेंबातून परावर्तित होणाऱ्या प्रकाशकिरणांनी प्रत्येक थेंबाला लखलखता हिरा बनविले होते. मग पावसात आडोशाला बसूनही पावसाने भिजवलेले पंखांवरचे पाणी झटकत पक्षी परत उत्साहाने रसरसून झाडांच्या फांद्यांवर मुक्त विहार करू लागले.

**थेंब थेंब थेंब नभातून बरसती**
**पानोपानी त्यांची सुरेख नक्षी.**
**अलवार गूज रंगते पानाशी**
**हलके निसटती झुळूकीसरशी.**

सकाळी लख्ख ऊन बघून पावसाची शक्यता वाटत नसते आणि अचानक आलेल्या पावसाची सर रस्त्यावर लोकांना भिजवते. साऱ्या आसमंताला कवेत घेऊन जसा आला, तसाच पाऊस घाईने परतसुद्धा जातो आणि परत लख्खं सोनसळी ऊन पडतं. श्रावणातील ऊन-पाऊस एकमेकांच्या मागेपुढे करतात आणि त्यांच्या पकडापकडीत कधीतरी एकमेकांना मिठीत घेतात, तेव्हा निसर्ग आकाशातून वसुंधरेवर मनमोहक इंद्रधनुष्याचा पूल बांधते.

**कधी ढगांसवे मौजमस्ती**
**सूर्यकिरणांसवे लपाछपी**
**लवंडून रंगपेटी इंद्रधनुषी**
**नभीचे रंग मनात पेरसी.**

जरी प्रत्येक ऋतूमध्ये आपण सण साजरे करतो, देवाचे स्मरण करतो तरी निसर्गाच्या हिरवाईत रंगलेला, नभातल्या काळ्या-निळ्या मेघात सामावलेला, नदी नाल्यांच्या खळखळ नादात लपलेला भगवंत श्रावणात प्रत्येक मनाला जाणवतो. पंडित कवी मुक्तेश्वर म्हणतात,

**की पृथ्वीखंड त्या शाळुंका**
**अनेक पर्वत शिवपिंडीका**
**इंद्रे मांडिली अभिषेका**
**गगनपात्री जलधारा.**

किती सुंदर कविता आहे ना! इंद्राच्या आकाशरूपी अभिषेक पात्रातून रिमझिम झरणारा श्रावण जणू डोंगररूपी शिवपिंडींवर अभिषेक करतो आहे असं वाटतं. अशा महादेवाची दर सोमवारी उपासना बिल्वपत्रे व शिवामूठ वाहून करतात. नवपरिणिता पतीसाठी श्रावणात विपुल आढणारे नानापरीचे पत्री व विविधरंगी फुले वाहून मंगळागौरी पूजन करतात. दर शुक्रवारी माता करून आपल्या मुलाबाळांच्या स्वास्थ्य व दीर्घायुष्यासाठी जिवंतिका पूजन करतात.

**पावसाची बातच निराळी**
**पाने-फुले रेखती रांगोळी**
**वसुंधरेला नवी झळाळी**
**अंतरंगाची उमलली कळी.**

या पावसाने वसुंधरेला किती नटवलं, सजवलं आहे. धरेवर हिरवीगार गवताची पाती हलके-हलके डुलताहेत, रंगीबेरंगी रानफुलांची अंगडी-टोपडी त्यांच्या अंगाखांद्यावर झुलताहेत, वृक्ष-वेलींचा साज, नदीनाल्यांचा खळखळता नाद ऐकताना श्रीरंगाच्या पाव्याची धून मनात गुंजते. श्रावणातलं निळं आकाश, सोनसळी ऊन आणि अवचित येणारी पावसाची रेशमी सर तन-मन सुखावते. ऊन-पावसाच्या या पकडापकडीच्या अखंड खेळात ऊन आणि पाऊस जेव्हा एकमेकांना पकडतात अन् मिठीत घेतात तेव्हा त्या अतीव आनंदाच्या क्षणी त्यांच्या प्रेमाचं इंद्रधनुष्य त्यांच्या अंगणात रेखतात.

ते आकाशातील इंद्रधनुष्य मग आपल्याही मनात उतरतं. आयुष्य पण असाच ऊनसावलीचा अविष्कार असतो ना?

**डोंगर दऱ्या सारे हिरवे झालेले**
**आभाळात अजूनही मेघ दाटलेले**
**सरोवरावर ओथंबलेल्या घना**
**ओघळणाऱ्या सरीतून पुन्हा**
**आत दाटलेले कढ सरतील**
**मन मोकळे, कवाडं उघतील**
**जीवनगाणे परत आलाप ताना**
**जीवन श्रावणात असंच बहरतंय ना?**

● वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

## मन्याच्या काव्या

# नाम्या अन् थालीपीठ

'या या बावसे गुरुजी... अगं ए...गुरुजी आलेत गं... चहा टाक बरं...'' बावसे गुरुजींचं स्वागत नाम्याच्या बापानं जोरदार केलं. एरवी शाळा सुटल्यावर गुरुजी एखादी तक्रार घेऊन यायचे नाम्याची. पण आज सकाळी सकाळीच आले होते. ''नाम्याबद्दल बोलायला आलो आहो'' ''असं...बोला नं... काड्या केल्या का पोट्यानं काही?...'' ''नाही हो, त्याच्या पुढील शिक्षणाचं बोलायला आलो. तुमचा नाम्या हुशार विद्यार्थी आहे. थोडा मस्ती करत असते पन तसा चांगला आहे. आता तो सहावीतून सातवीत जाईल. मला असे वाटते की, शहरातल्या एखाद्या शाळेत टाकून द्या त्याला...'' गुरुजींच्या या तारीफने नाम्याचा बाप पार फुलून गेला. तेवढ्यात चहा आला. गावात तुऱ्हाटीवर उकळलेला चहा म्हणजे अमृततुल्यपेक्षाही अमृतच. ''पहा व... बावसे गुरुजी का म्हंते...नाम्या लय हुशार हाय म्हंते...त्याले शयरातल्या शाळेमंधी टाका म्हंते...'' पोराचं कौतुक कोणाले नाय आवडत. गुरुजी चहा पिऊन निघून गेले अन नाम्याचे माय-बाप इचार करू लागले. नाम्याच्या खानदानीत इयत्ता सहावी हीच डिग्री होती. एकही पुढे शिकला नव्हता. शेवटी नाम्याच्या मायबापानं शयरात नाम्याले ठेवाचं पक्क ठरवून टाकलं. नाम्या शाळेतून आल्यावर त्याले पन सांगून टाकलं. तो पयले ''नाय नाय'' म्हने, उपडा पडू पडू रडे, पन मंग बापानं चांगलं समाजवून सागितलं तवा कुठं तो तयार झाला. काही दिवसांनी सहावीतून सातवीत नाम्या गेला. अन बापासंग तो पन शयरातल्या एका शाळेत आला. छोटासा इंटरव्यू झाला पन नाम्याचा बाप तसा पैशानं सधन होता म्हणून जास्त त्रास झाला नाय. वरतं पैसे देऊन नाम्याचा दाखला एकदाचा नव्या शाळेत झाला. शयरात एक किरायानं खोली बी ठरवली. इकडे उन्हाळा संपला अन पावसाळा सुरू झाला. नाम्या मायसंग शयरात खोलीवरतं रातीच आला. शाया सकायी सकायी होती. नाम्याच्या शाळेचा आज पहिला दिवस होता. शहर मोठं....शाळा मोठी....शहर नवीन... शाळा नवीन... नाम्या पार भेदरला. कोनी मित्र नाही कां कोनीच नाय. बसला वर्गात जेथं जागा भेटन तेथं. कोनी कोनाशी एक शब्द बोले नाही. अन बोले त इंग्लीशमंधीच बोले. बाजूच्या पोरानं नाव इचारलं तर हा म्हने ''नाम्या''. त्या पोराले हे नाव म्हंजी काय कयलच नाय. थ्यानं आपलं नाव सांगितलं ''कौस्तुभ''. आता हे नाव नाम्याले उच्चारताच येत नव्हतं. एक पिरेड झाला का 'बेल' वाजे, नाम्या वाटे सुट्टीच झाली. तो दप्तर घेऊ घेऊ पळे. मंग 'मॉनीटर' त्याची कॉलर पकडून जागेवरतं बसवे. बाकीचे पोट्टे फिदीफिदी हासे. मंग एकदाची मधली सुट्टी झाली. नाम्याच्या मायनं डबा दिला होता. नाम्या डबा घेऊन आवारात एका ओट्यावर बसला. डबा उघडला. डब्यात आलूची भाजी अन पोळी होती. मांडी घालून बसावं अन मस्त चालू करावं या इचारात होताच का एक आवाज आला,'' हॅलो, मी बसू का इथे?'' वर पायलं तर पोरगी होती. चांगली होती दोन वेण्या घातलेली. नाम्या म्हणाला '' हो बस '' मंग बसता बसता ती म्हणाली, ''मी सुलभा, वर्ग सातवा 'ब'...अन तू?'' नाम्याले त्याचा वर्गच नाय आठवे. नाम्यानं वर्गाकडे बोट दाखवून सांगितले... ''अच्छा... सातवा 'ई' मध्ये...'' नाम्यानं मान डोलावली. मंग तिनं डबा उघडला. त्याच्यात थालीपीठ होतं. तीनं नाम्याले थालीपीठ दिलं अन नाम्यानं तिले बटाट्याची भाजी-पोळी. चुपचाप डबा खाल्ला अन बेल वाजाच्या आत वर्गात पळाला. दुसऱ्या दिवशी पन नाम्याशी कोनीच बोललं नाय, ना पोट्टे ना मास्तर. मंग मधली डबा खाची सुट्टी झाली. नाम्या पुन्हा त्याच ओट्यावर आला. आज नाम्याच्या मायनं थालीपीठ दिलं होतं. डबा खायच्या तयारीतच होता त समोर एक सावली दिसली. समोर सुलभा उभी होती. पुन्हा डबा खायले बसली. त्याले वाटलं का आज पन थालीपीठ असन तर तिच्या मायनं आलुभाजी पोळी दिली होती. मग नाम्यानं 'थालीपीठ' तिले दिलं अन तीनं 'भाजीपोळी''. पुन्हा बेल वाजायच्या आत दोघं आपापल्या वर्गात गेले. तिसऱ्या दिवशी पुन्हा तसचं. नाम्याच्या मनात गुदगुल्या होत होत्या. नाम्याले आता सुलभीच जवयची वाटे. नाम्यानं आज भाजीपोयी आणली होती अन थालीपीठ येईन म्हणनू तो वाट बघत होता. इतक्यात एक सावली नाम्याले दिसली. त्याले वाटलं सुलभाच हाय. त्यानं मान वर करून पायलं तर एक आडदांड पोरगा उभा होता. त्यानं काहीच न बोलता सन्नकन एक कनपटात ठेवून दिली. नाम्याले कळलचं नाही का काहुन पडली म्हणून. तो पोरगा निघून गेला. सुलभा आज आलीच नव्हती. नाम्यानं गुपचुप डबा खाल्ला अन बेल व्हायच्या आत वर्गात पळाला. मंग पुन्हा चवथ्या दिवशी डबा खा ची सुट्टी झाली. पुन्हा नाम्या सुलभेची वाट बघत बसला. पोरगा पुन्हा आला अन काही बोलायच्या आत सनान नाम्याले ठेवून दिली. पुन्हा नाम्याले कळलचं नाही. नाम्याले वाटलं का डबा खायच्या आधी कनपटात खायची परंपरा असन या शाळेची. मग पाचव्या दिवशी नाम्यानं डबा उघडलाच नाही. का बा कनपटात पयले खाऊन घेतो अन मंगच निवांत डबा खातो, असं त्याले वाटलं. पुन्हा तो मुलगा आला. नाम्यानं गाल समोर केला. ''मंग्या, तू याले मारतो रोज?'' सुलभानं भावाला विचारलं. ''हो... हो... मस्त कडक ठेवून देतो...'' मंग्या म्हणे. ''अरे दादा...हा तो मुलगा नाही...हा तर चांगला आहे...'' नाम्यानं फुकटच मार खाल्ला होता. सुलभेच्या या वाक्यानं नाम्याच्या मनात मात्र 'कुछकुछ' झालं. मंग्यानं 'सॉरी' म्हटलं अन प्रकरण मिटलं. आता रोज सुलभा-नाम्या जोडी एकत्र जेऊ लागले. इकडे हुशार म्हंता म्हंता नाम्या सुलभे७७च्या नादात त्याच वर्गात राहला अन भाजीपोळी-थालीपीठ ची जोडी तुटली. सुलभा 'वरचेवर' पास होत गेली अन नाम्या 'खालच्या खाली' नापास होत गेला. नाम्याच्या बापानं मंग त्या शाळेतून नाव काढलं अन गावातच शाळेत टाकलं. पन जेवतांना रोज नाम्याले सुलभाच दिसे. थालीपीठचं दिसे. गावात नाम्या पुन्हा वर्गात पयला येत गेला अन मंग तो शयरात कॉलेजात गेला. चांगला पास झाला अन नाम्याले चांगली नोकरीपन लागली. नाम्या बसने जाणे-येणे करे. एक दिवस नाम्या बसस्टॅण्डवर उभा होता तं दोन पोराईले घेऊन एक बाई तिथं वाट बघत उभी होती. बस यायले उशीरच होता. नाम्यानं चांगलं निरखून पायलं. त्याले ते सुलभीसारखीच वाटे. पन... इचारू का नाही? तिचा भाऊ त नसनं इकडे तिकडे... या वयात कनपटात खाणं शोभणार नाही... इचारू का बा...'' या गोंधळात नाम्या उभा होता. शेवटी नाम्यानं मान दुसरीकडे पलटवली. ''मामा... मामा... आईने हा डबा दिला आहे तुमच्यासाठी...'' असा लाडीक छोट्या मुलाचा आवाज आला अन नाम्यानं खाली पाहीलं. त्या बाईचा एक मुलगा होता तो. नाम्यानं डबा घेतला पन तितक्यात बस आली अन ती बाई पोराबाळासकट बसमध्ये चढली. खिडकीतून तिनं नाम्याकडे पाहीलं पन. नाम्या पर गोंधळला होता. त्यानं हळूच डबा उघडला तर त्यात थालीपीठ होतं... ती सुलभाच होती हे पक्क झालं. पन नाम्या आता ''मामा'' झाला होता. पन ''मन की बात... थालीपीठ के साथ'' हे मात्र नाम्याच्या भाग्यात होतं. ●●

● मनोज वैद्य
९८२२९४९२६०

## प्रासंगिक

# गणेशोत्सव

### हर्षोल्हासाचा, चैतन्याचा, पारंपरिक संस्कृतीचा महोत्सव



गणेशोत्सव हा राज्योत्सव म्हणून शासनाने घोषित केल्याने सर्व गणेश मंडळांना प्रचंड आनंद झाला आहे. ढोल ताशांच्या निनादात, गणपती बाप्पा मोरयाऽऽऽ च्या जयघोषात आनंदी व उत्साही वातावरणात मांगल्याचे प्रतीक असलेल्या लाडक्या बाप्पाचे आगमन होणार आहे. साऱ्या पुणेकरांचा आनंद बाप्पाच्या आगमनाने द्विगुणित होणार. हा दैदीप्यमान उत्सव, चैतन्य घेऊन येणार. त्यामुळे मंडळाचे कार्यकर्तेच नव्हे तर आबालवृद्धांमध्ये हर्षोल्हासाची लहर पसरणार, नगारा आणि सनईच्या सुमधुर आवाजात (पुण्यातील) मानाच्या पाच आणि प्रमुख गणपती मंडळाच्या मिरवणुकांनी शहर दुमदुमून निघेल. गणेश चतुर्थीच्या दिवशी शहरातील रस्त्यांवर माणसांचे थवेच्या थवेच ओसंडून वाहणार, त्यातही घरगुती गणपतीच्या प्रतिष्ठापनेची जनतेची तयारी, त्यानेही शहरातील बाजारपेठा गजबजवून जातील.

लक्ष्मी रोड, तुळशीबाग, शिवाजीनगर, नारायण पेठ, सदाशिव पेठ आदी पेठांतील उत्साह तर ओसंडूनच वाहत राहील. पुण्यातील लोकांकडे घरगुती गणपती हा बहुतेकांचा दीड दिवसांचा असतो, काही लोकांकडे पाच दिवसांचासुद्धा असतो, तर विविध सोसायट्यांमधील गणेशोत्सव पाच किंवा सात दिवस चालतो. कारण, बहुतेक सर्वांनाच नंतर शहरातील गणपती बघायला जायचे असते. देखावे आणि विसर्जन मिरवणुकीचा सोहळा प्रत्यक्ष अनुभवायचा असतो. पुणे व चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत साधारणतः प्रत्येक चौकातच एक गणपती मंडळ असते, त्यांचा उत्सवही दहा दिवस चालतो.

गेल्या काही वर्षांत पुण्यात ढोल ताशे नगारे वाजविणारी खूप मंडळ स्थापन झाली, यात उच्चभ्रू घरातील माणसे व स्त्रियांचासुद्धा सहभाग असतो. एकेका ढोल मंडळात ४० ते ५० किंबहुना शंभरसुद्धा वादक असतात. त्यात रस्त्यावर ढोल वाजविण्याचा आनंद अप्रतीम असतो. या सोबत लेझीम मंडळही असतात, पांढरे कपडे, त्यावर भगव्या रंगाचे जॅकेट किंवा दुपट्टा व फेटा असा त्यांचा परिवेश असतो. शहराच्या बाहेर असणाऱ्या अनेक सोसायट्यांमध्येही स्वतंत्र ढोल ताशे मंडळ स्थापन झाली आहेत. गणेशोत्सवाच्या पूर्वी जवळपास महिनाभर ही मंडळे वादनाची तालीम करीत असतात.

पुण्यातील मानाचा पहिला, श्री कसबा गणपती मंडळाने साकारलेल्या मंडपात बाप्पा विराजमान होतील. सकाळी आठ वाजता मिरवणुकीला प्रारंभ होईल, प्रभात बँड पथकाचे उत्कृष्ट वादन, संघर्ष आणि फुलांचा वर्षाव करण्यात येईल.

मानाचा दुसरा गणपती म्हणजे, तांबडी जोगेश्वरी मंडळाचा होय. या मंडळाच्या मिरवणुकीला नारायण पेठ येथील केळकर रस्त्यावरून प्रारंभ होईल. आढाव बंधूचे नगारा वादन, न्यू गंधर्व ब्रॉस बँडचे स्वर, शिवमुद्रा व ताल ढोल ताशा पथकाच्या वादनाने भाविक मंत्रमुग्ध होतील. मानाचा तिसरा, श्री गुरुजी तालीम मंडळाचा गणपती, याही मिरवणुकीला सकाळीच प्रारंभ होईल. फुलांच्या आकर्षक रथात विराजमान झालेल्या गणपती समोर नगारा वादन गंधर्व ब्रास बँड गुरुजी प्रतिष्ठान, अभेद्य शिवप्रताप ढोल ताशा पथकाच्या वादनाने मिरवणुकीत चैतन्य निर्माण करण्यात येईल. मानाचा चौथा गणपती तुळशीबाग मंडळाचा, मूर्तीची तुळशीबागेतील श्रीराम मंदिरापासून पालखीतून मिरवणूक निघेल, बाबू गेनू चौक, मंडई, बाजीराव रस्ता, लक्ष्मी रस्ता आदी रस्त्यांवरून मिरवणूक येईल. मंगेश बँड, लोणकर बंधूंचे नगारा वादन समर्थ प्रतिष्ठानचा ढोल-ताशा यांचा समावेश राहू शकतो. मानाचा पाचवा गणपती केसरी वाडा गणेशोत्सव मंडळाचा, गणपतीची पालखीतून मिरवणूक निघेल. सर्व परंपरा पाळून गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.

या पाच गणपतींच्या व्यतिरिक्त हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टच्या बाप्पाची जंगी मिरवणुक निघेल तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, याही गणपतीची मिरवणूक जोरदार असते. फुलांनी सजविलेल्या ओंकार रथातून पारंपरिक पद्धतीने अखिल मंडई मंडळातील गजाननाची प्राणप्रतिष्ठा सुद्धा होईल.

याच दरम्यान पुणे फेस्टिवलचा शुभारंभ होतो. देशातील मोठमोठे कलावंत आपली हजेरी लावत असतात. या दहा दिवसांत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते, त्यात रक्तदान शिबिर, शारीरिक तपासणी शिबिर, मनोरंजनाचे विविध कार्यक्रम, ज्ञानावर्धक कार्यक्रमांची अगदी रेलचेल असते. अगदी दहा दिवस पुणेकरांना खूप मोठी पर्वणीच असते, असे म्हणावयास हरकत नाही. ●●

### मानाचे गणपती म्हणजे काय?

१८९३ सालापासून सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात झाली. स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा त्यामागे होती. स्वातंत्र्य मिळेपर्यंत सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा समाजात रुजली गेली होती. स्वातंत्र्यानंतरही या सणांचा उत्साह व चैतन्य मात्र कायम राहिले. यामध्ये काळानुरूप काही बदल झाले, पण अनेक वर्ष उलटल्यानंतरही मानाच्या पाच गणपतीची परंपरा पुण्यात तितक्याच बारकाईने पाळली जाते. कसबा गणपतीचे मंदिर हे शिवाजी महाराजांच्या काळातील आहे. ग्रामदैवत म्हणून कसबा गणपतीला सार्वजनिक मंडळाच्या गणपतीला मानाचा पहिला गणपती हा मान देण्यात आला. या मंडळाच्या गणपतीला विसर्जनाचा पहिला मान देण्याचं लोकमान्य टिळक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरवलं, म्हणून मग आजही कसबा गणपती हा विसर्जन मिरवणुकीत पहिला असतो. त्यानंतर मानाच्या दुसऱ्या गणपतीचं स्थान. ही पुण्याची ग्रामदेवी मानल्या जाणाऱ्या तांबडी जोगेश्वरी मंदिराच्या सार्वजनिक गणेशोत्सवातील गणपतीला मिळाला. हिंदू-मुस्लिम ऐक्याच प्रतीक मानल्या जाणाऱ्या गुरुजी तालीम मंडळ गणपतीला मानाचा तिसरा म्हणून तर तुळशीबाग मंडळाच्या गणपतीला मानाच चौथ स्थान दिल्या गेलं. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी स्वतः स्थापन केलेल्या केसरी वाडा गणपती हा मानाचा पाचवा गणपती मानला जातो.

श्रीराम आणि शौर्य ढोल ताशा पथकातील वादकांनी केलेल्या तालाच्या गजराने पुणेकरांना थीरकायला लावेल. प्रथा आणि परंपरेप्रमाणे श्रींची मूर्ती चांदीच्या पालखीतून उत्सव मंडपात आणण्यात येईल. बाप्पा मोरयाऽऽचा जयघोष

● सुनील देशपांडे
९८२२७३७८४१

# निरोप...

खूप दूर निघून जायचंय् कदाचित...
निरोप देण्यासाठी कमानी
अन् तोरणं उभारणार नाहीत कुणी!
सुगंधी फुलांचा वर्षावही करणार नाहीत
माहीत नाही, पुनर्जन्म असतो का?
पण आयुष्य असं जगून घेतल्यावर
पुनर्जन्मही नको असतो कुणालाच!
आता असं दान नकोय...
साधं, निर्लेप पण सुगंधी
अत्तरक्षण जपून ठेवता येईल असं
आयुष्य हव असताना मिळू नये अशी
वस्त्रवीण वाट्याला आली!
काय म्हणावं, 'आहे हे असं आहे!'
तसाही 'नियतीचा न्याय'
निष्ठूर असतो म्हणे!
अन् हे कळायलाही
इथवर याव लागलं!
मावळती खुणावतीए
आता कुणाकुणाचा निरोप घेऊ?
नेमकं तेव्हाच
'आयुष्य'ही खुणावतं...!
सारं काही संपल असताना...! ●●

● अभय जोशी
७८७५०७९०७९

● संयोजक ●
संजय रामगिरवार
९८८१७१७८३२

## स्पंदन

# तो मोठा माणूस

आचार्य अत्रे यांच्या 'मी कसा झालो?' या पुस्तकाच्या ३१ ऑगस्ट १९५३ रोजी परचुरे प्रकाशन मंदिरातर्फे पार पडलेल्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी पदावरून बोलताना अप्पा पेंडसे म्हणाले होते, ''ज्याच्याबद्दल सर्वांत जास्त गैरसमज, तो मोठा माणूस अशी एक कल्पना आहे. अत्रे यांच्याबद्दल फार मोठे गैरसमज आहेत. या न्यायाने अत्रे हे एक मोठे माणूस आहेत.''

'अखेर कीर्ती कीर्ती म्हणजे तरी काय? तर गौरव मूर्ती संबंधीच्या एकूण एक अपसमजाची आणि गैरसमजाची बेरीज.' असे रिलके म्हणून गेला.

...जे लोक नोबडीपासून समबडी होत असतात, त्यांच्या बद्दल समज, गैरसमज याचे पेव फुटत असते. त्यांच्याबद्दल वावड्या उडत असतात, त्यांच्याबद्दल अफवा पसरविल्या जात असतात. आयुष्यात उल्लेखनीय असे यश मिळविणाऱ्या साऱ्यांना त्यांच्या यशाची किंमत चुकवावीच लागत असते. बोलले त्यांच्याच बद्दल जात असते, जे मोठे झाले आहेत. 'जया अंगी मोठेपणा तया यातना कठीण', असे जे म्हटले जात असते, ते याच पृष्ठभूमीवर.

'थंड उपेक्षा हे मरण आहे, त्यापेक्षा निंदा झालेली परवडली' असे डॉक्टर जॉन्सन म्हणून गेलेत, ते खरे आहे. ज्यांची चांगल्या वा वाईट पृष्ठभूमीवर दखल घेतली जात असते, त्यांच्याचबद्दल भल्या-बुऱ्या चर्चा होत असतात, त्यांच्याबद्दलच गावगोष्टी केल्या जात असतात, गॉसिपिंग केले जात असते. अर्थात् मोठेपण ही फुकटात मिळणारी गोष्ट नसते. त्यासाठी स्वतःला सिद्ध करावे लागत असते. निंदा, टीका, गैरसमज, अपमान, खिल्ली, तेजोभंग याच्या भट्टीतून त्यांना तावूनसलाखून बाहेर यावे लागत असते. मेलेल्या कुत्र्याला कुणी लाथ मारत नाही. लाथ मारली जात असते ती जीवंत कुत्र्यालाच. त्याचप्रमाणे आपल्या क्षेत्रात मोठेपण प्राप्त करणाऱ्या लोकांना प्रसंगी बदनामीचे किटाळ् पण सहन करावे लागत असते. त्यांच्या खाजगी आयुष्याबद्दल बोलले जात असते. त्यांचे वाभाडे काढले जात असतात.

अशी मोठी माणसे पण त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर करण्याच्या भानगडीत पडत नसतात. 'कुत्ते भोकते है और हाथी चलता है' अशी त्यांची भूमिका राहत असते. पण शेवटी तीसुद्धा माणसेच असतात. त्यांना पण या साऱ्याचा मानसिक त्रास होत असतो. पण हलाहल पचविण्याची क्षमता त्यांनी प्रयत्नपूर्वक विकसित केलेली असते. पेंडसे असो की रिलके यांची उपरोक्त विधाने मोठेपणाची जणू व्याख्याच करून जातात, असे म्हणायला हरकत नाही. ●●

● आशिष देव
७७४१८१८४१८



# आमच्या अन्नाजींच मातीचं घर

वडनेरच्या मातीत रुजलेलं अण्णाजींचं घर म्हणजे केवळ एक इमारत नव्हती, तर ते संस्काराचं एक जिवंत विद्यापीठ होतं. शेणामातीने सारवलेल्या त्या जाड भिंतींनी नुसतं ऊन, वारा झेलला नाही, तर कित्येक पिढ्यांचे मायेचे आणि ज्ञानाचे पदर त्यांनी जपून ठेवले. आजही बालपणाच्या आठवणींचा एखादा वावटळ मनात येतो, तेव्हा हे घर डोळ्यासमोर उभं राहतं.

घराच्या उंबरठ्यावर पाऊल टाकताच स्वयंपाकघरातल्या चुलीच्या धुराने काळवंडलेल्या भिंती, मयालींना लटकलेल्या भाकरीच्या दवडी आणि देव्हाऱ्यात विराजमान विठ्ठल-रखुमाईची मूर्ती मन शांत करीत असे. प्रत्येक वस्तू आपल्या जागेवर अशी होती, जणू ती एक अदृश्य शिस्तच शिकवत होती. अंगण म्हणजे जणू सृष्टीचा एक छोटा नमुनाच होता. तुळशी वृंदावनाचा सुगंध, पारिजातकाचा सडा, द्राक्षांच्या वेलीची सावली आणि मोगरा, गुलाबाचा गंध... सारं काही मन मोहून टाकत होतं. गोठ्यातल्या गाईंचा सहवास आणि बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा मंजुळ नाद कानात आजही घुमतो.

पण, त्या घराचा खरा आत्मा अण्णाजींच्या बैठकीत होता. ती नुसती एक खोली नव्हती, तर अनेक थोर व्यक्तींच्या चरणांनी ती पुनीत झालेली एक वैचारिक तीर्थभूमी होती. बाबासाहेब पुरंदरे, दत्ताजी डिडोळकर अशा अनेक दिग्गजांनी तिथे येऊन विचारांची पेरणी केली होती. भिंतीवर 'राष्ट्राय स्वाहा, राष्ट्राय इदं न मम' हा मंत्र केवळ लिहिलेला नव्हता, तो त्या खोलीतल्या प्रत्येक श्वासासोबत गुंजत होता. कुरुक्षेत्राच्या युद्धातील महाभारताचा प्रसंग आणि अटलजींच्या हसऱ्या चेहऱ्याचं चित्र पाहून मन एका वेगळ्याच विश्वात हरवून जाई. लहानपणी आम्ही त्याच बैठकीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचं चित्र पाहिलं आणि त्यातूनच आम्हाला इतिहासाची ओळख झाली. अण्णाजींची बैठक म्हणजे एक चालती-बोलती पाठशाला होती, जिथे पुस्तकी ज्ञान नसतानाही सात्विक विचारांची आणि देशभक्तीची शिदोरी मिळत होती.

अण्णाजींचं घर हे केवळ निवासस्थान नव्हतं, तर ते एका विचारधारेचं केंद्र होतं. ते घर म्हणजे समाजाच्या विचारांचं एक प्रतीक बनलं होतं. 'राष्ट्राय स्वाहा, राष्ट्राय इदं न मम' हा मंत्र नुसता भिंतीवर नव्हता, तो त्या घरात राहणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला होता. अण्णाजींची बैठक गप्पा मारण्याची जागा नव्हती, तर ती वैचारिक मंथनाची आणि राष्ट्रउभारणीच्या स्वप्नांची भूमी होती. आजही जेव्हा त्या घराची आठवण येते, तेव्हा ते नुसतं एक जुनं घर वाटत नाही, तर आयुष्यभर पुरेल अशी संस्काराची शिदोरी देणारं, मायेचं आणि ज्ञानाचं केंद्र होते. ●●

● अमोल तपासे
९९६०६७३७८९



## गावगाडा

# कुकूच कूऽऽऽ

आजच्या धकाधकीच्या काळात रात्रीच्या झोपेच्या वेळासुद्धा अनियमित झाल्या आहेत. 'लवकर निजे लवकर उठे' ही म्हण केव्हाच कालबाह्य झाली. कामाचा ताण, कामाचे अनियंत्रित तास यामुळे आमचे पॅकेज तर वाढले. पण अवेळी जेवण, झोप यामुळे प्रसन्न आणि हसरी वाटणारी सकाळ मात्र आम्ही गमावून बसलो. मोबाईलचा अलार्म दोन चारदा बंद करीत रडटपडत कसे तरी जागे होऊन दिवसाची सुरुवात आता करावी लागते. काही अपवाद वगळल्यास हीच घर घर की कहानी आहे...

आमच्या लहानपणी बेंदव्यातला कोमडा आरवला की आमची प्रसन्न आणी हसरी सकाळ व्हायची. कुकूच कूSSS हाच त्यावेळचा अलार्म होता. कडाक्याची थंडी असो वा धो-धो बरसणारा पाऊस, कोमडा आरवण्याची वेळ मात्र कधी चुकली नाही. याशिवाय डबलरोटी विकणारेसुद्धा याच वेळी डबलरोटी वालेSSS...

या त्यांच्या विशिष्ट आवाजाच्या शैलीने साखरझोपेतून उठवायचे. आजच्या पिढीला कदाचित डबलरोटी हा प्रकार माहिती नसावा. डबलरोटी म्हणजे आजच्या काळातील 'पाव'. ब्रेडच्या तुलनेत हा त्या काळचा स्वस्त आणि मस्त पर्याय होता. प्रसन्न सकाळी कडूलिंबाच्या फांदीने दातवन झाले की चुलीवरच्या वाफाळलेल्या चहात डबलरोटी बुडवून खाणारी आमची ही समाधानी पिढी होती.आज मात्र आधुनिकीकरण व वाढत्या शहरीकरणामुळे पहाटे आरवणाऱ्या त्या कोमड्याचा श्वासही गुदमरलाय्. कोमडा आरवल्यानंतर खडबडून जागे होऊन प्रसन्न सकाळ अनुभवणारी ऐंशी-नव्वदच्या दशकातील आमची कदाचित शेवटची पिढी असावी.

आजही कोमडा आरवतो, पण तो आमच्या सोयीनुसार. आजच्या मोबाईलरूपी कोमड्याला आता कृत्रिम कमांड द्यावी लागते. मग आम्ही रडटपडत असहायतेने जागे होऊन दिवसाची सुरुवात करतो. आता शहरातल्या सिमेंट काँक्रेटच्या जंगलात प्रसन्न आणि हवीहवीशी वाटणारी गावाकडची सकाळ कायमची मावळली आहे. ●●

● अखिल देशपांडे
९७६७१५१८३०



कृषी व्यवस्थापन

# कृषी व्यवसाय व्यवस्थापन - काळाची गरज

भारत हा शेतीप्रधान देश आहे. पुरातन काळापासून शेती पारंपरिक पद्धतीने केली जात होती, त्यामुळे शेती हा व्यवसाय म्हणून कधी पाहिला जात नव्हता. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेती व्यवसायात अनेक बदल घडून आले. अनेक नवीन तंत्रज्ञान विकसित झाले. शेती आणि त्याच्याशी संबंधित संलग्न व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. विशेषतः ग्रामीण अर्थव्यवस्थेवर या क्षेत्राचा प्रभाव अधिक आहे तसेच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार देणारे हे देशातील सर्वांत मोठे क्षेत्र आहे.

सध्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे संपूर्ण बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल जाणवू लागले आहेत. मुक्त व्यापार, खाजगीकरण, जागतिकीकरण यामुळे आपला माल आपण कोठेही विकू शकतो. जसे या सर्वांमुळे इतर क्षेत्रांमध्ये□म्हणजे बांधकाम, व्यवसाय, वाहतूक, वैद्यकीय व्यवसाय, सरकारी कार्यालये तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे, तसे शेतीमध्ये मात्र तितक्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होताना दिसत नाही. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सबळ झालेला नाही, त्यामुळे भारतीय शेतीच्या प्रगतीचा वेग मंद आहे.

आपल्या देशात कृषीक्षेत्रात काही प्रमाणात प्रगती झाली असली तरी ती मंदावली आहे. मोठ्या प्रमाणात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रगती साधता आली; परंतु १-२ एकर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रगती करता आली नाही. कारण, प्रगतीची साधने त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडत नाहीत.

उदाहरणार्थ, पूर्वी नांगरणीसाठी बैल आणि नांगराचा फाळ यांचा वापर होत असे. नंतर ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचा नांगर, पलटी नांगर, रोटाव्हेटर असे बदल घडले. परंतु त्यासाठी लागणाऱ्या डिझेलचा खर्च छोट्या शेतकऱ्यांना परवडत नाही.

सिंचनाच्या बाबतीत माठेच्या उपशानंतर विद्युत मोटार, त्यानंतर ठिबक सिंचन यांचा वापर सुरू झाला. परंतु ठिबक सिंचनाच्या खर्चासाठी शेतकऱ्यांना सरकारी अनुदान वा कर्जावर अवलंबून राहावे लागते.

बियाणांबाबतही चांगल्या दर्जेदार बियाणांचा वापर प्रगत शेतीसाठी आवश्यक आहे, पण त्यासाठी खाजगी कंपन्यांच्या बियाणांवर अवलंबून राहावे लागते. या सर्व गोष्टी लहान शेतकऱ्यांना परवडण्यासारख्या नसतात. अनेक शेतकरी ऋतुमानानुसार पिके घेतात, त्याचा परिणाम पिकांच्या प्रमाणात होतो. त्यामुळे भारतात शेतीचे तंत्रज्ञान अपेक्षेप्रमाणे विकसित झाले नाही.

सरकारने शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. काही योजनांवर अनुदान आहे, काहींवर पूर्ण सबसिडी, तर काहींमध्ये कमी व्याजदरात कर्ज दिले जाते. पण, या सर्व योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना खूप धडपड करावी लागते, त्यामुळे या योजनांचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही.

कृषी क्षेत्रात ज्यांना आवड आहे आणि त्यातच करीअर करायचे आहे,



अशा युवकांसाठी कृषी विषयातील मान्यताप्राप्त चारही विद्यापीठांच्या अंतर्गत खालील पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

- बी.एससी. (ऑनर्स) कृषी
- बी.एससी. (ऑनर्स) उद्यानविद्या
- बी.एससी. (ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी
- बी.एससी. (ऑनर्स) कृषी जैवतंत्रज्ञान
- बी.एससी. (ऑनर्स) ग्रहविज्ञान
- बी.एससी. (ऑनर्स) अन्न तंत्रज्ञान
- बी.एससी. (ऑनर्स) वनविद्या
- बी.एससी. (ऑनर्स) मत्स्यव्यवसाय
- बी.एससी. (ऑनर्स) कृषी व्यवसाय व्यवस्थापन
- बी.एससी. (ऑनर्स) पशुसंवर्धन

वरील अभ्यासक्रमांमधून कृषी विषयक आधुनिक तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान मिळू शकते.

अलीकडे जगभरातच कोरोनासारखे मोठे संकट आले. अशा अचानक उद्भवलेल्या परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांना तयार मालाचे काय करायचे हा प्रश्न निर्माण झाला. परंतु ज्यांनी कृषी विषयातील पदवी घेतली होती, त्यांनी या संकटाला न डगमगता तोंड दिले. परिस्थितीशी जुळवून घेत त्यांनी ऑनलाईन मार्केटिंगच्या पद्धतींचा वापर करून शेतमालाची विक्री केली.

अशा यशस्वी प्रयत्नांमागे आधुनिक मोबाईल तंत्रज्ञान आणि अभ्यासक्रमातून मिळालेले शास्त्रोक्त ज्ञान यांचा संगम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळाची गरज ओळखून कृषी क्षेत्रातील व्यवसाय व्यवस्थापन या अभ्यासक्रमाला प्राधान्य द्यावे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेऊन स्वतःच्या, जिल्ह्याच्या, राज्याच्या आणि देशाच्या प्रगतीस हातभार लावावा.

सरकारने मागील वर्षापासून १२ वी नंतर या अभ्यासक्रमासाठी सीईटी परीक्षा देणे बंधनकारक केले आहे. सीईटी परीक्षा दिल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरतो.

शेतात माल पिकवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच महत्त्वाचे तो विकणे. परंतु, आज अनेक शेतकऱ्यांना योग्य व्यवसाय व्यवस्थापनाची माहिती नसल्याने शेतमालाला योग्य दर मिळत नाही. बाजारपेठ उपलब्ध करून देणे, शेतमालाला योग्य दर मिळवून देणे आणि प्रक्रियेद्वारे मूल्यवृद्धी करणे या सर्व गोष्टी साठी कृषी व्यवसाय व्यवस्थापनाचे शिक्षण अत्यावश्यक आहे.

उदाहरणार्थ, शेतमाल नाशवंत असेल आणि बाजारात दर मिळाला नाही, तर त्या मालावर प्रक्रिया करून दुसरे मागणी असलेले उत्पादन तयार करून विकता येते. मात्र, यासाठी आवश्यक ज्ञान असणे गरजेचे आहे, जे कृषी व्यवसाय व्यवस्थापन अभ्यासक्रमातून मिळते.

कृषी उत्पादनात समाधानकारक वाढ होण्यासाठी कृषी विद्यापीठे, कृषी विभाग आणि शेतकरी बंधू-भगिनींचे कष्ट आहेत. परंतु या कष्टाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी कृषी पणन, व्यवस्थापन, प्रक्रिया, वितरण आणि पुरवठा या सर्वांचा समन्वय असणाऱ्या तज्ञ पदवीधारकांची मोठ्या प्रमाणात गरज आहे.

ही गरज लक्षात घेऊन महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठांनी एकूण १० खाजगी, विनाअनुदानित कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयांना परवानगी दिली आहे. यापैकी ६ महाविद्यालये महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या अंतर्गत येतात. पुणे, लातूर आणि नागपूर येथे कृषी विद्यापीठांचे एम.बी.ए. (कृषी) पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयांमध्ये बी.एससी. (अेबीएम) हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालतो.

या अभ्यासक्रमात कृषीमाल उत्पादन, प्रक्रिया, पणन आणि व्यवस्थापन या चार प्रमुख शाखांचे शिक्षण दिले जाते. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात, आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करू शकतात किंवा कृषीपूरक व्यवसाय निवडू शकतात. तसेच, कीटकनाशके, रोगनाशके, कृषी अवजारे, खते यांच्या कंपन्यांमध्ये, राष्ट्रीयकृत बँका, वित्तीय संस्था, आयात-निर्यात संस्था, विविध मॉल्स, तसेच केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाच्या सेवांमध्ये संधी मिळू शकते.

भविष्यातील संधी लक्षात घेऊन तरुणांनी कृषी व्यवसाय व्यवस्थापन या पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा आणि आपले भविष्य उज्ज्वल बनवावे.

**किशोर चंदुरे**
रा. छ. शा. कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, सांगली
**निखिल र. यादव**
एमएससी, अॅग्री.

# संत्रा/मोसंबी फळ पिकांवरील तपकिरी रॉट व्यवस्थापन

फळबाग व्यवस्थापन

सद्यस्थितीत पावसाची रिमझिम, अपुरा सूर्यप्रकाश, थंड हवा, अधिक आर्द्रता, कमी तापमान व शेतातील जमीन संपृक्त झाल्याने आंबिया बहारच्या संत्रा/मोसंबी फळांवर फायटोफ्थोरा बुरशीचे संक्रमण होण्याची व त्यामुळे पाने काळी पडणे, पानगळ होणे व फळांवर तपकिरी डाग (ब्राऊन रॉट) विकृती होण्याची दाट शक्यता आहे.

### फायटोफ्थोरा बुरशीचे संक्रमण झाल्यास दिसणारी लक्षणे

**पानावरील चट्टे लक्षणे :** पावसाळ्यात जमिनीलगतच्या फांद्यावरील पाने व फळांना या बुरशीची लागण सर्वप्रथम होते. यामुळे पाने टोकाकडून करपल्यासारखी व मलूल होतात



(चित्र क्रं १). अशी पाने हातात घेतली असता आणि त्यांचा चुरा केला असता, त्यांची घडी होते; मात्र पाने फाटत नाहीत. टोकाकडून झालेले संक्रमण पूर्ण पानावर होऊन पाने तपकीरी काळे होतात. नंतर अशी पाने गळून झाडाखाली त्यांचा



खच पडतो (चित्र क्रं २). फांद्या पर्णविरहित होतात झाड जणू खराटे सारखे दिसते. परिणामी अकाली फळगळ होते. पानावरील चट्टे संक्रमण रोपवाटिकेमधील कलमा तसेच नुकतेच लागवड केलेल्या कलमांवर सुद्धा दिसून पडतात.

### फळावरील तपकिरी रॉट किंवा कूज लक्षणे

पानांवर लागण झाल्यानंतर जमिनीलगतची हिरवी असलेल्या फळांवर तपकिरी/करड्या डागांची



सुरुवात होते, (चित्र क्रं ३) फळे एकाबाजूने करपण्यास सुरुवात होते. फळाच्या हिरव्या कातडीस संक्रमण होऊन पूर्ण फळ तपकिरी काळ्या



रंगात परावर्तीत होते (चित्र क्रं ४) व फळे सडून गळतात. या फळ सडीच्या अवस्थेस 'ब्राऊन रॉट' किंवा तपकिरी रॉट असे संबोधतात. फळे खाली पडल्यानंतर फळांच्या पृष्ठभागावर पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते (चित्र क्रं ५). करड्या रंगाच्या फळांची तोड केल्यानंतर ते निरोगी फळात मिसळल्यास निरोगी फळे पण सडतात.

### व्यवस्थापन

- सर्वप्रथम खाली पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी. ती शेतात तशीच राहू देऊ नये, अन्यथा या रोगाची तीव्रता वाढण्यास मदत होऊन संक्रमण जलद गतीने होते. वाफा स्वच्छ ठेवावा.
- बागेच्या उताराच्या बाजूने शेतातील पाणी बाहेर काढावे; कारण जिकडे पाणी साठून राहते, त्या भागात फायटोफ्थोरा बुरशीची लागण अधिक होते.
- प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फासिटील ए.एल. २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्लूपी ३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. फवारणी करताना झाडाच्या परिघातात सुद्धा फवारणी करावी, जेणेकरून खाली पडलेली फळे उचललेली नसल्यास त्यावरील बुरशीचा नायनाट होईल तसेच जमिनीमधील सक्रिय बीजाणूंचा नायनाट होण्यासाठी मदत होईल. चांगले परिणाम मिळण्यासाठी या औषधात इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके/कीटकनाशके/विद्राव्य खते मिसळू नये.
- मेट्लक्सील एम ३.३% + क्लोरोथलोंनील ३३.१% एससी (मिश्र बुरशीनाशक) २ मिलि प्रती लिटर पाणी घेऊन वाफ्यात याची ड्रेंचिंग करावी (किमान ५ लिटर द्रावण प्रती झाड वापर करावा)
- रासायनिक औषधे फवारणीनंतर १५ दिवसानी ट्रायकोडर्मा हार्जियानम अधिक सुडोमनास फ्ल्यूरोसन्स १०० ग्रॅम प्रत्येकी प्रती झाड १ किलो शेणखतात मिसळून झाडाचे परिघात जमिनीतून द्यावा.

**(नोंद : संशोधनावर आधारित; लेबल क्लेम शिफारस) संपर्क - अ. भा. स. सं.प्र. (फळे) डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**डॉ. योगेश इंगळे** **डॉ. दिनेश पैठणकर** **डॉ. मोहन तोटावार**
डॉ. पंदेकृवि, अकोला

# गौरी-गणपतीच्या पावलाने मान्सून पुन्हा सक्रिय

हवामान अंदाज

मागील आठवड्यात पावसाने बरीच विश्रांती घेतली असल्याने शेतीची खोळंबलेली कामे करण्यासाठी वेळ मिळाला. आता बघूया या आठवड्यातील पर्जन्यस्थिती.

### भौगोलिक गतिविधी

सध्या ईशान्य मध्यप्रदेशात कमी दाबाचे क्षेत्र आणि त्याच्याशी संबंधित वरच्या हवेचा चक्राकार प्रवाह कायम आहे आणि पश्चिम-वायव्येकडे सरकताना ते कमकुवत होण्याची अपेक्षा आहे.

मान्सूनची ट्रफ रेषा सक्रिय आहे, जी बिकानेरपासून ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत विविध ठिकाणी पसरलेली आहे.

एका विशिष्ट प्रदेशावर एक पश्चिमी विक्षोभ कमी दाबाचा पट्टा म्हणून सुरू आहे आणि वायव्य मध्यप्रदेश तसेच पंजाबवर वरच्या हवेतील चक्राकार वारे वाहत आहेत.

आता वायव्य बंगालच्या उपसागरात एक नवीन कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे आणि याला थायलंडमधील काजीकी चक्रीवादळाच्या अंशामुळे बळकटी मिळेल.

### विदर्भ साप्ताहिक अंदाज

- **२७ ते ३१ ऑगस्ट :** पूर्व विदर्भात मुसळधार पाऊस (नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा पुरस्थिती), पश्चिम विदर्भात मध्यम पाऊस शक्यता, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याचे प्रमाण जास्त.
- **१-३ सप्टेंबर :** ढगाळ हवामान, विखुरलेला पाऊस.

### मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र

- **२७ ते ३१ ऑगस्ट :** कमी दाबाच्या प्रभावाने मराठवाड्यात पुन्हा पावसास अनुकूल वातावरण. पश्चिम महाराष्ट्रात पावसाची शक्यता कमी. १-३ सप्टेंबर : विखुरलेल्या भागात शक्यता.

### उत्तर महाराष्ट्र

- **२७ ते ३१ ऑगस्ट :** कमी दाब मार्गक्रमणामुळे मध्यम पाऊस शक्य. जळगाव जिल्ह्यात जोरदार पाऊस, तर पुणे जिल्ह्यात कमी.
- **१-३ सप्टेंबर :** केवळ स्थानिक वातावरणात शक्यता.
- **कोकण :** संपूर्ण पंधरवडा पाऊस होण्याची शक्यता.

**अभिषेक सु. खेरडे**
हवामान अभ्यासक,
अचलपूर, जि अमरावती

# केळी पिकावरील कुकुंबर मोझॅक विषाणू

कृषी तंत्रज्ञान



केळी फळ पिकावर अनेक समस्या जाणवू लागल्या आहेत. यात प्रामुख्याने कुकुंबर मोझॅक विषाणू रोगाचा उल्लेख करावा लागेल. सध्या केळी पिकावरील हा अत्यंत घातक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा रोग असून, त्याच्या व्यवस्थापनाकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक आहे.

### कुकुंबर मोझॅक विषाणू रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची कारणे

हा रोग १९४३ मध्ये जळगाव जिल्ह्यात प्रथम आढळून आला होता. विषाणूजन्य रोगांपैकी सीएमव्ही हा सुरुवातीला दुय्यम उपद्रव म्हणून गणला जायचा. मात्र, अलिकडच्या काळात या विषाणू रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढून आता तो प्रमुख विषाणू रोग म्हणून गणला जात आहे.

सीएमव्ही विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पुढील काळात केळी पिकासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतो.

हवामान बदल हे एक महत्त्वाचे कारण असले तरी, चुकीच्या पीक पद्धती आणि लागवडीच्या योग्य वेळा न पाळणे ही देखील महत्त्वाची कारणे आहेत. रोगाचा वाढता धोका लक्षात घेता केळी उत्पादकांनी गावपातळीवर एकत्रित नियंत्रणाची मोहीम राबविणे अत्यंत गरजेचे आहे.

### हवामान बदल व वाहक किडींची भूमिका

बदलत्या हवामानामुळे रसशोषक किडींच्या (मावा) संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सततचे ढगाळ वातावरण, जून-जुलै महिन्यात पडणारा अखंड पाऊस, हवेचे कमी तापमान (२४ अंश सेल्सीयस) व वाढलेली आर्द्रता हे घटक मावा किडीच्या वाढीस पोषक ठरतात. या रोगाचा प्राथमिक प्रसार रोगट कंदांपासून होतो, तर दुय्यम प्रसार मावा किडीमार्फत होतो. त्यात प्रमुख प्रजाती म्हणजे ॲफीस गॉसिफी (कपाशीवरील मावा) आणि होपॅलोसीफम मैडीस (मक्यावरील मावा). याशिवाय मायझस परसीकी, ॲफीस क्रॅसीव्होरा, मॅक्रोसीफम पीसी आणि होपॅलोसीफम पुनीफोलियम या प्रजाती देखील रोग प्रसारित करतात.

या विषाणूंचे जवळजवळ १००० यजमान पिके आहेत. यात काकडीवर्गीय पिके (कलिंगड), टोमॅटोवर्गीय पिके, मका, उडीद, मूग, चवळी तसेच तणांचा समावेश होतो. ही सर्व पिके केळी लागवडीच्या परिसरात घेतली जात असल्याने रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

### कुकुंबर मोझॅक विषाणू रोगाची लक्षणे

- सुरुवातीस कोवळ्या पानांच्या शिरांतील हरितद्रव्य नष्ट होऊन पानांवर पिवळसर पट्टे दिसतात.
- हे पट्टे तुटक स्वरूपात किंवा संपूर्ण पानांवर पसरलेले असतात.
- नंतर शिरामधील ऊतक काळपट होऊन मृत पावते व पाने फाटतात.
- पानांचा पृष्ठभाग आकसतो, कडा वाकड्या होऊन पाने जवळ येतात.
- शिरा ताठर होऊन पाने कठीण होतात.
- तीव्र अवस्थेत पोंग्याजवळील पाने पिवळी पडून पोंगा सडतो.
- झाडाची वाढ खुंटते.

### व्यवस्थापन

विषाणू रोगाचे थेट नियंत्रण उपाय उपलब्ध नसले तरी, शिफारशीत तंत्रज्ञानाचा एकत्रित अवलंब केल्यास केळीवरील कुकुंबर मोझॅक विषाणूचे व्यवस्थापन शक्य आहे.

१. लागवडीसाठी निरोगी कंद फक्त निरोगी बागेतूनच निवडावेत.

२. लागवडीच्या वेळा काटेकोरपणे पाळाव्या. जून, ऑक्टोबर किंवा फेब्रुवारी महिन्यात लागवड करावी.
- मे-जून लागवडीत प्रादुर्भाव नगण्य आढळतो.
- उशिरा (जुलै-ऑगस्ट) लागवड



केल्यास प्रादुर्भाव जास्त होतो.

३. ऊतीसंवर्धित रोपे घेताना काळजी घ्यावी.
३०-४५ सेमी उंचीची, ४-६ पाने असलेली, दुय्यम कठीणता आणलेली रोपे निवडावीत.

४. ऊतीसंवर्धित रोपे स्थिरावल्यानंतर तसेच कंद लागवडीच्या रोपांवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निंबोळी अर्क किंवा डायमेथोएट यांची आलटून-पालटून फवारणी करावी.

५. केळीच्या बागेत आंतरपीक म्हणून काकडी, कारली, दुधी भोपळा, गिलकी, छोटा केना, चिलगोळ, शेंदाड इ. पिके घेऊ नयेत.

६. बाग व बांध नेहमी स्वच्छ आणि तणमुक्त ठेवावेत.

७. रोगाची लक्षणे दिसलेली झाडे त्वरित उपटून जाळून नष्ट करावीत. ती बांधावर फेकू नयेत.

८. मावा नियंत्रणासाठी
- सुरुवातीला निंबोळी अर्क (५%) फवारावा.
- नंतर आलटून-पालटून खालील रसायनांची फवारणी करावी.
- डायमेथोएट ३० ईसी (२५ मिली)
- थायोमिथोक्झाम २५ डब्ल्यूजी (७ ग्रॅम)
- इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल (७ मिली)
- लोनिकामाइड (७ ग्रॅम)

हे सर्व औषधे १५ लिटर पाण्यात मिसळून फवारावीत.

९. सतत एकाच ठिकाणी केळीचे पीक घेऊ नये; पिकांची फेरपालट करावी.

कुकुंबर मोझॅक विषाणू हा विषाणूजन्य रोग असल्याने त्यावर प्रभावी नियंत्रणासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत.

**डॉ. एस. एन. बन्ने**
**प्रा. व्ही. एस. जेऊर**
स. प्रा. श. कृ. महाविद्यालय, जैनापूर

# कपाशीवरील फुलकिडीचे एकात्मिक व्यवस्थापन

फुलकिडे ही कपाशी पिकावरील प्रमुख रसशोषण करणारी कीड असून, कपाशी पिकावर ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात या किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने आर्थिक नुकसान पातळीच्यावर दिसून येते. फुलकिडीच्या प्रादुर्भावामुळे पिकाचे आर्थिक नुकसान होते, त्यामुळे



कपाशीवरील फुलकिडींचा प्रादुर्भाव ओळखून एकात्मिक कीड उपाययोजना कराव्यात.

**कपाशीतील फुलकिड्यांचे जीवनक्रम :** फुलकिडीची अंडी, पिल्ले, सुप्तावस्था व प्रौढ अशा चार अवस्था असतात. मादी पिल्ले पानाच्या ऊतीमध्ये अंडी घालतात. पंख नसलेली लहान पिल्ले अंड्यातून बाहेर पडतात. कपाशीच्या पाने, फुले व बोंडीना खरतडून रस शोषण करतात. पिल्ले पिवळसर रंगाचे असतात, ते त्यांच्या प्रौढ सारखेच दिसतात, पण त्यांच्यात पंख नसतात. नंतर पिल्लं जमिनीत सुप्तावस्थेत (कोष) जातात. प्रौढ लहान व नाजूक असून, १ मि.मी. पेक्षा कमी लांब असतात. रंगाने फिकट पिवळसर किंवा तपकिरी असतात.

**नुकसान व प्रादुर्भाव :** प्रौढ फुलकिडे आणि पिल्लं कपाशीच्या फुले व पानामागील भाग खरवडून त्यातून निघणारा रस शोषण करतात. प्रादुर्भावग्रस्त भागातील पाने शुष्क होतात. तो भाग प्रथम पांढुरका आणि नंतर तपकिरी होतो, त्यामुळे पाने व कळ्या आकसतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास पाने कडक होऊन फाटतात. फुलकिडे पावसाळ्याच्या शेवटी आणि लांब उघाड पडली, तर मोठ्या संख्येत वाढतात. सप्टेंबर महिन्यात प्रादुर्भाव वाढतो. मागील काही वर्षांपासून फुलकिड्यांचा प्रादुर्भाव कपाशीवर जास्त प्रमाणात वाढत आहे.

### एकात्मिक व्यवस्थापन

- कपाशी लागवड शिफारशीप्रमाणे योग्य अंतरावर करावी. पिकामध्ये जास्त दाटी झाल्यास फुलकिड्याचा प्रादुर्भाव वाढतो.
- मृदा परीक्षणाच्या आधारावर रासायनिक खताचा शिफारशीत वापर करावा. नत्र खताचा वापर अधिक



प्रमाणात करू नये, जेणेकरून कपाशी पिकाची अनावश्यक कायक वाढ होणार नाही व पीक दाटणार नाही. त्यामुळे पर्यायाने पिकावरील कीड प्रादुर्भाव कमी राहील.
- किडीच्या पिलांची शेवटची अवस्था जमिनीत कोषावस्थेप्रमाणे निश्चल राहते. ही अवस्था कोळपणी व खुरपणी केल्यामुळे नष्ट होते.
- १० ते १२ निळे चिकट सापळे प्रती हेक्टरी शेतात लावावे.
- सुरुवातीच्या अवस्थेमध्ये ५ टक्के निंबोळी अर्काचा प्रतिबंधक फवारणी



करावी.
- रासायनिक किटकनाशकाचा वापर फक्त किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर करावा. किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच खालील लेबल क्लेम कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून वारणी करावी.
- फ्लोनीकॅमीड (५० डब्ल्यूजी) -३ ग्रॅम किंवा
- स्पायनेटोरम (११.७ एससी) -८ मिलि किंवा
- फिप्रोनील (१८.८७ एससी) - ७.५ मिलि किंवा
- डायफेन्थरॉन (५० डब्लयूपी)- १२ ग्रॅम
- फिप्रोनील १५ टक्के + ईमीडाक्लोप्रीड ५ टक्के एससी १० मिली
- फिप्रोनील १५ टक्के + फ्लोनीकॅमीड १५ टक्के डब्ल्यूडीजी ८ मिली

**डॉ. समीर लांडे**
(प्राचार्य)
**प्रा. किरण प्र. बुधवत**
(सहायक प्राध्यापक)
श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती

**संयोजक : निखिल रमेश यादव, कृषी पदव्युत्तर- ८४०८९१२७०६**

अर्थभान

## २१ मोदकांचा प्रसाद



चला तर, बाप्पाच्या आगमनाची प्रतीक्षा संपली. या आठवड्यात गणरायाचे आगमन होणार आहे. एक गुंतवणूकदार या नात्याने आपण काय करू शकतो आणि काय करायला नको, याचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल. तर, या मंगल समयी विघ्नहर्त्याचे स्मरण करून गुंतवणुकीत भरपूर यश मिळेल, अशी प्रार्थना करू आणि २१ मोदकरूपी प्रसाद (नियम) ग्रहण करू या.

**१) प्रथम तुला वंदितो...** सर जॉन टेम्पलटन यांनी गुंतवणुकीचे अतिशय सोपे असे नियम सांगितले आहेत. पहिला नियम- देवाला स्मरून गुंतवणुकीची सुरुवात केल्यास गुंतवणूकदार चांगल्या पद्धतीने विचार करू शकतो आणि त्यात चुकण्याची शक्यता कमी होते.

२) गृहपाठ व्यवस्थित करा आणि तज्ज्ञांचा सल्ला घ्या. गुंतवणूक करायच्या आधी त्याकरिता लागणारा गृहपाठ आणि नियोजन अतिशय महत्त्वाचे ठरते. त्यात गुंतवणूक सल्लागार किंवा फायनान्शियल प्लानर यांचा सल्ला मोलाचा ठरेल. ज्याप्रमाणे औषधांची अनेक दुकाने असूनसुद्धा आपण डॉक्टरांचा सल्ला घेतो, त्याचप्रमाणे फायनान्शियल प्लानरच्या मदतीने योग्य पद्धतीने गुंतवणूक केल्यास यश निश्चितच मिळेल.

३) ज्याप्रमाणे डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता किंवा अनुभव रोग निदानाकरिता महत्त्वाचे ठरते, त्याचप्रमाणे तुम्ही निवड केलेल्या फायनान्शियल प्लानरची विश्वासहार्तता, अनुभव महत्त्वाचं आहे. अत्यंत कष्टाने कमावलेल्या आपल्या पैशांची जबाबदारी आपलीच आहे, त्यामुळे ते योग्य व्यक्तीच्या सल्ल्यानेच गुंतवायला हवे.

**४) खर्च कमी करा :** सोपा आणि छोटा नियम पण अवलंबन करायला अतिशय कठीण. थोडा विचार करा- ५००० रुपये महिना खर्च कमी करणे सोपे आहे अथवा ५,००० रुपये महिना उत्पन्न वाढवण? समजा परतावा १० टक्के असल्यास किमान ६ लाखांची गुंतवणूक हवी, जेणेकरून त्यावर ५,००० रुपये मासिक उत्पन्न मिळेल. खर्चावर ताबा मिळवल्यास साहजिकच उत्पन्नात वाढ झाल्यासारखे फायदे मिळतील.

**५) लवकर सुरुवात आणि नियमितपणा -** लवकर आणि नियमित गुंतवणूक केल्यास मार्केटच्या चढउताराचा फायदा घेता येतो. ससा आणि कासवाच्या गोष्टीप्रमाणे कासवासारखी चिकाटी असणे कधीही फायद्याचे राहील.

**६) आरोग्य विमा -** आजच्या आधुनिक युगात वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. त्यामुळे एका सामान्य भारतीय व्यक्तीच आयुष्यमान वाढले आहे. पण, अनेक रोग/आजारसुद्धा मागे लागले आहे. योग्य आरोग्य विमा नसल्यास आणि खर्च भरमसाठ वाढल्यामुळे अनेक गुंतवणुका हॉस्पिटल बिल फेडण्याच्या कामी येतात. उपचाराकरिता गुंतवणूक बंद करायची दुर्दैवी स्थिती येऊ नये, याकरिता आरोग्य विमा हा प्रत्येकाने घेतलाच पाहिजे.

**७) जीवन विमा -** इन्श्यूरन्स हा एक खर्च आहे. त्यामुळे त्यात गुंतवणुकीच्या दृष्टीने पैसे लावू नये. ज्याप्रमाणे आपण गाडीचे इन्श्युरन्स करतो, त्याचप्रमाणे लाईफ इन्श्यूरन्स विकत घ्यावा. कमीत कमी खर्चात (अर्थात प्रीमियम) जास्तीत जास्त लाभ (विमा रक्कम) कसा घेता येईल, त्यादृष्टीने प्रयत्न करायला हवे. त्याकरिता टर्मप्लान/रिस्क इन्श्यूरन्स हे सर्वांत महत्त्वाचे ठरते.

**८) इन्फ्लेशन :** इन्फ्लेशन किंवा महागाई वाढीचा दर सर्वांत मोठा टॅक्स आहे. पण, बहुतांश वेळा त्याचा प्रभाव गुंतवणूकदाराच्या लक्षात येत नाही. टॅक्स दिल्यानंतर मिळालेले परतावे हे गुंतवणुकदाराचे खरे परतावे आहे. ज्याप्रमाणे गुंतवणुकीत चक्रवाढ पद्धती लागू होते, त्याचप्रमाणे महागाई वाढीच्या दरात दरवर्षी वाढ होत आहे. प्रत्येक गुंतवणुकीतले परतावे इन्फ्लेशनला मात देऊ शकत नाही. पण पोर्टफोलियोमध्ये अशा गुंतवणुकी जरूर असायला हव्या, ज्यात परतावे इन्फ्लेशनपेक्षा जास्त आहे.

**९) गुंतवणूकदार बना, ट्रेडर नव्हे -** योग्य विचार करून, व्यवस्थित अभ्यास करून दीर्घ मुदतीकरिता गुंतवणूक करा. नेहमी लक्षात असू द्या, चक्रवाढ व्याजची जादू अनुभवायाची असल्यास जास्तीत जास्त कालावधीकरिता केलेल्या गुंतवणुकीत फायदा होतो. शेअर्स किंवा म्युच्युयल फंडमध्ये नेहमी फेरफार/ट्रेडिंग केल्यास फक्त शेअर ब्रोकर किंवा म्युच्युयल फंड एजंटचा फायदा होईल, तुमचा नाही.

**१०) भेडचाल नको -** प्रत्येक व्यक्तीची आर्थिक स्थिती, त्याची जोखीम घेण्याची क्षमता आणि अपेक्षित आर्थिक उद्दिष्ट वेगळे असतात. त्यामुळे सगळे मित्र/नातेवाईक एका पद्धतीने/एका प्रकारात गुंतवणूक करतात म्हणून मी पण तिथेच गुंतवणुक करीन, हा विचार बरोबर नव्हे. स्वत:ला योग्य राहील आणि व्यवस्थित परतावे अनावश्यक जोखीम न घेता मिळतील, अशा ठिकाणी गुंतवणूक करणे श्रेयस्कर आहे.

११) देशाची अर्थव्यवस्था, रिझर्व्ह बँकचे धोरण, जगातील देशांमध्ये होणारे आर्थिक बदल, ट्रम्प यांनी केलेली व्यक्तव्ये, फंडामेंटल आणि टेक्निकल ऍनालिसिस यापेक्षा महत्त्वाचे आहे गुंतवणूकदाराची स्वत:ची आर्थिक स्थितीची जाणीव. स्वत:ची जोखीम घ्यायची इच्छाशक्ती आणि स्वत:चे आर्थिक उद्दिष्ट. जर गुंतवणूकदाराने या गोष्टींची काळजी घेऊन गुंतवणूक केली, तर त्याच्या गुंतवणुकीला निश्चितच योग्य दिशा मिळेल.

**१२) डायवर्सिफीकेशन :** सर्व गुंतवणुकी एकाच प्रकारच्या असेट क्लासमध्ये केल्यास जोखीम वाढते. त्यामुळे गुंतवणूकदाराने वेगवेगळ्या प्रकारच्या असेट क्लासमध्ये गुंतवणूक करावी, जेणेकरून पोर्टफोलियोची जोखीम तर कमी होईलच, सोबतच परतावे बरेच स्थिर होतील. निश्चित परतावे देणारे प्रॉडक्टस् अर्थात् डेट इन्व्हेस्टमेंट तसेच शेअर्स इत्यादीचा सहभाग असलेल्या पोर्टफोलियोमध्ये गुंतवणूकदाराला चांगला परतावा कमी जोखीम घेऊन मिळू शकतो.

**१३) पारदर्शिता -** गुंतवणूक केल्यास कमी-जास्त परतावे हे त्याचा अविभाज्य भाग आहेच. पण हे परतावे कसे येतात, हे माहिती करून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. कुठलीही गुंतवणूक परिपूर्ण नसते. एखाद्या गुंतवणुकीत परतावे कमी, कुठे लिक्विडिटी नाही, तर कुठे त्यावर कर जास्त बसतो. पण नेहमी लक्षात असू द्या, गुंतवणुकीचे परतावे कसे येतात आणि जोवर त्याचे लॉजिकल उत्तर मिळत नाही, तोवर त्यात गुंतवणूक करू नये.

**१४) आयकर सवलती -** कर वाचतो किंवा एखाद्या गुंतवणूक प्रकारात आयकरात सूट मिळते, फक्त या एकमेव कारणाकरिता गुंतवणूक करणे बरोबर नव्हे. त्यातले परतावे महत्त्वाचे आहेतच आणि ते गुंतवणूकदाराच्या आर्थिक उद्दिष्टाला अनुसरून असायला हवे.

**१५) मोठ्या चुका टाळा -** लवकरात लवकर श्रीमंत होण्याच्या नादात किंवा जास्त परताव्यांचा लोभापायी गुंतवणूक करू नये. सामान्य परतावे जास्त कालावधीकरिता असणे कधीही फायद्याचे आहे. पण, भरपूर परतावे आहेत म्हणून गुंतवणूक करून मूळ रक्कमच धोक्यात घालायची, हे बरोबर नव्हे. त्यामुळे जास्त परतावे तेही गॅरंटीसोबत ही धोक्याची घंटा समजावी.

१६) टीव्ही हे माध्यम मनोरंजनाकरिता तयार झाले आहे, त्यात माहिती, बातम्या, विश्लेषण या गोष्टी नंतर आल्या. आर्थिक वृत्तवाहिन्यांमधील सर्व माहिती बरोबरच आहे किंवा त्याचा हेतू गुंतवणूकदारांच्या फायद्याचाच आहे, हे जरूरी नव्हे. श्री गणरायाप्रमाणे ते सगळं ऐकून खरचं आपल्या हिताचा आहे का, याचे विश्लेष करून मगच त्यावर कृती करावी.

**१७) घाबरू नका -** प्रत्येक गुंतवणुकीचे काही फायदे आणि तोटे असतात. कुठलीच गुंतवणूक परिपूर्ण नसते. त्यामुळे एखाद्या गुंतवणुकीत तोटा झाल्यास त्याला वर्ज्य मानू नका. त्याचा व्यवस्थित अभ्यास करा, आपण काय चूक केली, याबद्दल आपल्या प्लानरसोबत विचारविनिमय करा. घाबरून त्या गुंतवणुकीला वर्ज्य केल्यास त्यातले फायदे पण हातातून जातील.

१८) कर्ज घेऊन कधीही गुंतवणूक करू नये. बऱ्याच वेळेस असे बघण्यात येते की, कर्जावरील व्याजदर ९-१० टक्के आहे, पण शेअर्स/डेरिव्हेटीटजमध्ये तेजी असताना त्यात १५-२० टक्के मिऴत आहे. परतावे कमी-जास्त होतील, पण व्याज भरणं हे नेहमी आवश्यक राहील. त्यामुळे कितीही आकर्षक वाटत असेल तरी कर्ज घेऊन गुंतवणूक करू नये.

**१९) इक्विटी लॉंग टर्म, डेट शॉर्ट टर्म -** प्रत्येक व्यक्तीचे काही आर्थिक उद्दिष्ट लॉंग टर्म असतात तर काही कमी कालावधीचे असतात. सामान्यत: जेव्हा कालावधी लांब आहे, त्याकरिता गुंतवणुकीत जास्त जोखीम घेतल्या जाऊ शकते. अशा वेळेस शेअर्स/स्टॉक्स इत्यादी गुंतवणूक फायद्याची ठरेल. पण, कालावधी कमी असल्यास बॉन्डस्, फिक्स डिपॉझिट इत्यादी ठिकाणी गुंतवणूक करावी.

**२०) कंपाऊंडिंग/चक्रवाढ़ व्याज -** नेहमी लक्षात असू द्या, हे जगातले आठवे आश्चर्य आहे. याचा पुरेपूर फायदा घेऊन गुंतवणूकदाराने आपल्या आर्थिक उद्दिष्टाकडे वाटचाल करावी. या नियमाप्रमाणे लांब कालावधीकरिता गुंतवणूक करावी.

२१) वर्षातून किमान एकदा तरी आपल्या सर्व गुंतवणुकी, इन्श्युरन्स इत्यादीचे मूल्यांकन आणि ते योग्य ठिकाणी आहे, याची काळजी घेणे आवश्यक आहे. आर्थिक परिस्थितीत बदल होतच असतो. त्यामुळे गुंतवणुकीत बदल करण्याची आवश्यकता असल्यास आपल्या फायनांशियल प्लानरसोबत बसून त्याचे नियोजन वर्षातून एकदा तरी करायलाच हवे. ●●

● **पराग परांजपे**
गुंतवणूक तज्ज्ञ/
९८२२७३८९०३
Think Financial Intermediary Services Pvt. Ltd.

TOYOTA

## टीकेएमची कॅमरी स्प्रिंट बाजारात दाखल



ख्यातनाम टोयोटा किर्लोस्कर मोटरने (टीकेएम) भारतीय बाजारात कॅमरी स्प्रिंट एडिशन लॉन्च केली आहे. ही नवीन स्पेशल एडिशन गाडी तिच्या स्पोर्टी लूक आणि ॲडव्हान्स फीचर्समुळे नियमित एलिगन्स व्हेरिएंटपेक्षा अधिक आकर्षक दिसते. या नव्या गाडीची एक्स-शोरूम किंमत ४८.५० लाख एवढी आहे. कॅमरी स्प्रिंट एडिशनला अधिक स्पोर्टी बनविण्यासाठी अनेक कॉस्मेटिक बदल करण्यात आले आहेत. यात स्पोर्टी फ्रंट आणि रिअर बंपर एक्सटेन्शन, ब्लॅक कलरचे १८-इंच अलॉय व्हील आणि बूट लाईटवर एक छोटा स्पॉयलर देण्यात आला आहे. ही स्पेशल एडिशन प्लॅटिनम व्हाईट पर्ल, डार्क ब्लू मेटॅलिक, इमोशनल रेड, सीमेंट ग्रे आणि प्रीव्हियस मेटल या पाच रंगात उपलब्ध आहे. कॅमरी स्प्रिंट एडिशन केवळ लूकच्या बाबतीतच नाही, तर फीचर्सच्या बाबतीतही खूप ॲडव्हान्स आहे. यात १२.३ इंच डिजिटल इन्स्ट्रुमेंट क्लस्टर, १२.३-इंच टचस्क्रीन इन्फोटेनमेंट सिस्टीम आणि वायरलेस ॲपल कारप्ले आणि वायर्ड ॲंड्रॉईड ऑटो यासारखे फीचर्स मिळतात. सुरक्षेसाठी यात टोयोटाचा सेफ्टी सेन्स ३.० सूट आणि पार्किंग सेन्सर्सही दिले आहेत. ●●

Ravalgaon

उद्योगाच्या उगमकथा

## रावळगाव चॉकलेट



१९२३ मध्ये एक महत्त्वाकांक्षी उद्योगपती सेठ वालचंद हिराचंद रावळगाव येथे आले, या विश्वासाने की, जर भारताने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःचे उद्योग विकसित केले, तर तो आपली आर्थिक स्थिती सुधारू शकेल आणि वसाहतवादी शोषणापासून मुक्त होऊ शकेल. त्यांना हे जाणवले की, भारतातील सर्वांत मोठा उद्योग असलेल्या शेतीला या क्रांतीत सहभागी व्हावे लागेल. महाराष्ट्रातील रावळगाव हे रावळगाव चॉकलेट, पानपसंद आणि मँगो मूड यासारख्या कॅंडीजसाठी प्रसिद्ध असलेल्या रावळगाव या प्रतिष्ठित भारतीय मिठाई ब्रॅण्डचे उगमस्थान आहे.

या ब्रॅण्डची कहाणी १९३३ मध्ये सुरू झाली, जेव्हा सेठ वालचंद हिराचंद यांनी रावळगाव शुगर फार्मची स्थापना केली. १९४० च्या दशकात त्यांनी मिठाई उत्पादनात विस्तार केला. शेतातील साखरेचा वापर करून त्यांचे पदार्थ तयार केले. रावळगावच्या अनोख्या दृष्टिकोनात स्थानिक शेतकऱ्यांशी जवळून काम करणे, शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे आणि गुणवत्ता तसेच परवडणाऱ्या किमतीला प्राधान्य देणे समाविष्ट होते.

त्यांनी १,५०० एकर ओसाड जमीन खरेदी केली आणि ती साफ करून त्या जागी सुपीक माती आणण्यास सुरुवात केली. त्यांनी अनुभवी शेतकरी, रसायनशास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या सेवा घेतल्या. दशकभराच्या चिकाटीनंतर त्यांनी या प्रदेशात ऊस पिकवला आणि भारतातील पहिल्या साखर कारखान्यांपैकी एक उभारला. अशा प्रकारे १९३३ मध्ये रावळगाव शुगर फार्म लिमिटेडची स्थापना करण्यात आली. १९४० च्या दशकात त्यांनी त्यांच्या साखर उत्पादनाचा काही भाग रावळगाव ब्रॅण्ड अंतर्गत मिठाई विकसित करण्यासाठी वापरला. रावळगाव शुगर फार्म लिमिटेड ही एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे, जी मिठाई बनवते. कंपनीची स्थापना १९३३ मध्ये वालचंद ग्रुपचा भाग म्हणून झाली होती; परंतु आज ती स्वतंत्रपणे कार्यरत आहे. कंपनीचे ध्येय प्रत्येकासाठी उपलब्ध आणि प्रत्येकासाठी परवडणारे ग्राहकोपयोगी पदार्थ तयार करणे आणि त्यांची विक्री करणे होते. कंपनीच्या अत्याधुनिक कारखान्यात कडक उकडलेल्या मिठाई आणि टॉफीसाठी अनेक हाय-स्पीड कुकिंग, फॉर्मिंग आणि पॅकेजिंग लाईन आहेत. कडक उकडलेल्या मिठाई डाय-फॉर्म केलेल्या आहेत, ज्यात सॉफ्ट सेंटर फिलिंगचा पर्याय आहे. त्या डबल-ट्विस्ट, सिंगल-ट्विस्ट आणि फ्लो पॅक (पिलो पाउच) तंत्रांचा वापर करून गुंडाळल्या जातात.

कारखाना २२,००० प्रमाणित आहे. यंत्रसामग्री जर्मनी, यूके, इटली आणि भारतातील जगातील आघाडीच्या उत्पादकांकडून उत्पादित केली जाते. प्रक्रिया तंत्रज्ञानातील ही गुंतवणूक उत्पादनांची सातत्य आणि उच्च दर्जाची खात्री देते. १९३४ मध्ये पुण्याजवळील कळंब येथे सेठ वालचंद यांनी रावळगाव येथे विकसित केलेल्या कृषी मॉडेलची प्रतिकृती तयार केली. तेव्हापासून विकसित झालेल्या समृद्ध शहराचे नाव वालचंदनगर ठेवण्यात आले आहे. येथे वालचंदनगर इंडस्ट्रीज लिमिटेड आहे, जी साखर-मिलणीच्या मुळांपासून साखर, सिमेंट आणि वीज प्रकल्पांसाठी हेवी-इंजिनीअरिंग उत्पादने तयार करण्यासाठी विकसित झाली आहे. रावळगाव आणि वालचंदनगरच्या अभूतपूर्व यशामुळे महाराष्ट्रात झालेल्या साखर क्रांतीचे श्रेय बहुतेकदा सेठ वालचंद यांना जाते.

रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स, एफएमसीजी शाखा आणि रिलायन्स रिटेल व्हेंचर्सची उपकंपनीने रावळगाव शुगर फार्मच्या मिठाई व्यवसायाचे ट्रेडमार्क, पाककृती आणि बौद्धिक संपदा हक्क विकत घेतले आहेत. सेठ वालचंद यांनी स्वतंत्र भारतासाठी एक धोरणात्मक दृष्टिकोन मांडला आणि त्यांच्या स्वतःच्या अमर्याद उपक्रमाद्वारे त्यांची भूमिका बजावली.

रावळगाव चॉकलेट , टूटी फ्रूटी , पान पसंद चॉकलेट, मँगो मूड, मिक्स चेरी कॅंडीज, कॉफी ब्रेक टॉफी, सुप्रीम टॉफीज ही उत्पादने प्रसिद्ध आहेत. रावळगाव ची टॅग लाईन आहे - स्वीट स्माईलस ऑन मिलियन्स ऑफ फेसेस. ●●

● **प्रा. दीपक कुळकर्णी**
९८२२५७५२५७


## निवृत्ती नियोजन : सुरक्षित आणि आनंदी भविष्याचा पाया

गुंतवणुकीची गोष्ट

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण कमावण्यात, खर्च करण्यात आणि तत्कालिक गरजा पूर्ण करण्यात व्यस्त असतो. पण, निवृत्तीनंतरचे आयुष्य अनेकदा आपण विचारात घेत नाही. नोकरी किंवा व्यवसाय संपल्यानंतर नियमित उत्पन्न थांबते, पण खर्च थांबत नाही. अशावेळी आधीच नियोजन केले नसेल, तर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळेच निवृत्ती नियोजन हे प्रत्येकासाठी महत्त्वाचे आहे.

**निवृत्ती नियोजन का आवश्यक आहे?**

१. **उत्पन्न थांबते, खर्च सुरू राहतो -** घरखर्च, आरोग्य, औषधे, दैनंदिन गरजा सतत चालू राहतात.



२. **आयुर्मान वाढले आहे -** वैद्यकीय सुविधांमुळे लोकांचे सरासरी आयुर्मान वाढले आहे. म्हणजेच जास्त वर्षे आर्थिक आधार लागणार.
३. **महागाईचा परिणाम -** आजचा खर्च २० वर्षांनंतर दुप्पट-तिप्पट होईल.
४. **कौटुंबिक बदल -** संयुक्त कुटुंब पद्धत कमी होत आहे. मुलांवर अवलंबून राहणे कमी सुरक्षित.

**निवृत्ती नियोजनाची पायरी**

१. **भविष्याचा खर्च अंदाज :** निवृत्तीनंतर दरमहा किती खर्च अपेक्षित आहे, याचा अंदाज बांधणे. त्यात महागाईचा विचार करणे आवश्यक.
२. **आवश्यक निधी ठरवणे :** २५-३० वर्षांच्या निवृत्ती आयुष्यासाठी किती निधी लागेल हे ठरवणे.
३. **योग्य गुंतवणूक साधनांची निवड**
- पीएफ (भविष्य निर्वाह निधी), - सुरक्षित व दीर्घकालीन बचत.
- एनपीएस (नॅशनल पेन्शन सिस्टीम) करसवलत + निवृत्ती.
- म्युच्युअल फंड एसआयपी - दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी.
- विमा योजना/पेंशन योजना - स्थिर उत्पन्नासाठी.

**४. लवकर सुरुवात :** जितक्या लवकर आपण गुंतवणूक सुरू कराल, तितका चक्रवाढ व्याजाचा फायदा मिळेल. वयाच्या २५व्या वर्षी सुरुवात केल्यास छोट्या रकमेतही मोठा निधी तयार होऊ शकतो.

**५. जोखीम व्यवस्थापन**
- तरुण वयात जास्त इक्विटी
- मध्यम वयानंतर बॅलेन्सड् फंड
- नवृत्ती जवळ आल्यावर - डेब्ट ओरिएंटेड गुंतवणूक जास्त ठेवावी.

**निवृत्ती नियोजनातील सामान्य चुका**
- उशिरा सुरुवात करणे.
- फक्त फिक्स्ड डिपॉझिटवर अवलंबून राहणे.
- महागाईचा विचार न करणे.
- विमा आणि गुंतवणूक यात गोंधळ करणे.
- नियोजन, वेळोवेळी पुनरावलोकन न करणे.

**भारतातील सद्य:स्थिती**

आज भारतात सरकारी नोकरीतील निवृत्त व्यक्तींना पेन्शनची हमी असते, पण खाजगी क्षेत्रात बहुतेकांना पेंशन सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील व्यक्तींनी स्वतःचे निवृत्ती नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

एएमएफआय व सेबीच्या अहवालानुसार गेल्या काही वर्षांत एनपीएस व म्युच्युअल फंड एसआयपीद्वारे निवृत्ती निधी तयार करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

**आपत्कालीन निधी**
- निवृत्तीनंतरही अचानक वैद्यकीय खर्च, दुरुस्ती, प्रवास अशा गोष्टींसाठी वेगळा निधी ठेवणे आवश्यक आहे.
- हा निधी किमान ६१२ महिन्यांच्या खर्चाइतकाच असावा.

**आरोग्य विमा**
- वय वाढल्यावर आजारपणाची शक्यता जास्त असते.
- निवृत्तीनंतर वैद्यकीय खर्च हा मोठा भार ठरू शकतो, त्यामुळे आरोग्य विमा ठेवणे अत्यावश्यक आहे.

**पॅसिव्ह इन्कम सोर्सस**
- निवृत्तीच्या काळातही काही उत्पन्नाचे स्रोत तयार ठेवणे फायद्याचे ठरते.

उदा. भाडे मिळणारी मालमत्ता, डिव्हिडंड येणारे शेअर्स, मासिक उत्पन्न योजना, ॲन्युइटी योजना.

**कर्जमुक्त निवृत्ती**
- निवृत्त होण्यापूर्वी गृहकर्ज, वाहन कर्ज, क्रेडिट कार्ड देणी इत्यादी कर्जे फेडून टाकणे आवश्यक आहे.
- कर्जमुक्त जीवन हे शांत आणि निर्धास्त निवृत्तीचे महत्त्वाचे अंग आहे.

**वसीहत व वारसा नियोजन**
- निवृत्तीनंतर आपल्या मालमत्तेचे योग्य विभाजन व्हावे म्हणून वसीहत तयार करणे.
- यामुळे वारसांमध्ये गैरसमज टाळता येतात.

जीवनशैलीचे नियोजन
- निवृत्तीनंतरचश जीवनमान कसे ठेवायचे, याचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे.
- खर्च कमी करून साधे पण समाधानकारक जीवन जगणे शक्य होते.

**नियमित पुनरावलोकन**
- बाजारातील बदल, महागाई, व्याजदर यानुसार निवृत्ती योजनेत बदल करणे आवश्यक.
- दर २३ वर्षांनी आपल्या पोर्टफोलिओचे पुनरावलोकन करणे फायदेशीर.

**मानसिक आणि सामाजिक तयारी**
- निवृत्ती म्हणजे केवळ आर्थिक बाब नव्हे, तर मानसिक तयारीदेखील हवी.
- छंद जोपासणे, समाजसेवा, प्रवास अशा गोष्टींनी जीवनात आनंद ठेवता येतो.

**छोटे उदाहरण**
- जर एखादी व्यक्ती वयाच्या ३०व्या वर्षी दरमहा १०,००० रुपये एसआयपीमध्ये गुंतवणूक करतो आणि सरासरी १२% वार्षिक परतावा मिळतो, तर ६० व्या वर्षी त्याच्याकडे सुमारे ३.५ कोटी रुपये इतका निधी जमा होऊ शकतो. ही रक्कम निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी मोठा आधार ठरते.

**निष्कर्ष :** निवृत्ती हा आयुष्याचा शेवट नसून नवीन टप्प्याची सुरुवात आहे. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि सुरक्षित राहण्यासाठी निवृत्ती नियोजन लवकरात लवकर सुरू करणे गरजेचे आहे. योग्य साधनांमध्ये शिस्तबद्ध गुंतवणूक, महागाईचा विचार आणि जोखीम व्यवस्थापन या गोष्टी लक्षात घेतल्या, तर निवृत्तीनंतरचे आयुष्य निर्धास्त, सुरक्षित आणि आनंदी होऊ शकते. ●●

● **शिवानी दाणी-वखरे**
संचालिका, मनी बी इन्स्टिट्यूट प्रा. लि.
९८६०१३३८६०

## गुंतवणूकदार 'हाय-अलर्ट'वर

गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ज्या पद्धतीने जागतिक स्तरावर आसूड ओढले आहेत. त्याचे पडसाद सातत्याने दिसत आहेत. विशेषत : शेअर बाजार तसाही फारच संवेदनशील घटक आहे. येथे छोट्या-मोठ्या सर्वच घटनांचे पडसाद दिसून येतात. ट्रम्पच्या टॅरिफचा फटका भारताला बसणार, ही बातमी मागील काही काळापासून भारतीय शेअर बाजारांना पीडक ठरत आहे. त्यामुळे गुंतवणूकदार सावध पवित्रा घेत एकतर गुंतवणूक काढून घेताहेत किंवा नवी गुंतवणूक करण्यापासून हात रोखताहेत.

मागील आठवड्याचे चित्र काही वेगळे नव्हते. चढ-उतारांनी भरलेल्या आठवड्याचा शेवट मोठ्या घसरणीनेच झाला. सहा दिवस थोडी-फार तेजी असली तरी सातव्या दिवशी ती थांबली आणि गुंतवणूकदारांनी नफा वसुलीला प्राधान्य दिले. बाजारातील अस्थिरता आणखी वाढल्याचे हे संकेत होते. मात्र, यावेळी बाजारातील घसरणीला कारण ट्रम्प नसले तरी अमेरिका नक्कीच होते. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे प्रमुख जेरोम पॉवेल यांचे जॅक्सन होल परिषदेत होणारे भाषण अतिशय महत्त्वाचे राहणार आहे. व्याजदर कपातीबाबत ते काही संकेत देतात की काय, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**मार्केट गुरू अडचणीत**

मागील आठवड्यातील आणखी एक मोठी घडामोड म्हणजे प्रसिद्ध ट्रेडिंग गुरू आणि मार्केट इन्फ्लुएंसर अवधूत साठे यांच्यावर सेबीची झालेली कारवाई. सेबीच्या पथकाने सह्याद्री हिल्सवरील कर्जतमधील त्यांच्या अकादमीवर छापा टाकला. साठे हे गेल्या महिन्याभरापासून सेबीच्या रडारवर होते. त्यांच्या विरोधात गुंतवणूकदारांची दिशाभूल करण्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. यानंतर कोर्टाच्या परवानगीने संपूर्ण ऑपरेशन प्लॅन करण्यात आले. विशेष म्हणजे, बुधवारी सकाळी सुरू झालेली ही कारवाई गुरुवारी संध्याकाळपर्यंत सुरू होती. छाप्यातील सर्व डिजिटल डिव्हाईसेस आणि ट्रेडिंग डेटा जप्त करून त्याची फॉरेन्सिक तपासणी करण्याचा आदेश देण्यात आला आहे.



साठेंवर लाईव्ह मार्केट डेटा वापरणे, गॅरंटीड रिटर्नचे आश्वासन देणे आणि सेबी नोंदणीशिवाय बाजारात काम करणे, आदी आरोप होते. हे नियमाबाह्य असल्याने त्यांच्यावर कारवाई होणे अपरिहार्यच होते. साठे यांच्यावरील कारवाईनंतर मार्केट इन्फ्लुएंसर्समध्ये खळबळ उडाली आहे, आता सेबी कोणालाही सोडणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कितीही मोठे नाव असले तरी नियमभंग झाल्यास कारवाई होणारच, हा संदेश बाजारात गेला आहे. ही कारवाई करीत सेबीने आपली दोन उद्दिष्टे स्पष्ट केली. एकतर गुंतवणूकदारांना चुकीच्या सल्ल्याने फसवणाऱ्या व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि दुसरे म्हणजे बाजारात 'गुरू'च्या नावाखाली पेनी स्टॉक्स आणि इतर संशयास्पद गुंतवणुकींना चालना देणाऱ्यांना इशारा देणे. यापुढे कोणालाही अशा प्रकारांसाठी सोडले जाणार नाही, असा इशाराच सेबीने या कारवाईद्वारे दिला आहे. ●●

● **सोनाली ठेंगडी-** ७७५५९३८८२२

| | १५ ऑगस्ट बंदभाव (रु.) | २२ ऑगस्ट बंदभाव (रु.) | उतार/चढाव |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ८०५९७ | ८२००० | +१४२ |
| निफ्टी | २४६३१ | २५०८३ | +४५२ |
| सोने (१० ग्रॅम) | १००२०० | ९९५०० | -७०० |
| चांदी प्रति किलो | ११६१०० | ११४००० | -२१०० |
| कच्चे तेल बॅरल | $ ६५.८५ | $ ६७.७३ | $ -१.८८ |

जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी)

## काय मिळू शकते, काय नाही?

**१. आयटीसी म्हणजे काय? (कन्सेप्ट)**

जीएसटी प्रणालीत आयटीसी हा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक टप्प्यावर फक्त मूल्य वृद्धी वर कर लागू होण्यासाठी आयटीसीची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे कराचा डबल परिणाम (टॅक्स व टॅक्स) होत नाही आणि अंतिम ग्राहकावर होणारा भार कमी होतो.

**उदाहरण :** कच्चा माल खरेदी = रु. १,००,००० + जीएसटी १८% = रु. १८,०००, प्रक्रिया/कामगार खर्च = रु. ५०,०००, विक्री किंमत = रु. १,५०,००० + जीएसटी १८% = रु. २७,०००, सरकारला देय = रु. २७,००० - रु. १८,००० (आयटीसी) = रु.९,०००, म्हणजेच, फक्त रु. ५०,००० मूल्य वृद्धीवर कर लागला.

**२. आयटीसी मिळण्यासाठी आवश्यक अटी (कलम १६, सीजीएसटी २०१७)**

आय टी सी घेण्यासाठी खालील अटी पूर्ण झालेल्या असाव्या:
१. करदाता जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत असावा.
२. त्याच्याकडे वैध इन्व्हॉईस किंवा डेबिट नोट असावी.
३. माल/सेवा प्रत्यक्ष प्राप्त झालेले असावेत.
४. पुरवठादाराने तो जीएसटी सरकारला भरलेला असावा.
५. करदात्याने आपला जीएसटीआर - ३बी दाखल केलेला असावा.
६. संबंधित इन्व्हॉईस जीएसटीआर-२बी मध्ये दिसला पाहिजे.

**लक्षात ठेवा :** सप्लायरने जीएसटीआर-१ भरले नसेल, तर खरेदीदाराला आयटीसी मिळत नाही.

**३. आयटीसी कुठे मिळतो? (एलिजिबल आयटीसी)**

**आयटीसी खालील बाबींवर मिळतो:**
- इनपुट- कच्चा माल, पॅकिंग मटेरियल, कॉन्स्यूमेबल्स.
- इनपुट सर्विसेस - ऑफिस भाडे, वकील/सीए फी, जाहिरात, ऑडिट.
- कॅपिटल गुड्स - यंत्रसामग्री, कॉम्प्युटर, ऑफिस इक्विपमेंट.
- इंपोर्टस - आयातीवर भरलेला आयजीएसटी.
- रिव्हर्स चार्जे सर्व्हिस - जसे की जीटीए, एडव्होकेट सर्व्हिस सरकारला भरल्यावर आयटीसी घेता येतो.
- एक्स्पोर्ट व झिरो रेटेड सप्लायज -आयटीसी मिळतो, रिफंड पण घेता येतो.

**४. आयटीसी मिळत नाही (ब्लॉकडं क्रेडिट्स - कलम १७(५))**

**खालील खर्चांवर आयटीसी मिळत नाही:**
- मोटार गाड्या (फक्त ट्रान्सपोर्ट, ड्रायव्हिंग स्कूल, पॅसेंजर ट्रान्सपोर्टसाठी वापरल्यास अपवाद).
- अन्नपदार्थ, कॅटरिंग, ब्युटी ट्रीटमेंट, क्लब मेंबरशिप, हेल्थ आणि फिटनेस खर्च.




- वर्क्स कॉन्ट्रॅक्ट - इमारत बांधकामासाठी (स्वतःच्या वापरासाठी).
- इमारत/फॅक्टरी/ऑफिस बांधकामावर आयटीसी नाही (रिसेल असेल तर अपवाद).
- वैयक्तिक वापरासाठी घेतलेला माल/सेवा.
- हरवलेला, चोरी गेलेला, नष्ट झालेला, सॅम्पल किंवा गिफ्ट दिलेला माल.
- सीएसआर खर्च - बहुतांश प्रकरणांत नाकारला जातो.

**५. आयटीसी घेण्याची वेळ मर्यादा**

आयटीसी फक्त त्या आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्याच्या रिटर्नपर्यंत (पुढील वर्षी) किंवा वार्षिक रिटर्न. (जीएसटीआर-९) भरण्यापर्यंत - जे आधी असेल ते. उदा. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी आयटीसी घेण्याची शेवटची तारीख = ३०.११.२०२५.

**६. परत करावा लागणारा आयटीसी**

खालील परिस्थितीत आयटीसी परत करावा लागतो:
- इन्व्हॉईसची रक्कम १८० दिवसांत सप्लायरला न दिल्यास.
- एक्झेम्प्ट सर्व्हिसेस (करमुक्त माल/सेवा) - प्रोपोर्शनल रिव्हर्सल.
- सप्लायरने क्रेडिट नोट दिल्यास.
- काम्पोजिशन सर्व्हिसेसमध्ये गेल्यास.
- वैयक्तिक वापर/ नॉन-बिझनेस वापर असल्यास.

**७. जीएसटीआर-२बी मॅचिंग व निर्बंध**

आयटीसी घेण्यासाठी इन्व्हॉईस जीएसटीआर-२बी मध्ये दिसणे आवश्यक आहे. सरकारने २०२२ पासून प्रोव्हिजनल आयटीसी बंद केले आहे. यामुळे खरेदीदार पूर्णपणे सप्लायरच्या कंप्लायन्सवर अवलंबून झाला आहे.

**८. विशेष बाबी (स्पेशल केसेस)**
- इनपुट सर्विस डिस्ट्रिब्युटर (आयएसडी) : हेड ऑफिसकडून ब्रांचला आयटीसी वाटप करता येते.
- जॉब वर्क : जॉबवर्कसाठी पाठवलेल्या वस्तूंवर आयटीसी मिळतो.
- ई-कॉमर्स : ॲमेझॉन/फ्लिपकार्ट यासारख्या प्लॅटफॉर्मवरील कमिशनवर आयटीसी.
- एक्स्पोर्ट:पूर्ण आयटीसी मिळतो, रिफंड घेता येतो.

**९. न्यायालयीन निर्णय व ॲडव्हान्स रुलिंग्स**
- सफारी रिट्रीट्स प्रायव्हेट लिमिटेड (ओडिशा उच्च न्यायालय) : शॉपिंग मॉल कन्स्ट्रक्शनवर आयटीसी नाही.
- कल्पतरू लिमिटेड (एएआर महाराष्ट्र) : सीएसआर खर्चावर आयटीसी नाही.
- डी. वाय. बिथेल एन्टरप्रायझेस (मद्रास उच्च न्यायालय) : विक्रेत्याने कर न भरल्यामुळे खरेदीदाराचा आयटीसी नाकारणे चुकीचे.

**१०. अलिकडील बदल (२०२४-२५)**
- कलम ३८ बदल : सप्लायर डिफॉल्ट असल्यास आयटीसी मिळत नाही.
- जीएसटीआर-२बी वर १००% अवलंबित्व.
- एक्स्पोर्ट रिफंड सुलभ.
- ऑटोमेटेड आयटीसी मिसमॅच नोटिसेस (डीआरसी-०१ सी).

**निष्कर्ष :** जीएसटीमधील इनपुट टॅक्स क्रेडिट ही एक शक्तिशाली यंत्रणा आहे, जी दुप्पट कर टाळते आणि व्यवसायाचा खर्च कमी करते. पण, आयटीसी मिळवण्यासाठी कठोर अटी व वेळ मर्यादा पाळणे आवश्यक आहे. ●●

● **ॲड. हितेश प्रवीण पारसे**
९०९६३३२३५३
कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार

● संयोजक - **अभिजित वर्तक** ९४२२९२३२०१

# पावसाने पुन्हा झोडपले; शेतकऱ्यांचा आक्रोश

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २८ ऑगस्ट -**

गुरुवारी पहाटेपासून नायगाव तालुक्यात परतीच्या मुसळधार पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला असून, संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. सततच्या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले असून, अनेक गावांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

नरसी परिसरात संकट गडद नरसी गावात के.टी. कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत बांधण्यात आलेली नाली अत्यंत अरुंद असल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्या वरून मुख्य बाजारपेठ व घरांमध्ये शिरले. मुखेड रोड लगत राहणाऱ्या गोरगरीब कुटुंबांचे घरगुती साहित्य, अन्नधान्य साठा पाण्यात भिजून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



नाल्यांमध्ये अडलेला केरकचरा व निकृष्ट दर्जाचे बांधकाम यामुळे नाले पूर्णपणे तुंबले आहेत.

**शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त**

पावसाचा फटका केवळ घरापुरता मर्यादित न राहता, शेतकऱ्यां च्या शेतातही प्रचंड कहर करीत आहे. नरसी, नरसी तांडा, होटाळा, मुगांव, धानोरा, कुंचेली, बेद्री खंडगांव, मरवाळी, मरवाळी तांडा, पळसगांव, कहाळा या भागातील शेतजमिनी जलमय झाल्या आहेत. लाखो रुपयांचे उभे पिके हातातून गेल्याने शेतकऱ्यांवर अक्षरशः आभाळच कोसळले आहे. काही भागांतील जमिनी खरडून गेल्याचे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे आहे.

**माणुसकीची ओळख ठरले बच्चेवार यांचे पाऊल**

या गंभीर परिस्थितीत माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी बच्चेवार यांनी पूरग्रस्त भागांना भेट दिली. शेतकऱ्यांना धीर देताना त्यांनी शासनापर्यंत शेतकऱ्यांचे दुःख पोहचवण्याचा प्रयत्न केला. शासनाने आता तरी जागं व्हावं, अशी त्यांची भावनिक प्रतिक्रिया होती.

**फक्त पाहणी नको, मदतीचा हात हवा!**

नायगांव तालुक्यातील शेतकरी अक्षरशः उघड्यावर आले आहेत. शासन व प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन तलाठ्यांपासून ते तहसीलदारांपर्यंत संपूर्ण यंत्रणा कामाला लावावी, पंचनामे पूर्ण करून 'ओल्या दुष्काळा' ची तात्काळ घोषणा करावी, अशी आर्त मागणी शेतकरी बांधव करत आहेत.

**खाकी वर्दीतून माणुसकीची सेवा**

या संकटाच्या काळात रामतीर्थ पोलीस ठाण्याचे निरीक्षक विक्रम हराळे यांनी पोलीस हेडकॉन्स्टेबल गणपत राठोड व अन्य पोलीस या कर्मचाऱ्यांसह तळणी येथील पूरग्रस्त पुलावर तासन् तास उभे राहत वाहतूक नियंत्रित केली. मुसळधार पावसात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी प्रत्येक वाहनधारकांना योग्य मार्ग दर्शन करून खाकी वर्दीतून माणुसकीचे दर्शन घडवले. त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. पाहणी दौरे, भाषणे आणि दिला से या पलीकडे जाऊन आता शासनाने प्रत्यक्ष मदत दिली पाहिजे. 'ओला दुष्काळ' जाहीर करून शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई मिळावी,हीच नायगांव तालुक्यातील जनतेची एकमुखी मागणी आहे.

# मुखेड तालुक्याला पुन्हा पावसाचा तडाखा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २८ ऑगस्ट -**

मुखेड तालुक्याला गुरुवारच्या रात्री पासून पून्हा एकदा मूसळधार पावसाने झोडपले असल्याने अनेक गावांची वाहतूक ठप्प झाली असून मौजे कोळनुर येथील गावात पुराचे पाणी शिरत असल्यामुळे आपला जीव वाचवण्यासाठी जवळपास २०० जणांनी गाव सोडून इतरत्र तात्पुरते स्थलांतरित झाले आहेत.

मुखेड तालुक्यातील बा-हाळी परीसराला पून्हा ऐकदा पावसाचा तडाखा बसला आहे. मूखेड शहरा सह अनेक गावांची तहान भागवनारा कूंन्द्राळा मध्यम प्रकल्प १०० टक्के भरला आहे. दि. १८ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटी सदृस्य पावसामुळे मौजे हसनाळ, रावणगाव, भेंडेगाव, भिंगोली, मारजवाडी आदी गावात पाणी शिरून प्रचंड नुकसान झाले आहे. हसनाळ येथील पाच जणांचा मृत्यू, अनेक गावातील कुटुंबांचे संसार उद्धवस्त झाले तर मुक्रमाबाद येथील बालाजी खंकरे यांचे जवळपास २२ म्हशीचा मृत्यू होऊन शेतातील टीन शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तसेच गावात वास्तव्यास असलेल्या लेंडी प्रकल्प बाधित कुटुंबाचे संसार उपयोगी साहित्य अक्षरशः पूर्णपणे पाण्यात गेल्यामुळे त्यांचा संसार उघड्यावर पडला आहे. ही भयानक नैसर्गिक आपत्ती ताजी असताना गुरुवारी रात्रीपासून झालेल्या



पावसामुळे कूंन्द्राळा, तिरु , लेंडी नदीला महापूर आलेला असून नदी काठच्या गावात पूराचे पाणी शिरले असून शेकडो ऐकर वरील पिके वाहून गेली आहेत. कोळनुर येथील रस्त्यावर सकाळपासून पाण्याची पातळी वाढत असल्यामुळे हसनाळ व रावणगाव येथील नागरिकांची झालेली हालअपेष्टांची आठवण ठेवून गुरुवारी दुपारी येथील जवळपास २०० नागरिक भारत माता विद्यालय वसुर येथे आश्रयाला धावपळ करून गेले आहेत. तर आपल्या घरात पाणी येणार नाही असे गृहीत धरून जवळपास २५० नागरिक पाण्याचा अंदाज घेत गावातच वास्तव्यास असल्याची माहिती उपसरपंच विश्वनाथ पाटील व शिवशंकर तिपणे यांनी दिली आहे. गावातील नागरिकांना सुखरूप बाहेर जाण्यासाठी गावातील तरुण मदत करीत आहेत.

# मुदखेड शहरासह तालुक्यात पावसाचा हाहाकार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २८ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यात जोरदार पाउसाने हजेरी लावली आहे शहरातील गल्ली बोळ्यात जागोजागी नाल्या भरून रस्त्यावरून पाणी वाहत असल्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे.

तालुक्यात काल रात्रीपासुन जोरदार पाऊसाची सुरुवात झाली या सततच्या पावसामुळे



आनेकांच्या घरात पाणी शिरले असल्याचे दिसुन आले तर काही जणांच्या घरांची पडझड झाली आहेत. तालुक्यातील पिंपळकोठा (मगरे) गावाशेजारील शेती संपूर्ण पाण्याखाली गेली असून, पाऊसाने संपूर्ण गावाला वेढा घातलेला दिसुन येत आहे. तर राजवाडी हे अर्ध गाव पाण्यात गेले असल्याने गावकऱ्यांनी त्या कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे अशी गावकऱ्यांनी माहिती दिली आहे. यासह काही गावांचा संपर्क तुटला आहे तर काही गावांत पाणी शिरले आहे.

मुख्य रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने वाहतुकीची ही कोंडी झाली आहे. सध्या पर्यंत तरी शहरात व तालुक्यात कोणतीही जीवितहानी सारख्या घटना घडल्या नाहीत. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्याही पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे दिसून येत आहे. या अतिवृष्टीमुळे मुदखेड शहरात व तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला आहे असे चित्र पहावयास मिळत आहे.

# वीज पडून एका शेतकऱ्यांसह बैलाचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. २८ ऑगस्ट -**

तालुक्यात आज २८ ऑगस्ट रोजी अतिवृष्टी व गडगडाटासह विजांच्या कडकडाटामुळे दोन ठिकाणी दुर्दैवी घटना घडल्या असून एका शेतकऱ्याचा मृत्यू तर दुसऱ्या घटनेत बैल दगावल्याची माहिती समोर आली आहे.

पहिली घटना मौजे शिरपूर येथे घडली. महादेव मारुती उरकुडकर (वय ३८) हे आपल्या शेत गट क्र. ४९ मध्ये काम करीत असताना अचानक अंगावर वीज पडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी प्रिया महादेव उरकुडकर (वय ३३), दोन लहान मुले सारांश (वय २ वर्षे), सोम (वय ५ वर्षे) तसेच वडील मारुती जानबाजी उरकुडकर (वय ६०) असा परिवार आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकऱ्यांच्या दुःखात सर्व ग्रामस्थ सहभागी झाले आहेत.

तर दुसरी घटना मांडवा परिसरातील दगडी मंगाबोडी शिवारात घडली. येथील रहिवासी वेंकट नारायण दासरवार यांच्या शेत सर्वे क्र. ३ मध्ये दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास बैलावर वीज कोसळली. या घटनेत बैलाचा जागीच मृत्यू झाला. शेतीसाठी महत्वाचे साधन असलेला बैल दगावल्यामुळे दासरवार कुटुंबावर आर्थिक संकट ओढावले आहे.

या दोन घटनांनी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी वर्गाने विजेच्या कडकडाटाच्या वेळी सावधानता बाळगावी, असे आवाहन करण्यात येत आहे. प्रशासनाने संबंधित कुटुंबांना तातडीने शासकीय मदत मिळवून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# भर पावसात आ. चिखलीकर यांची अनेक पूरग्रस्त गावांना भेटी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ ऑगस्ट -**

कंधार लोहा विधानसभा मतदारसंघातील अनेक गावात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने परिसरात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे . अशा परिस्थितीत नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहावे . शक्य तो घराबाहेर पडू नये . शाळा बंद ठेवण्यासाठी सूचना देण्यात आल्या असून प्रशासन आपल्या मदतीसाठी तत्पर आहे. तरीही जर आपल्या गावामध्ये आणीबाणीची परिस्थिती निर्माण होत असेल तर तरुणांनी आणि ग्रामस्थांनी योग्य वेळी सुरक्षेच्या उपायोजना कराव्यात अशी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी हात जोडून विनंती केली आहे . भर पावसात आज ते लोहा कंधार तालुक्यातील अनेक गावांना भेटी दिल्या. नागरिकांशी, शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांना धीर दिला.

कालपासून लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात अनेक भागात ढगफुटीस दृश्य पाऊस झाला आहे. नंदनवन चिखली , सावळेश्वर ,औराळ, मंगल सांगवी , दाताळा , आलेगाव , शिराढोण, दिंडा, गुंडा , कवठा , बारूळ , तेलूर, येलूर, काटकळंबा , गोमेगाव ,उमरा ,धनज खुर्द , लाडका यासह अनेक गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस मोठ्या प्रमाणात झाला असल्याने नदी नाल्यांना पूर आला आहे . रस्त्यावरून



पाणी वाहत आहे . अनेक भागातील वाहतूक पूर्णतः बंद झालेली आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अशा परिस्थितीत आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी या पूरग्रस्त भागाचा दौरा केला प्रत्येक गावातील संवाद साधून धीर दिला.

शेतकरी , कामगार ,कष्टकरी, ग्रामस्थ , विद्यार्थी ,व्यापारी ,उद्योजक आणि नोकरदार यांनी प्रवास टाळावा. शक्यतो घराबाहेर कोणीही जाऊ नये अशी विनंती ही आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली आहे . ढगफुटी संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित दादा पवार , कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी आपण दूरध्वनीवरून संपर्क साधला असून त्यांनी या भागातील पूर परिस्थिती बाबतच्या माहितीचा आढावा घेतला असल्याचे आ. चिखलीकर यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार रामेश्वर गोरे, मंडळ अधिकारी ,तलाठी, ग्रामसेवक आदींची उपस्थिती होती.

**प्रत्येकाने काळजी घेण्याची आ. चिखलीकर यांचे हात जोडून विनंती**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात सह नांदेड जिल्ह्यातील अनेक भागात पुन्हा एकदा ढग फुटीसदृश्य पाऊस झाला आहे. यामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे. रस्त्यावरून पाहणी वाहत असल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अनेक मार्ग बंद झाले आहेत . अशा परिस्थितीत कोणीही घराच्या बाहेर पडू नये . शक्यतो प्रवास टाळावा. रस्त्यावरून पाणी वाहत असेल तर त्यातून आपली वाहने पुढे नेऊ नयेत अथवा धाडस करून कोणीही पुराच्या पाण्यातून पुढे जाण्याचा प्रयत्न करू नये. स्वतः सुरक्षित राहावे. आपल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्य सुरक्षित राहील यासाठी ही काळजी घ्यावी अशी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जनतेला हात जोडून विनंती केली आहे.

# मुखेड तालुक्यातील नुकसान हे मानव निर्मित : माणिकराव ठाकरे



**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २८ ऑगस्ट -**

मागील आठवड्यात मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परिसरातील अनेक गावात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हे नुकसान अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे झाले आहे. बॅक वॉटरचा अंदाज न घेता लेंडी प्रकल्पाची घळभरणी केल्यामुळे हि घटना घडली असून, हा प्रकार मानवनिर्मित असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा गोवा प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी केला.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी ते नांदेड दौर्यावर आले असता पत्रकारांशी बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राजेश पावडे, दिनेश निखाते, आनंद चव्हाण आदीची उपस्थिती होती.

पुढे बोलताना माणिकराव ठाकरे म्हणाले की, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या आदेशावरुन मुखेड तालुक्यातील पूरपरिस्थितीची पाहणी करण्यासाठी समिती नेमण्यात आली असून या समितीने आज मुखेड तालुक्यातील हसनाळ, भेंडेगाव, भिंगोली, रावणगाव आदीसह अनेक गावांची पाहणी केली. या अतिवृष्टीमुळे सहा जणांचा मृत्यू झाला आहे. अनेकांची घरे पाण्याखाली गेली आहेत तर शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हे नुकसान केवळ जलसंपदा विभागाच्या दुर्लक्षामुळे झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करावी, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी यावेळी माणिकराव ठाकरे यांनी केली. त्याचबरोबर पूरग्रस्तांना थातूरमातूर मदत न देता त्यांना प्रत्येकी दहा लाख रुपये मदत देण्यात यावी मागणी यावेळी माणिकराव ठाकरे यांनी केली.

# जलसंपदा मंत्र्यानी राजीनामा दिला पाहिजे : राजू शेट्टी

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २८ ऑगस्ट -**

ज्यांचा जीव घेतला ती पण,तुमच्यासारखी माणसंच होती.त्यांचा जीव तुमच्या जिवासारखाचं मौल्यवान होता. जलसंपदामत्र्यांनी जीव घेणाऱ्या तिडकेवर गुन्हा दाखल करून,त्याला कायमच निलंबित केलं पाहिजे.आणि नैतिकतेवर स्वतः मंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी शेतकरी नेते,माजी खासदार राजू शेट्टी यांनी हसनाळ येथील जीव गेलेल्या कुटूंबाची भेट घेऊन मागणी केली.

राजू शेट्टी यांनी हसनाळ गाव फिरून विदारक परिस्थिती पाहिली.त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आणि मागणीचे निवेदन घेतले. हीच परिस्थिती रावणगाव, दोन्ही भेंडेगाव, भिंगोली, मारजवाडी, भासवाडी, भाटापूर येथे आहे.रावणगाव येथे लेंडी संघर्ष समिती सोबत सविस्तर चर्चा करून,बाधित १२ गावच्या मागण्या समजून घेतल्या. प्रशासनाकडून धरणग्रस्तावर होणारा अन्याय, अडवणूक आणी लूट समजून घेतली.१२ गावातील मागण्या असलेले लेंडी संघर्ष समितीचे निवेदन घेतले. धरणग्रस्ताना न्याय मिळे प्रयत्न लढा लढण्यासाठी सोबत आहे असे राजू शेट्टी यांनी सांगितले. मुक्रमाबाद येथे एका रात्रीत संपूर्ण दुग्धव्यवसाय नष्ट झालेल्या बालाजी खंकरे, परिवाराची राजू शेट्टी यांनी भेट घेतली.

## संक्षिप्त वृत्त

### माहूर पोलिस ठाणे हद्दीत एकूण ७१ गणेश मंडळांनी केली श्री ची स्थापना

**माहुर**-श्री गणेश स्थापना अनुषंगाने पोलीस स्टेशन माहूर हद्दीत एकूण ७१ गणेश मंडळांच्या वतीने श्री गणेशाच्या मूर्ती ची विविध ठिकाणी स्थापना करण्यात आली असून,एक गाव एक गणपतीची संख्या २६ आहे. श्री गणेश चतुर्थी निमित्त स्थापन करण्यात आलेल्यांमध्ये माहूर शहरात परवानाधारक गणेश मंडळे ही १४ असून विनापरवाना ०५ अशी एकूण १९ गणेश मंडळांनी श्री ची विधिवत स्थापना केली आहे. तर ग्रामीण भागात परवानाधारक गणेश मंडळे ही ४२ असून विनापरवाना १० अशा एकूण ५२ गणेश मंडळांनी गणेशाच्या मूर्तीची विधिवत स्थापना केली असल्याची माहिती पो. नि.गणेश कराड यांनी दिली आहे.

### बितनाळ येथे ३० ऑगस्ट रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती

**उमरी -** तालुक्यातील बितनाळ येथे ३० ऑगस्ट रोजी साहीत्य सम्राट लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. सरपंच सौ सुभद्रा उमाटे यांच्या हस्ते ध्वजारोन होईल. दुपारी ४:०० वाजता गावातील प्रमुख रस्त्याने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तैल चित्राची भव्य मिरवणूक निघेल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मानवी हक्क अभियान जिल्हा उपाध्यक्ष दिगांबर गायकवाड नागठाणेककर तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस निरीक्षक अंकुश माने, किशन इंगळे, किशोर कवडीकर, संजय वाघमारे बोथीकर, साहेबराव गव्हाळकर , संतोष वाघमारे, बालाजी बंगारीकर आणि प्रमुख वक्ते प्रा . ललिता आत्माराम तलवारे , किशनदादा गायकवाड , सतिष पाटील , कवी नागोराव डोंगरे, डी. जी. तुपसाखरे , प्रा प्रियंका गायकवाड आदी उपस्थित राहणार आहेत . मिरवणूक विसर्जन नंतर महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक शाहीर व प्रबोधनकार बाबुराव गाडेकर यांचा संच यांचा गायणाचा दणदणीत कार्यक्रम सायकांळी ८:३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक लक्ष्मण वाघमारे संयोजक नारायण वाघमारे उत्सव समितीचे अध्यक्ष दत्ता आडेकर, उपाध्यक्ष साईनाथ वाघमारे, सचिव अंबादास गायकवाड, सचिन गायकवाड, राहुल वाघमारे, बालाजी वाघमारे, महाजन वाघमारे , संतोष वाघमारे यांनी केले आहे .

# मसाप शाखेच्या वतीने पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २८ ऑगस्ट -**

मराठी साहित्य क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक साहित्यिकांच्या वतीने संकलित करण्यात आलेल्या निधीतून मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड च्या वतीने मुखेड तालुक्यातील रावणगाव आणि हसनाळ येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले . साहित्यिक देवीदास फुलारी , मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितदार, उपाध्यक्ष दिगंबर कदम , कार्यवाह प्रा. महेश मोरे , सह कार्यवाह राम तरटे , कवी शिवाजी जोगदंड आदींची उपस्थिती होती.

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परिसरात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने या भागातील रावणगाव , हसनाळ आदी गावांना पुराच्या पाण्याचा प्रचंड फटका बसला होता. घरांची पडझड झाली . नागरिकांचे जनजीवन उध्वस्त झाले . खाण्यापिण्याचाही प्रश्न निर्माण झाला. पुराच्या पाण्यात संसार उपयोगी साहित्य वाहून गेले . याचवेळी विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्यावरही पुराच्या पाण्याचे संकट आले होते . या पुरात पाण्याने शालेय साहित्याचा अक्षरशः चिखल झाला आहे. त्यामुळे पूर सरल्यानंतर शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना वही पेनही शिल्लक राहिले नव्हते . अशा परिस्थितीत शालेय विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पुन्हा नव्या जोमाने सुरू करता यावे , त्यांना शालेय साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड ने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांसाठी ही वही, पेन , पेन्सिल , खोड रबर , परीक्षा पॅड , पाण्याची बॉटल आदी साहित्य देण्यात आले .

शालेय साहित्य वाटपासाठी हसणाळ येथील पोलीस पाटील बालाजी शिंदे , संदीप शिंदे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले तर रावणगाव येथे सरपंच राजू पाटील, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष दत्तात्र्य यरावार , पत्रकार प्रसाद खेकाळे , बालाजी नायनवाड, अवधूत बंडाळे यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.



**माहूर-शहरातील श्री शिवश्रद्धा गणेश मंडळाच्या सभागृहाचे लोकार्पण आणि श्री च्या मूर्तीची स्थापना आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आली. तदनंतर आ. केराम यांनी भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपुभाऊ महामुने यांच्या निवासस्थानी विशेष भेट देऊन स्थापना करण्यात आलेल्या बैलगाडी हाकणाऱ्या शेतकऱ्याच्या आकर्षक रुपातील श्री च्या मूर्तीची मनोभावे पूजा अर्चना करुन दर्शन घेतले. यावेळी माजी उपनगराध्यक्षा शोभाताई महामुने, शहराध्यक्ष गोपू महामुने, सौ. अश्विनी महामुने यांसह अनेकांची उपस्थिती होती.**

# ईद-ए-मिलाद-उन-नबी 'चा उत्सव गणेश विसर्जनानंतर: फिरोज दोसानी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २८ ऑगस्ट -**

हिंदु-मुस्लिम ऐक्य, बंधूभाव कायम राहावा आणि विसर्जन मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचे विघ्न निर्माण होऊ नये यासाठी ईद-ए-मिलादची मिरवणूक ही १० सप्टेंबर रोजी काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय माहूर मुस्लिम समाजाने घेतला आहे. मुस्लिम समाज बांधवांकडून माहूर पोलिस ठाण्यात या संदर्भात आज दिनांक २७ रोजी निवेदन देत हा स्वागतार्ह तेवढाच



प्रशंसनीय निर्णय घेण्यात आला आहे.

माहूर शहरातील सामाजिक एकता, बंधुता आणि शांतता, प्रेम,सौहार्द,सामाजिक सलोखा, देशभक्ती,अखंडता, सार्वभौमत्व टिकवून ठेवण्यासाठी हा अभिनंदनीय निर्णय असल्याचे मत नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी व्यक्त केले आहे.

यंदा श्री गणेश विसर्जन मिरवणूक आणि मुस्लिम बांधवांची ईद-ए-मिलाद मिरवणूक एकाच वेळी असल्याने गणेश विसर्जन मिरवणूकीत कोणत्याही प्रकारचे विघ्न न येता ती शांततेत पार पडावी या उद्देशाने १० सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादची मिरवणूक काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय माहूर शहरातील मिलाद समिती व मुस्लिम समाजाने मुस्लिम बांधवाच्या बैठकीत चर्चा करून सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. नगराध्यक्ष फिरोज दोसानी, गौसिया मस्जिदचे सदर जमीर मलनस,नगरसेवक प्रतिनिधी इरफान सय्यद, इरशाद रजा, बबलू शेख,इस्माईल काझी,

इलियास बावानी,अब्दुल रहमान शेख आली यांच्या कडून १० सप्टेंबर रोजी जुलूस काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पोलिस ठाण्यात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.मुस्लिम समाजाच्या या निर्णयाचे पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी स्वागत केले आहे.

इस्लामचे शेवटचे पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त मुस्लिम बांधव 'ईद-ए-मिलाद' मोठ्या उत्साहात साजरी करतात. त्या दिवशी मिरवणूक काढली जाते. तथापि, गणेश विसर्जनात कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये म्हणून माहूर शहर मुस्लिम संघटनांनी ईद मिलाद-उन-नबीची मिरवणूक पुढे ढकलण्याचा महत्वपूर्ण असा अभिनंदनीय निर्णय घेतला आहे.